जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार ४ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

दुष्काळग्रस्तांना वाढीव मदत; केंद्राकडून निकषांमध्ये बदल

जिरायती शेतीला हेक्टरी 99 हजार, फळबागांना 30 हजार रुपये



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- राज्यातील दुष्काळग्रस्त आणि नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत (एनडीआरएफ) दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या निकषांत सुधारणा केली आहे. नव्या निकषांनुसार जिरायती शेतीसाठी हेक्टरी ११ हजार रुपये, बागायतीसाठी २२ हजार रुपये, तर फळबागांच्या नुकसानीपोटी हेक्टरी ३० हजार रुपये मिळणार आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मिळणारी मदतही ४ लाखांवरून ८ लाख रुपये करण्यात आली आहे.अतिवृष्टी, पूर आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी ही मदत दिली जाते. शेती, फळबागा, पशुधन, कुक्कुटपालन आणि घरांच्या नुकसानीसाठीच्या मदतीतही वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्तांना पूर्वीच्या तुलनेत अधिक आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

निर्णयाची कधीपासून होणार अंमलबजावणी?

सुधारित मदत निकष २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून या निकषांची अंमलबजावणी करण्याची तरतूद आहे. १ एप्रिल २०२६ नंतर झालेल्या नुकसानीसाठीही सुधारित दर लागू होण्याची शक्यता आहे.मात्र, राज्य सरकारला मंत्रिमंडळ बैठकीत या निकषांना मंजुरी देऊन त्यानुसार अंमलबजावणी करावी लागणार आहे. त्यामुळे १ एप्रिलनंतर अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वाढीव दराने मदत मिळणार का, याकडे लक्ष लागले आहे.

राज्याकडून केंद्राला सुधारित प्रस्तावाची शक्यता- राज्य सरकारने नुकसानीच्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र सरकारकडे ३१ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवला आहे. मात्र, केंद्राने आपत्ती मदतीच्या निकषांमध्ये सुधारणा केल्याने राज्याला नव्याने सुधारित प्रस्ताव सादर करावा लागू शकतो.

राज्य सरकारकडून २९१ कोटींची मदत मंजूर

यंदाच्या वर्षी जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून २९१ कोटी ९१ लाख ४ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. यापैकी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात येणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. याबाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीबाबत ३ लाख ९ हजार २८९ बाधित शेतकऱ्यांच्या २ लाख ६८ हजार ९१८ तर २९ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कोकण आणि नाशिक विभागातील बाधित शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले होते. राज्यात शेतपिकाचे नुकसान झालेल्या ३४ हजार ९८४ शेतकऱ्यांच्या ➪(पान २ वर)

पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार

या मदतीचा लाभ सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर आणि नंदुरबार जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना होणार आहे. शेतीपिकांच्या नुकसानीची मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, असेही मंत्री जाधव यांनी सांगितले.

दिल्ली पोलिस मुख्यालयाबाहेर आंदोलन करणारे एसीपी निलंबित


नवी दिल्ली : दिल्ली पोलिस दलातील सहाय्यक आयुक्त (एसीपी) मनस्वी वशिष्ठ यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वी दिल्ली पोलिस मुख्यालयाबाहेर आपल्याच विभागाच्या विरोधात निदर्शने आणि आंदोलन केले होते. त्यामुळे पोलिस मुख्यालयाबाहेर स्वत:च शिस्तीचे उल्लंघन करून निदर्शने केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.



दिल्लीतील शाहदरा भागात वकील आणि पोलिसांमध्ये वाद झाला होता. या प्रकरणामुळे वकिलांनी निदर्शने व संप पुकारला होता. त्यानंतर प्रशासनाने एसीपी मनस्वी वशिष्ठ आणि एका पोलिस स्टेशनच्या अधिका-याची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. वकिलांसोबत झालेला वाद आणि त्यानंतर झालेल्या बदलीच्या निषेधार्थ सुमारे १०० हून अधिक पोलीस कर्मचा-यांनी दिल्ली पोलिस मुख्यालयाबाहेर एकत्र येऊन निदर्शने केली होती. या आंदोलनाचे नेतृत्व एसीपी मनस्वी वशिष्ठ यांनी केले होते आणि पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपली बाजू मांडली होती. पोलिस दलात राहून अशा प्रकारे रस्त्यावर उतरून आंदोलन करणे शिस्तीच्या विरोधात मानले जाते. त्यामुळे शिस्तीचा भंग केल्यामुळे प्रशासनाने कठोर पाऊल उचलत एसीपी मनस्वी वशिष्ठ यांना निलंबित केले आहे. या प्रकरणात पुढील चौकशी सुरू आहे.

सीसीटीव्हीची नजर स्वत:कडे ठेवा

प्रयागराज : शेजा-याच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन होईल, अशा पद्धतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवता येणार नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या शेजा-याच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करण्याची परवानगी देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती अजित कुमार आणि न्यायमूर्ती गरिमा प्रसाद यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. याचिकाकर्ते योगेंद्र मौर्य यांनी शेजा-याने बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमे-याच्या दिशेवर आक्षेप घेत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. संबंधित कॅमेरा त्यांच्या घरात येण्या-जाण्याच्या मार्गावर केंद्रित असल्याने घरात येणारे पाहुणे आणि कुटुंबीयांच्या खासगीपणाचा भंग होत असल्याचा दावा त्यांनी केला होता. हा प्रकार गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचेही त्यांनी याचिकेत नमूद केले होते. याचिकेवर निकाल देताना, न्यायालयाने याचिकाकर्त्याला या विषयाबाबत संबंधित जिल्हा दंडाधिका-यांकडे औपचारिक अर्ज सादर करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने असेही आदेश दिले की, जर असा अर्ज दाखल केला गेला, तर जिल्हा दंडाधिका-यांनी त्यावर विचार करून एका महिन्याच्या आत कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करावी.



आश्रमात महिलेवर अत्याचार

पुणे/प्रतिनिधी- धार्मिक प्रवचन आणि सत्संगाच्या माध्यमातून एका महाराजाने महिलेचा विश्वास संपादन करून तिचे शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात समोर आला आहे. पुण्यातील वृंदावन येथील संत इंद्रदेव महाराज यांच्यावर एका महिलेने गंभीर आरोप केले आहेत. मीरारोड येथील ४२ वर्षीय महिलेने पत्रकार परिषद घेऊन आपल्यासोबत घडलेला धक्कादायक प्रकार सांगितला.दीक्षा देण्यापासून ते आश्रमात बोलावून कथित अत्याचार करणे, व्हीडीओ कॉलद्वारे अश्लील कृत्ये करणे आणि नंतर बदनामीची भीती दाखवून धमकावणे, असा संपूर्ण घटनाक्रम महिलेने पत्रकार परिषदेत सांगितला.महिलेने केलेल्या आरोपानुसार, जानेवारी २०२३ मध्ये सोशल मीडियावर महाराजांचे प्रवचन पाहिल्यानंतर ती त्यांच्या संपर्कात आली. एप्रिल २०२३ मध्ये सांताक्रूझ येथील सत्संगात सहभागी झाल्यानंतर तिने महाराजांकडून दीक्षा घेतली. पुढे आपल्या वैयक्तिक अडचणी सांगितल्यानंतर त्या दूर करण्याचे आश्वासन मिळाल्याने तिचा महाराजांवरील विश्वास वाढला. त्यानंतर महाराजाने या महिलेला आश्रमात बोलावून अत्याचार केल्याचा आरोप तिने केला आहे. वृंदावन येथील सेवाधाम आश्रमात मुक्कामासाठी गेलेली असताना रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास महाराजांनी फोन करून आपल्या खोलीत बोलावल्याचा आरोप महिलेने केला आहे. कोणाला विचारल्यास औषध घेण्यासाठी जात असल्याचे सांग, असेही त्यावेळी सांगण्यात आले. खोलीत गेल्यानंतर दरवाजा बंद करून महाराजाने जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे महिलेने आपल्या जबाबात म्हटले आहे. व्हीडीओ कॉलवर ➪(पान २ वर)



कापूस, तुरीमध्ये गांजाचे आंतरपिक

यवतमाळ/प्रतिनिधी- निसर्गाच्या लहरीपणामुळे जिल्ह्यातील शेती व्यवसाय आधीच संकटात आहे. अशा परिस्थितीत पांढऱ्या सोन्याच्या जिल्ह्यातील काही शेतकरी आता कापूस, तूर यांसारख्या पारंपरिक पिकांसोबत चक्क गांजाची लागवड करीत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.पोलिसांनी गेल्या सहा महिन्यांत केलेल्या २२ कारवायांमध्ये तब्बल ९७८ किलो गांजा जप्त केला असून, त्याची किंमत दोन कोटी पाच लाख रुपये असल्याचे सांगण्यात येते. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकरी या अवैध मार्गाकडे वळत आहेत का, की अधिक पैशांच्या मोहापायी हा प्रकार घडत आहे, असा प्रश्न या घटनांमुळे उपस्थित झाला आहे.

कापूस, तुरीमध्ये गांजाचे आंतरपिक- जिल्ह्यातील काही भागांत कापूस आणि तुरीच्या पिकांचा आडोसा घेऊन गांजाची लागवड केली जात असल्याचे पोलिसांच्या कारवायांतून उघड झाले आहे. अलीकडेच घाटंजी तालुक्यातील कुंभारी शिवारात




तीन एकर क्षेत्रात तूर आणि कापसाच्या पिकांमध्ये गांजाची ८४८ झाडे आढळून आली. पांढरकवडा तालुक्यातही तुरीच्या पिकाआड गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला. अशा घटनांमुळे हा प्रकार एखाद्या ठिकाणापुरता मर्यादित नसल्याचे दिसत आहे.

गांजाच्या लागवडीत वाढ होण्याची भीती- गेल्या काही वर्षांपासून शेतीचा उत्पादन खर्च वाढत असताना बाजारातील दरांची अनिश्चितता कायम आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ हंगामासाठी मध्यम धाग्याच्या कापसाला प्रतिक्विंटल ७,७१० रुपये, तर लांब धाग्याच्या कापसाला ८,११० रुपये किमान आधारभूत किंमत निश्चित केली आहे. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात फारच कमी रक्कम पडते. अशा परिस्थितीत गांजाच्या लागवडीतून मिळणाऱ्या पैशांचे आकर्षण काही जणांना वाटत असावे, असा अंदाज आहे. पोलीस प्रशासनाच्या माहितीनुसार, जिल्ह्यात ➪(पान २ वर)

दोन हेलिकॉप्टर एकमेकांना धडकले

काठमांडू : नेपाळमधील माउंट एव्हरेस्ट परिसरातील फेरिचे हेलिपॅडवर मंगळवारी सकाळी एक अत्यंत भीषण अपघात घडला. लँडिंग करत असताना दोन हेलिकॉप्टर एकमेकांवर आदळल्याने झालेल्या या दुर्घटनेत एका भारतीय नागरिकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. नेपाळ पोलिसांच्या प्राथमिक अहवालानुसार, सकाळी सुमारे ८ वाजून ११ मिनिटांच्या सुमारास फिशटेल एअर आणि डायनेस्टी एअरच्या हेलिकॉप्टरमध्ये ही टक्कर झाली. पोलिस निरीक्षक मौसम तामांग यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात मृत पावलेल्या हिंदुस्थानी नागरिकाची ओळख वसंत कुमार बलरामरामाडू अशी पटली आहे. ते फिशटेल एअरच्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करत होते. याच हेलिकॉप्टरमध्ये असलेले हिंदुस्थानी वंशाचे न्यूझीलंडचे नागरिक शैलेश कृष्ण पटेल हे या अपघातात जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ प्रभू हेलिकॉप्टरच्या मदतीने काठमांडूच्या मेडिसिटी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. तसेच दोन्ही हेलिकॉप्टरचे वैमानिक फिशटेल एअरचे कॅप्टन प्रज्वल केसी आणि एअर डायनॅस्टीचे कॅप्टन रवींद्र प्रजापती यांनाही या दुर्घटनेत दुखापत झाली असून पुढील वैद्यकीय उपचारांसाठी त्यांनाही काठमांडूला नेण्यात आले आहे. घटना घडली त्यावेळी दोन्ही हेलिकॉप्टरमध्ये नेमके किती प्रवासी होते, याबाबतची एकूण संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही.



श्रीनगरमध्ये ४ ठिकाणी छापे

श्रीनगर : अंमलबजावणी संचालनालयाने(ईडी) जम्मू आणि काश्मीरमधील एका कथित दहशतवादी निधीपुरवठा (टेरर फंडिंग) प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. ईडीच्या श्रीनगर विभागीय कार्यालयाची पथके मंगळवारी श्रीनगरमधील चार वेगवेगळ्या ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत. दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणी ईडीने जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर येथे चार ठिकाणी छापे टाकले आहेत. हा तपास उमर आदिल दार आणि त्याच्या साथीदारांशी संबंधित असलेल्या कथित दहशतवादी निधीपुरवठा नेटवर्कवर केंद्रित आहे. उमर आदिल दार आणि त्याच्या साथीदारांशी संबंधित दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणाच्या सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून ही कारवाई केली जात आहे. या प्रकरणात गुंतलेले आर्थिक व्यवहार आणि कथित दहशतवादी निधीपुरवठा नेटवर्क उघडकीस आणणे, हे तपास यंत्रणेचे उद्दिष्ट आहे. ईडीचा तपास उमर आदिल दारच्या कथित कारवायांशी संबंधित आहे. असा आरोप आहे की, उमर आदिल दारने बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना लश्कर-ए-तोयबासाठी ओव्हरग्राउंड वर्कर म्हणून काम केले. तो संघटनेशी संबंधित कारवायांमध्ये सक्रियपणे सहभागी होता, असाही आरोप आहे. तपास यंत्रणा या प्रकरणात त्याच्या साथीदारांची भूमिका आणि त्यांच्या आर्थिक नेटवर्कचाही तपास करत आहे. तपासात असे उघड झाले आहे की, उमर आदिल दारला यापूर्वी त्याच्या काही साथीदारांसह अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त करण्यात आली होती. एका प्रतिबंधित दहशतवादी संघटनेशी संबंधित आक्षेपार्ह साहित्यही सापडल्याचे वृत्त आहे.

भाजपने लोकशाही वाचवा म्हणणे म्हणजे चिकनवाल्याने कोंबडी वाचवा म्हणण्यासारखे

मुंबई / प्रतिनिधी- सत्तेवर बसल्यानंतरही भाजप अजून विरोधी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर पडलेला नाही, तर काँग्रेसला अजूनही विरोधी पक्षाची भूमिका कशी बजवायची हे समजलेले नाही. सत्ता केवळ खुर्चीत नसते, ती अंगात आणि मनातही असावी लागते. सत्ताधा-यांनी आपल्यावरील टीका आणि विनोद खिलाडूवृत्तीने स्वीकारायला शिकले पाहिजे. मात्र, आज व्यंगचित्रकार, पत्रकार आणि संपादकांवर बंधने आणली जात आहेत. हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत घातक असल्याचा टिका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज केली. भाजपाने लोकशाही वाचवा म्हणणे म्हणजे केएफसीच्या म्हाता-याने कोंबडी वाचवा म्हणण्यासारखे असल्याचा टोला त्यांनी यावेळी लगावला.पु. ल. देशपांडे यांच्यावरील व्यंगचित्र दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्यात राज ठाकरे बोलत होते. रविंद्र नाट्य मंदिरात झालेल्या या



कार्यक्रमात राज ठाकरेंनी पु. ल. देशपांडे यांच्यासोबतच्या आठवणी ताज्या केल्या. यावेळी त्यांनी सत्ताधारी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. भाजपकडून संविधान आणि लोकशाही वाचवण्याच्या काढलेल्या लोकशाही बचाव रॅलीवर टिका करताना राज ठाकरे यांनी, भाजपने लोकशाही वाचवा असे म्हणणे केंटुकी फ्राइड चिकनच्या प्रतीक असलेल्या म्हाता-याने कोंबड्या वाचवा असे सांगण्यासारखे आहे, असा टोला लगावला. स्वत:च सत्तेत बसलेले असताना लोकशाही वाचविण्यासाठी मोर्चे नेमके कशासाठी आणि कोणाविरुद्ध काढत आहात, असा सवालही राज ठाकरे यांनी केला.विधान परिषद निवडणुकांच्या निकालाचा अंदाज चुकल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ट्विटचा संदर्भ देत राज ठाकरे म्हणाले, मी आजवर कोणत्याच पंतप्रधानांनी असे ट्विट केल्याचे पाहिलेले नाही. कारण भाजप अजूनही विरोधी पक्षाच्या भूमिकेतूनच बाहेर आलेला नाही. यावेळी त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकीय शैलीचाही दाखला दिला.

सरकार संसदेत 'SIR'सह प्रत्येक मुद्यावर चर्चेस तयार

अमित शाह यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- केंद्र सरकार संसदेत मतदार यादीच्या पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेसह प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. एवढेच नाही, तर त्यांनी यावेळी राहुल गांधींना चर्चेसाठी आव्हान देत थेट निशाणा साधला. ते छत्तीसगडमधील नवा रायपूर येथील अटल नगर येथे विकसित भारत संकल्प पार्क पीपल वनच्या लोकार्पण सोहळ्यावेळी बोलत होते. राहुल गांधी यांच्यावर हल्ला चढवताना अमित शाह म्हणाले, 'राहुल गांधी यांनी 'जनता सरकार'चे (माओवादी 'जनता सरकार' संकल्पना) आणि असंवैधानिक सरकारांना पाठिंबा दिला आहे. काँग्रेस पक्षाने नेहमीच असंवैधानिक सरकारांचे आणि माओवाद्यांच्या 'जनता सरकार' संकल्पनेचे समर्थन केले आहे. जेथे जनतेने कुठलेही सरकारं निवडली नव्हती, तेथे नक्षलवाद्यांचे वेगळेच गृहमंत्री, मुख्यमंत्री आणि वित्तमंत्री असायचे. अनेक निर्दोष पत्रकार, समाजसेवक आणि विद्यार्थ्यांना झाडांना लटकावून मारले गेले आणि राहुल गांधी संसदेतही याचे गोष्टींचे समर्थन करतात.छत्तीसगडच्या विकासासंदर्भात बोलताना गृहमंत्री ➪(पान २ वर)





अमरावती-मुंबई एक्स्प्रेस पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत सुरू

खासदार बळवंत वानखडे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

अमरावती/प्रतिनिधी:- अमरावती जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या सुविधा वाढविण्यासाठी, रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी आणि



अमरावतीला देशातील प्रमुख धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक व व्यापारी शहरांशी थेट जोडण्यासाठी खासदार बळवंत वानखडे यांनी मध्य रेल्वे प्रशासनाकडे केलेल्या मागण्यांवर रेल्वे प्रशासनाने अधिकृत उत्तर दिले आहे. अमरावती–मुंबई एक्स्प्रेस पुन्हा CSMT पर्यंत सुरू करण्या सदर्भात खासदार बळवंत वानखडे यांनी गाडी क्रमांक १२११२ अमरावती–मुंबई एक्स्प्रेस ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) पर्यंत चालविण्याची मागणी केली होती. रेल्वे प्रशासनाने रेल्वे टर्मिनलवरील पुनर्विकास कामांमुळे ही गाडी यापूर्वी दादर स्थानकापर्यंत मर्यादित करण्यात आली होती. मात्र, सप्टेंबर २०२६ पासून सदर रेल्वेगाडी पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत चालविण्यात येत आहे. या सुविधेमुळे अमरावतीहून मुंबईला जाणाऱ्या विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी, नोकरदार आणि सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. अमरावतीच्या रेल्वे विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा वाढविणे आणि नवीन रेल्वेसेवांच्या प्रस्तावांचा पुनर्विचार करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरू ठेवण्यात येईल अशी माहितीही खासदार बळवंत वानखडे यांनी यांनी दिली आहे.

दीर्घकालीन विकास आराखडा तयार करा- अमरावती हे पश्चिम विदर्भातील महत्त्वाचे शैक्षणिक, व्यापारी, कृषी आणि औद्योगिक केंद्र आहे. त्यामुळे अमरावती रेल्वे स्थानकाच्या टर्मिनल सुविधांचा विस्तार, रेल्वेमार्गांची क्षमता वाढविणे आणि नवीन रेल्वे गाड्यांसाठी आवश्यक परिचालन सुविधा निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. रेल्वे प्रशासनाने उपस्थित केलेल्या तांत्रिक अडचणी कायमस्वरूपी अडथळा ठरू नयेत, यासाठी रेल्वे मंत्रालयाने दीर्घकालीन विकास आराखडा तयार करावा, अशी मागणी खासदार वानखडे यांनी केली आहे.



उभ्या चार चाकीने घेतला अचानक पेट

-गुरुकुंज मोझरीतील घटना

प्रतिनीधी/तिवसाः-
तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील महावितरण कार्यालयाजवळ उभ्या असलेल्या मारुती ओमनी चारचाकी वाहनाला सोमवारी मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या घटनेत गाडी जळून पूर्णपणे खाक झाली. गाडी क्रमांक MH २९ N ९२७८ असून ती वंदना सुधीर गवई (रा. खेरी धानोरा, जिल्हा अमरावती) यांच्या मालकीचे असल्याचे समजते .घटनेची माहिती मिळताच तिवसा नगरपंचायतीचे अग्निशमन वाहन व तिवसा पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र, तोपर्यंत वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

१ व १० वरिल उर्वरित

राज्य सरकारकडून २९१ कोटींची

७ हजार ६७५.४० हेक्टर क्षेत्रासाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अमरावती, नागपूर, कोकण, नाशिक आणि पुणे विभागांतील यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील बाधितांचा यात समावेश आहे. दरम्यान, शेतजमिनीच्या नुकसानीसाठी जमीनमालक असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने जास्तीत जास्त दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत मिळेल. जमिनीतील वाळू, गाळ किंवा क्षार काढणे तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पात्र नुकसानीसाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळणारी मदत बँकांनी कर्ज खात्यात किंवा अन्य वसुलीसाठी वळती करू नये, अशा सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना देण्याचे निर्देश याद्वारे मंत्री जाधव पाटील यांनी दिले आहेत.

आश्रमात महिलेवर अत्याचार

अश्लील कृत्ये रेकॉर्डिंगचा दावा इतकेच नव्हे तर २९ नोव्हेंबर २०२५ आणि २१ जानेवारी २०२६ रोजी व्हीडीओ कॉल करून अश्लील कृत्ये केल्याचा आरोपही महिलेने केला आहे. व्हीडीओ कॉलवर समोरून स्वत:चे कपडे काढून महिलेलाही तसे करण्यास सांगितल्याचे तिने म्हटले आहे.महिलेने केलेल्या आरोपांनुसार, महाराज तिच्या घरातील मालमत्तेबाबतही चौकशी करत होते. आपल्याला मुलगा नसल्याने तिच्या लहान मुलीला मुलीसारखे सांभाळण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचेही तिने सांगितले. धार्मिक श्रद्धेच्या माध्यमातून जवळीक निर्माण करून तिच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप केल्याचा आरोप महिलेने केला आहे. रेकॉर्डिंग बाहेर गेल्यानंतर धमकावल्याचा आरोप आपल्यासोबत घडलेला प्रकार दुस-या महिलेला सांगितल्यानंतर महाराजांनी संपर्क साधून रेकॉर्डिंग का पाठवले?, अशी विचारणा केली.सोशल मीडियावर बदनामी झाल्यास आत्महत्या करण्याची धमकी दिल्याचे, तसेच १७ जून २०२६ रोजी 'तुम्हे छोडूंगा नहीं' असे म्हणत धमकावल्याचे महिलेने सांगितले.

कापूस, तुरीमध्ये गांजाचे

गांजाची लागवड अद्याप मर्यादित स्वरूपात असली तरी त्यात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आर्थिक अडचणींमुळे काही जण चुकीच्या मार्गाकडे वळत असल्याची बाब चिंताजनक आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच रोखण्यासाठी पोलिसांकडून कारवाईसोबत जनजागृतीचीही गरज आहे.

सरकार संसदेत 'SIR'सह

अमित शाह म्हणाले, अटलबिहारी वाजपेयी यांनी छत्तीसगड राज्य निर्माण केले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते राज्य नक्षलमुक्त केले आणि विकासाच्या प्रवाहात आणले. ज्या जंगलांमधून महुआ आणि लोकगीते यायला हवी होती, तेथे भूसुरुंग पेरण्यात आले आणि लहान मुलांच्या हातात बंदुका दिल्या गेल्या. दरम्यान, 'मी आज येथे नक्षलवादाचे समर्थन करणाऱ्यांना विचारतो, 'गरीब आदिवासींना मानवाधिकार नाहीत का?' कॉंग्रेस पक्षाने नेहमीच नक्षलवादाचे समर्थन केले आहे. २०१० मध्ये पी. चिदंबरम म्हणाले होते, नक्षलवाद्यांना शस्त्रे बाळगण्याची गरज नाही, त्रास देऊ नका, आम्ही गोळी चालवणार नाही. मी संसदेत म्हणालो होतो, ज्यांना आत्मसमर्पण करायचे आहे, त्यांनी यावे, आम्ही त्यांना मुख्य प्रवाहात आणू, अन्यथा आमचे सैनिक त्यांच्याशी दोन हात करतील. ईशान्य असो, बस्तर असो अथवा काश्मीर असो, कायदा मोडणाऱ्यांना आमचे सुरक्षा दल सरळ करण्याचे काम करेल.'

रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी

फुलाते मोर्शी येथील खुले कारागृहात फार्मासिस्ट मिश्रक म्हणून कार्यरत होते. अमोल २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कर्तव्यावर हजर होते.त्यानंतर ते काही कामानिमित्त आपल्या दुचाकीने चांदूरबाजार येथे गेले होते. रात्री ते चांदूरबाजार येथून मोर्शी येथे परत येत असताना खेड फाट्यावर सुरू असलेल्या उड्डाण पुलाच्या कामावर सर्व प्रकारचे सुरक्षाचे बोर्ड बॅरिगेट लावले असताना सुद्धा मध्यरात्री त्यांच्या मोटर सायकलची जोरदार धडक बॅरिगेटला बसली. त्यामुळे बॅरिगेट खाली कोसळले व अमोल यांना सुद्धा रोडचा डोक्याला जबर मार बसल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. आज ३ ऑक्टोंबर रोजी सकाळी त्यांचा मृतदेह सकाळी ६:४५ वाजता नागरिकांना दिसला.लगेच या घटनेची माहिती दूरध्वनीवरून मोर्शी पोलिसांना मिळाली मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हलविण्यात आला. मृतक अमोल फुलाते हे खुले कारागृह मोर्शी येथे कार्यरत असतांना आपल्या दोन कर्मचाऱ्यांसोबत प्रज्ञा कॉलनी मोर्शी येथे भाड्याने राहत होते. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. घटनास्थळ हे शिरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असल्यामुळे पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

पंचवटी उड्डाणपुलावरील अपघातात

ठाण्याच्या हद्दीतील उड्डाणपुलावर घडली.

निकिता काकडे (गावंडे) (वय २९, रा. गुरुदेव कॉलनी, अमरावती) असे मृत महिलेचे नाव आहे. तर त्यांचे पती अनुराग गावंडे (वय ३४) हे या अपघातात जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, निकिता या पती अनुराग यांच्यासोबत दुचाकीने गाडगेनगरकडून उड्डाणपुलामार्गे इर्विन चौकाच्या दिशेने जात होत्या. दोघांचाही प्रवास नेहमीप्रमाणे सुरू असताना उड्डाणपुलावर अचानक अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीवरील पती-पत्नी दोघेही रस्त्यावर कोसळून जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. दोघांनाही तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांचे प्रयत्न सुरू असतानाच निकिता यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. दुसरीकडे, अनुराग गावंडे यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे झालेल्या या अपघाताची पोलिसांनी नोंद घेतली असून, धडक देणाऱ्या वाहनाचा शोध घेण्यासह पुढील तपास सुरू केला आहे.

या दिवाळीत खरेदीत होणार

करांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंद नांदो, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. तसेच, सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबासह पूनम इलेक्ट्रॉनिक्सच्या शोरूमला मोतीनगर, अमरावती येथे भेट देऊन आकर्षक ऑफर्सचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. अग्रवाल म्हणाले की, गेल्या ३२ वर्षांपासून ग्राहकांनी दाखवलेला विश्वास हीच पूनम इलेक्ट्रॉनिक्सची सर्वात मोठी संपत्ती आहे. यापुढेही ग्राहकांना योग्य किंमत, दर्जेदार उत्पादने आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी प्रतिष्ठान कटिबद्ध राहील.

उर्दू शाळांतील ५७२ शिक्षक पदांचा

उर्दू माध्यमाच्या उमेदवारांनी उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले गुण प्राप्त देखिल केले. मात्र, आरक्षण प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने अनेक जागा अद्यापही रिक्त राहिल्या आहेत. तर दुसरीकडे खुल्या प्रवर्गातील गुणवंत उमेदवारांना या जागांवर संधी मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नियमावलीनुसार जागा रूपांतरित करण्याची मागणी शासन निर्णय व शिक्षक भरती प्रक्रियेतील तरतुदीनुसार आरक्षित प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास संबंधित जागा नियमानुसार खुल्या प्रवर्गात रूपांतरित करून गुणवत्तेच्या आधारावर भरता येऊ शकतात, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे रिक्त असलेल्या ५७२जागांसाठी विशेष 'उर्दू ओपन कन्व्हटेंड राऊंड' राबविण्याची मागणी भावी शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

केबल काढल्याच्या संशयातून

आला. त्याने आपल्या घरावरील केबल काढल्याचा आरोप करीत लुटे यांच्याकडे विचारणा केली. मात्र, आपण केबल काढलेली नाही, असे लुटे यांनी स्पष्ट केले. यावरून आरोपी संतप्त झाला. त्याने स्वतःच्या घरातून लोखंडी अँगल आणून सुखदेव लुटे यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात लुटे गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळले. पत्नी अनिता लुटे यांनी तातडीने त्यांना ऑटोरिक्षातून चांदूर रेल्वे येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी पत्नी अनिता लुटे यांच्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी राजेश मोहतुरे याच्याविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अन्वये हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी जितेंद्र जाधव आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गीता तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तपासात आरोपीविरुद्ध पुरावे आढळून आल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश संजय भट्टाचार्य यांच्या न्यायालयात झाली.

सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांची साक्ष आणि अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. अमित जुनघरे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. त्यानुसार जन्मठेप, पाच हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. अमित जुनघरे यांनी काम पाहिले. या प्रकरणात पोलीस निरीक्षक मंगेश पदमाकर मोहोड, जिल्हा पैरवी अधिकारी पोलीस हवालदार रोशन दुधे आणि पैरवी अधिकारी महिला पोलीस कॉन्स्टेबल सोनल उमरे यांचे सहकार्य लाभले.

गायीच्या गोठ्यात आढळला भला

राखत ऋषिकेश मुळे यांनी तातडीने सर्पमित्रांना संपर्क साधून घटनास्थळी बोलावले. दरम्यान, अजगराने नुकतीच मोठी शिकार गिळल्यामुळे तो एका ठिकाणी सुस्त अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्रांची टीम घटनास्थळी दाखल झाली. अत्यंत सावधगिरीने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने सर्पमित्रांनी कुटारातून अजगराला सुखरूप बाहेर काढले. कोणतीही इजा न पोहोचवता अजगराचे सुरक्षितपणे रेस्क्यू करण्यात आले. या मोहिमेत सर्पमैत्रीण संघटना पाटील, शुभम वानखडे, चेतन वानखडे आणि मनोज हटवार यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे मोठ्या अजगराला सुरक्षितपणे पकडण्यात यश आले. सर्पमित्रांनी दाखविलेली तत्परता, धाडस आणि कौशल्य यामुळे संभाव्य धोका टळला.सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे अजगराला सुरक्षित जीवदान मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नागरिकांनी अशा प्रकारे साप आढळल्यास घाबरून न जाता त्याला हाताळण्याचा प्रयत्न न करता तातडीने सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी संघटना पाटील यांनी केले.

नांदगाव बस स्टॅन्ड ते आठवडी बाजार

असून चांदुर रेल्वे पर्यंत सदर रस्त्याचे काम होत आहे, पुढे नांदगाव खंडेश्वर बस स्टँड पर्यंत हा रस्ता सिमेंट कॉंक्रेटचा होण्यासाठी प्रस्तावित आहे. त्यामुळे चांदुर रेल्वे रोडला लागूनच नांदगाव खंडेश्वर येथे आठवडी बाजार ते बस स्टँड पर्यंत दोन्ही साईडने नाली व रस्त्याच्या मध्यभागी डिव्हायडर बसविण्यात यावे. नांदगाव खंडेश्वर येथे दर शनिवारी आठवड्याचा बाजार असतो आणि या रोडच्या दोन्ही बाजूंनी नांदगाव येथे मोठे व्यापारी प्रतिष्ठान आहे. त्यामुळे या रस्त्याने नागरिकांची नेहमी वर्दळ राहते. तेव्हा या रस्त्यावर आठवडी बाजार ते बस स्टॅन्ड पर्यंत डिव्हायडर आवश्यक आहे. तसेच या रोडच्या दोन्ही बाजूला दोन फुटाची नाली करून ३६ फुटाचा रस्ता केल्यास शहराच्या विकासात भर पडेल. त्यामुळे नांदगाव खंडेश्वर येथे सदर रस्त्याच्या कामात बस स्टॅन्ड ते आठवडी बाजार पर्यंत डिव्हायडर बसविण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक प्रकाश मारोटकर यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यांचे सह या विभागाचे आमदार प्रताप अडसड, रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता व जिल्हाधिकारी यांना सुद्धा निवेदन देण्यात आले.

फायनान्स कंपनीच्या मनमानीवर

अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने संतप्त झालेल्या गोपाल अरबट यांनी थेट घटनास्थळी धाव घेतली.

अवधूत नगर येथे जाऊन पाहणी केल्यानंतर गोपाल अरबट यांनी स्वतः सिल लावलेल्या घराचे कुलूप तोडले आणि त्या अन्यायग्रस्त कुटुंबाला त्यांच्या हक्काच्या घरात पुन्हा प्रवेश मिळवून दिला. त्यांच्या या धाडसी कृतीचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.

यावेळी त्यांच्यासोबत अतुल सगणे, राहुल भुंबर, विनय गावंडे, तुषार चौधरी, नागोराव केने , काळे पाटील, महेंद्र भांडे यांच्यासह शिवसैनिक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. फायनान्स कंपन्यांच्या दादागिरीला आळा घालण्यासाठी शिवसेना सदैव गरिबांच्या पाठीशी उभी राहील, असा इशारा यावेळी गोपाल अरबट यांनी दिला.

एफडीएचा छापा; भेसळयुक्त

वैध परवान्याशिवाय कारखाना सुरू असल्याचे उघड झाले. यावेळी संशयित भेसळयुक्त शेव आणि रसगुल्ल्यांचा हजारो रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

अन्न सुरक्षा अधिकारी अदिती देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान शेव नमकीन, रसगुल्ला आणि पेढा या खाद्यपदार्थांचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी घेण्यात आले. हे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात येणार आहेत. तपासणीदरम्यान शेव आणि रसगुल्ल्यांचा दर्जा संशयास्पद आढळल्याने अधिकाऱ्यांनी हा साठा ताब्यात घेतला. यात १८ हजार ७५० रुपये किमतीची ७० किलो शेव नमकीन आणि ८ हजार ४०० रुपये किमतीच्या रसगुल्ल्यांचा समावेश आहे. दोन्ही खाद्यपदार्थांमध्ये भेसळ किंवा निकृष्ट दर्जाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या मालासंदर्भात अन्न सुरक्षा प्रशासनाकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कारवाईत सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे संबंधित मिठाई व फराळ कारखाना कोणत्याही वैध परवान्याशिवाय सुरू असल्याचे समोर आले. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी अदिती देशमुख यांनी संबंधित प्रतिष्ठानाला तत्काळ व्यवसाय बंद करण्याची नोटीस बजावली.

दिवाळीसारख्या सणांच्या काळात मिठाई, फराळ आणि खाद्यपदार्थांची मागणी वाढते. याच संधीचा फायदा घेत काही व्यावसायिकांकडून निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त पदार्थ विकले जाण्याची शक्यता असते. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा व्यावसायिकांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन
किरकोळ अर्ज क्र.२२९७/२०२६
सैय्यद मूबीन व पाच वि.निरंक
पुढील ता.०३.१२.२०२६

अर्जदार :-
1. **Syed Mubeen Ahmad Syed Muneer,** Aged about 47 yrs. Occ.- Business R/o. Zamzam Hall road, Noor Nagar No.2, Amravati
2. **Syed Nadeem Sayed Muneer**, Aged about 37 yrs.,Occ.-Business
3. **Syed Mateen Sayed Muneer,** Aged about 40 yrs. Occ.- Business
4. **Zubaida Khatun Sayed Muneer,** Aged about 72 yrs. Occ.- Household Applicant No. 2,3,4 are R/o. Opp. Saifee School, Near Masjid Khairyya Nagar, Amravati
5. **Sajeda Parveen Bismilah Khan** Aged about 43 yrs. Occ.- Household R/o. Thugao Pipri, Tq. Chandur Bazar, Distt. Amravati
6. **Shaheda Parveen Shaikh Mumtaz** Aged about 45 yrs. Occ.- Household R/o. Vilayatpura, Tq. Achalpur, Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **Syed Muneera Syed Umar** हे दिनांक १५.०८.२०२४ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Syed Mubeen Ahmad Syed Muneer+5** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Syed Mubeen Ahmad Syed Muneer+5** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३१.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

-जाहीर नोटीस-

वि.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.चांदूर बाजार, जि. अमरावती
इतर कि.फौ.प्रकरण क्र.४००/२०२६ — ने.ता.०४/१२/२०२३

अर्जदार - **शशिकला रमेश सरादे (लग्नानंतरचे नांव)**
शशिकला रामचंद्र वानखडे (लग्नापुर्वी चे नांव)
वय ६६ वर्षे, धंदा- घरकाम
रा.विरुळ पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

गैरअर्जदार - **निबंधक,**
ग्रामपंचायत कार्यालय, विरुळपुर्णा
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अ अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, विरुळ पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार **शशिकला रामचंद्र वानखडे जन्माची** नोंद घेण्याकरिता अर्ज जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १३ (३) आणि जन्म-मृत्यू नोंदणी नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.त्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदार **शशिकला रामचंद्र वानखडे यांच्या जन्माची दि.२७.१०.१९६० रोजी मौजा विरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झाला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दि.३१/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक - ३१/१०/२०२६
शिक्का
आदेशानुसार
सही/-
(सहायक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर),
चांदूर बाजार

-जाहीर नोटीस-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी जि.अमरावती
आर.एम.जे.सी.क्र.७३०/२०२६ — ने.ता.२१.१२.२०२६

अर्जदार -
१. **मिना विठ्ठलराव कोंडे,** वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
२. **अक्षय विठ्ठलराव कोंडे,** वय ३८ वर्षे, धंदा - मजुरी
३. **प्रतिक विठ्ठलराव कोंडे,** वय ३४ वर्षे, धंदा - मजुरी
रा. अर्जदार क्र.१ ते ३ रामजीबाबा नगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

बॉम्बे रेग्युलेटशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **विठ्ठलराव नरहरी कोंडे हे दि.१२/०५/२०२६ रोजी रामजी बाबा नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती मरण पावले.** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदार वारस असल्याने त्यांना कार्यालयीन शासकीय/निमशासकीय कामाकरिता वारसाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) मोर्शी येथील न्यायालयात **आरएमजेसी नं.७३०/२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअथी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०३/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी

जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **सय्यद वसिम सय्यद हुसेन,रा.कामरगांव, ता.कारंजा लाड, जि.वाशिम** यांच्या मालकीत व ताब्यात मौजे - कामरगाव, ता.कारंजा लाड, जि.वाशिम येथील सर्व्हे नं.५८९ (संगणकीय ७/१२ प्रमाणे सर्व्हे नं.५८९/१) या मधील लेआउट प्लॉट नं.१७ याचे क्षेत्र २२० चौ.मी. म्हणजेच २३६७.२० चौ.फुट व त्यावरील बांधकामासह ही मिळकत त्यांनी दि. २२.१०.२०२१ रोजीचे खरेदीखत दस्त अ.क्र.५८२६ नुसार संदीप मारोती गावंडे, यांचेकडून खरेदी केलेली आहे. त्या अगोदर संदीप मारोती गावंडे यांनी सदर मालमत्ता दि.०४.०३.२०२१ रोजीचे खरेदीखत दस्त अ.क्र.१६७९ नुसार फिरोज हुसेन सरवैया यांचे कडून खरेदी केलेली होती.

सदर मालमत्ता चे सय्यद वसिम सय्यद हुसेन यांचे जवळ दि.२२.१०.२०२१ रोजीचे खरेदीखत दस्त अ.क्र.५८२६ चे मुळ दस्त आहेत, **परंतु दि.०४/०३/२०२१ रोजीचे खरेदीखत दस्त अ.क्र.१६७९ चे मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकाराकडून गहाळ झालेले आहेत.

तरी माझे वरील नामे पक्षकार सय्यद वसिम सय्यद हुसेन यांना सदर मिळकत गहाण करावयाची आहे, तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहिर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक ०२/१०/२०२६
अमरावती.

स्वाक्षरी/-
ॲडव्होकेट
राहुल व्ही.मोहोड
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

जाहीर नोटीस

मी **मदनलाल साहू (घासलेटवाले),रा.मोरबाग, अमरावती, ता.जि.अमरावती** आज रोजी सर्व लोकांना सुचित करतो की,

माझा लहान मुलगा नामे **अनुप मदनलाल साहू** हा आता पर्यत माझ्या सोबत राहत होता. मी त्याचे लग्न दिनांक ०९/१२/२०२० रोजी लावून दिलेले असून त्याला लग्न संबंधातून एक मुलगा श्रीयांश असून तो आपल्या कुटुंबियासोबत राहत होता. परंतु मागिल काही महिन्यांपासून त्याच्या व त्याच्या पत्नीच्या वागणुकीत अचानक बदल झाला व ते दोघेही माझा अतिशय मानसिक, शारिरिक छळ करुन माझ्या प्रॉपटी करिता व माझ्या पैशाकरिता ते माझा छळ करीत आहेत व ते माझी सर्व प्रॉपटी व पैसा हडप करण्याच्या प्रयत्नात आहे.

माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू हयाला मी जेव्हा काही सांगितले तर तो माझ्यावर रागावून मला काहीही उलटसुलट जबाब देतो व त्या रागाच्या भरात तो दारु पिऊन भांडणतंटा वादविवाद करतो, तसेच अनुप मदनलाल साहू हयाने लोकांकडून व्याजाने पैसे घेत असून तो कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे ते लोक माझ्याकडे सदरची रक्कम परतफेड करण्याकरिता तगादा लावीत आहे व मला शिविगाळ करुन धमकावित आहे. वास्तविकतः माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू याला मी यापूर्वी माझे सर्व प्रकारचे व्यवहार व ईस्टेटीपासून वेगळे केलेले आहे.

माझा व माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू आता आमचा काही एक संबंध नसून यापुढे त्याला त्याच्या आर्थिक व्यवहाराकरिता व कर्जा करिता मी जबाबदार राहणार नाही. सध्या मी माझा मोठा मुलगा अतिश मदनलाल साहू सोबत राहत असून तोच माझी काळजी घेत आहे.

भविष्यात माझ्या नावाचा वापर करुन माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू याने कोणाही सोबत कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार, कर्ज केल्यास ते माझ्यावर लागू व बंधनकारक राहणार नाही. माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू याच्या सर्व प्रकारच्या व्यवहाराशी, आर्थिक व्यवहाराशी, गैरकृत्याशी व त्यांनी घेतलेल्या उसनवार रकमेशी माझा कोणताही संबंध राहणार नाही व सदर उसनवार रकमेकरिता मी जबाबदार राहणार नाही याची लोकांनी नोंद घ्यावी. मी दिनांक २०/८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन,सिटी कोतवाली, अमरावती येथे त्याची व त्याची पत्नी प्रिया अनुप साहू याचे विरुध्द तक्रार दिली आहे.

माझा लहान मुलगा नामे अनुप मदनलाल साहू याने माझे नाव वापरुन कोणताही व्यवहार कोणासोबतही केल्यास त्याकरिता मी जबाबदार राहणार नाही, त्याकरिता संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

करिता जाहीर सूचना सादर.

दिनांक /१०/२०२६

स्वाक्षरी/-
मदनलाल साहू (घासलेटवाले)
रा.मोरबाग, अमरावती,
ता.जि.अमरावती

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७२८/२०२६ — ने.ता.२१.१२.२०२६

अर्जदार - १. श्री.दिलीप सतिशचंद्र गवई,
वय ५२ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.जवाहर कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचे काका नामे सुधाकर मोतीरामजी गवई **हे अविवाहीत असतांना** दि.०१/१०/२०२२ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती **येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.**

दिनांक- ०२/११/२०२६
शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीर नोटीस

प्रो.नं.२७५०/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.३१.१०.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील यू.एन.पाटील, सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
किरकोळ अर्ज क्र.४३७/२०२६ — ने.ता.०३.१२.२०२६

अर्जदार -
१. **विमल रघुनाथ गवई,** वय ७९ वर्षे, धंदा - काही नाही
२. **राजकुमार रघुनाथ गवई,** वय ४५ वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा.अशोकनगर दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रघूनाथ तोरणाजी गवई** हे दिनांक १०.१०.२०१९ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन :- मयत रघूनाथ तोरणाजी गवई यांच्या नावे मौजे- दर्यापूर, ता.दर्यापूर, येथील सिट नं. ३२ क्षेत्र ७७.८ चौ.मी. जमीन असून सदर जागेची किंमत १०,०००/- इतकी आहे.

आज दि.३१.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७१९/२०२६ — ने.ता.०३.१२.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती कमलाबाई सुखदेवराव खडसे,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री अरुण सुखदेवराव खडसे,** वय ६० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.पिंपळखुटा (लहान), ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.इंदू पुरुषोत्तम खंडारे,** वय ६५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.चिखलसावंगी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **श्री.प्रमोद सुखदेवराव खडसे,** वय ५३ वर्षे, धंदा - नोकरी
रा.रुख्मीणी नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडिल नामे **सुखदेव मोतीरामजी खडसे** हे **दिनांक १३/०२/२०२५** रोजी **पिंपळखुटा (लहान), ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०२/११/२०२६
शिक्का
आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती येथील एस. डी. कमलाकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ४३४/२०२६ — प्रोसेस नं.२७२६/२०२६
ने.ता. २७/११/२०२६ — दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. शारदा श्रीकृष्णराव भगत, वय अं. ५४ वर्ष, धंदा - मजुरी २. सुरज श्रीकृष्ण भगत, वय अं. ३५ वर्ष, धंदा - मजुरी दोन्ही रा. सिव्हिल लाईन, दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की , श्रीकृष्ण लक्ष्मण भगत हे दिनांक ०९/०३/२०२४ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का
आदेशानुसार
सहा अधिक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाला बळ

वाशिम जिल्हा प्रशासन आणि 'डब्ल्यूओटीआर'मध्ये सामंजस्य करार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करून जलसुरक्षा, कृषी उत्पादकता आणि ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. विदर्भ जल संवर्धन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासन आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (डब्ल्यूओटीआर) यांच्यात ३० ऑक्टोबर रोजी सामंजस्य करार करण्यात आला.



६ हजार ८२८ कुटुंबांना होणार लाभ

या करारावर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, तर डब्ल्यूओटीआरच्या वतीने संस्थेचे कार्यकारी संचालक प्रकाश केसकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या.मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता हरेंद्र वाघमारे,प्रादेशिक व्यवस्थापक शरद भनगडे, प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण वरकर व विजय बनसोडे, तसेच एचडीएफसी बँकेचे समूह प्रमुख राजकुमार पोजगे आणि जिल्हा व्यवस्थापक राम शर्मा यांची उपस्थिती होती. विदर्भ जल संवर्धन कार्यक्रमाचा उद्देश नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन, शेतीची उत्पादकता वाढविणे आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी बळकट करून ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावणे हा आहे. विदर्भातील सात जिल्ह्यांमधील नऊ तालुक्यांतील ५३५ गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. यामध्ये ३५० गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांच्या अभिसरणातून, तर १८५ गावांमध्ये एचडीएफसी परिवर्तनच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत.

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात या कार्यक्रमांतर्गत एचडीएफसी परिवर्तनच्या सहकार्याने २० गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमधील ६ हजार ८२८ कुटुंबांतील ३१ हजार २९१ नागरिकांना या प्रकल्पाचा लाभ अपेक्षित आहे.

जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि शेतीला प्राधान्य

या कार्यक्रमांतर्गत डोंगरमाथ्यापासून ते दरीपर्यंत एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाची कामे करण्यात येणार आहेत. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, भूजल पुनर्भरण वाढविणे, जलसाठा संरचनांचे बळकटीकरण आणि जमिनीची पाणीधारण क्षमता वाढविणे यावर भर राहणार आहे. शेतकऱ्यांना प्रात्यक्षिके, प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनाच्या माध्यमातून सुधारित कृषी पद्धतींचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. यामध्ये पीक पद्धतीत सुधारणा, शेतीची उत्पादकता वाढविणे तसेच पशुपालन आणि लघुउद्योगांसारख्या पूरक व्यवसायांना चालना देण्याचा समावेश आहे. महिला आणि कुटुंबांच्या उपजीविकेसाठीही विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

रतनवाडीत शेतात गांजाची लागवड; १५ किलो गांजा जप्त



■ प्रतिनिधी | मानोरा ■

७० वर्षीय शेतकऱ्याला पोलिसांनी घेतले ताब्यात; २ लाख २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

मानोरा पोलीस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या रतनवाडी येथील एका शेतात गांजाची लागवड करण्यात आल्याची गुप्त माहिती ठाणेदार नैना पोहेकर यांना २ नोव्हेंबर रोजी मिळाली. या माहितीच्या आधारे सायंकाळी ५ वाजता कारंजा उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे, ठाणेदार नैना पोहेकर आणि तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी संबंधित शेतात धाड टाकली.

यावेळी नारायण किसन व्यवहारे (वय ७०) यांच्या शेतात १५ किलो २२५ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी हा गांजा जप्त केला असून, प्रतिकिलो १५ हजार रुपये दराने त्याची किंमत २ लाख २६ हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी नारायण व्यवहारे यांना ताब्यात घेऊन मानोरा पोलीस स्टेशनला आणण्यात आले. त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत कारवाईची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे, ठाणेदार नैना पोहेकर, फॉरेन्सिक लॅब पथक, पोलीस उपनिरीक्षक अनिल इंगळे, राधेश्याम महल्ले, रोहन तायडे, गोकुळ पांडुळे, सुषमा लोखंडे तसेच चालक विजयसिंग राठोड यांनी केली.

बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरी गीतांनी गणेशपुरात रसिक मंत्रमुग्ध



■ प्रतिनिधी | वाशिम ■

धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त गणेशपुर येथील आनंद बुद्ध विहारात सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण कला क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर गीतगायन व प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुंबई येथील सुप्रसिद्ध शाहीर कमलेश शेजुळे व गायिका उषाताई शेजुळे यांनी बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित प्रबोधनात्मक गीते सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या दमदार गायनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेशपुरचे माजी सरपंच तथा लोककलावंत मधुकर साबळे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये ज्येष्ठ कलावंत शाहीर रतन हाडे, संस्थाध्यक्ष शाहीर संतोष खडसे, सुरेश भालेराव व सामाजिक कार्यकर्ते झुंबर वाघमारे यांचा समावेश होता.

नालंदा नगरात भारतीय संविधान ग्रंथवाचनाचा समारोप

■ प्रतिनिधी | वाशिम ■



९५ दिवसांच्या नियमित वाचन उपक्रमाची सांगता; तीन ग्रंथवाचकांचा शाल, पुष्पहार व संविधान ग्रंथ देऊन सन्मान

येथील नालंदा नगरातील त्रिरत्न बुद्ध विहारात आषाढ पौर्णिमेपासून सुरू असलेल्या भारतीय संविधान ग्रंथवाचन उपक्रमाचा रविवार, १ नोव्हेंबर रोजी समारोप करण्यात आला. यानिमित्त नियमितपणे ग्रंथवाचन करणाऱ्या तीन मान्यवरांचा शाल, पुष्पहार आणि भारतीय संविधानाची प्रत भेट देऊन गौरव करण्यात आला.

त्रिरत्न बुद्ध विहार येथे दररोज रात्री ८ ते ९ या वेळेत भारतीय संविधान ग्रंथाचे नियमित वाचन करण्यात येत होते. या उपक्रमाचा समारोप अष्टमी उपोसथाच्या दिवशी भंते प्रज्ञापाल महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी जनार्दन गवई, लोककवी विलास भालेराव, वामनराव नवघरे, त्रिरत्न बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष दिलीप गवई, धम्मपाल कांबळे, दिलीप ठोसरे व रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या समारोपानिमित्त खीरवाटपही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भंते प्रज्ञापाल महाथेरो यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले. त्यानंतर दिलीप गवई यांनी प्रास्ताविकातून ग्रंथवाचन उपक्रमाची माहिती दिली. आषाढ पौर्णिमेपासून अश्विन अष्टमीपर्यंतच्या ९५ दिवसांच्या कालावधीत भारतीय संविधानातील ३९५ कलमांचे नियमित अध्ययन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमात अॅड किशोर पडघान, अॅड प्रा. मुकुंद वानखडे आणि आदर्श शिक्षक संजय भीमराव पडघान यांनी ग्रंथवाचनाची जबाबदारी पार पाडली. तसेच नियमितपणे ग्रंथश्रवणासाठी उपस्थित राहणाऱ्या उपासक व उपासिकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी ग्रंथवाचन करणारे अॅड. किशोर पडघान, अॅड. प्रा. मुकुंद वानखडे आणि आदर्श शिक्षक संजय भीमराव पडघान यांचा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्सव समिती, नालंदा नगरचे अध्यक्ष सूरज संतोष ठोके, निखिल दौलत कांबळे व अतुल साबळे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार आणि भारतीय संविधानाची प्रत भेट देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्सव समितीचे पदाधिकारी व सदस्य, तसेच नालंदा नगरातील बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री शिवाजी विद्यालयामध्ये जलसंवाद जाणीव व जागृती कार्यक्रम संपन्न




■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम येथे जलसंवाद जाणीव व जागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शाळा समिती अध्यक्षा आदरणीय सौ.अनिताताई सरनाईक या होत्या. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती तसेच मार्गदर्शक म्हणून शिक्षणाधिकारी भुसारे , डॉ. हरीश बाहेती, जलतज्ज्ञ सुभाष नानोटे, अविनाश मारशेटवार, उपशिक्षणाधिकारी ऐंगुलवार विस्तार अधिकारी अवचार वास्तुतज्ज्ञ मेहेकरकर सामाजिक कार्यकर्त्या सोमाणी , टेकाळे , प्रसिद्ध गायक शेख मोबीन, शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य संजयराव घुगे व उपप्राचार्य गजाननराव रावले उपस्थित होते. कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना सौ. अनिता सरनाईक यांनी पाणी वाचवा, जीवन वाचवा हा संदेश देत पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आणि जलसंधारणाची सवय प्रत्येकाने लावावी, असे आवाहन केले. तसेच शाळेमार्फत पाणी बचतीबाबत जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांनी विद्यार्थ्यांना पाण्याचा योग्य वापर, पाणी बचत आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

वाशिमच्या पाटणी चौकातील अवैध देहव्यवसायाचा प्रश्न ऐरणीवर!

बालाजी पार्किंग परिसरातील प्रकाराची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची व्यापारी व नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



शहरातील पाटणी चौकाजवळील बालाजी पार्किंगच्या मागे सुरू असल्याचा आरोप असलेल्या अवैध देहव्यवसायामुळे परिसरातील व्यापारी, रहिवासी, विद्यार्थी व नागरिकांमध्ये चिंता आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकाराची गोपनीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील व्यापारी व नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात अल्पवयीन मुलींचे शोषण, मानवी तस्करीची शक्यता, शाळकरी मुला-मुलींची सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक वातावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी, प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात तसेच तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवून त्यांना संरक्षण द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर मोहम्मद शहजाद मो. एजाज, राम दशरथ लोखंडे, देवानंद उत्तम कांबळे, अमोल रमेशराव हेंडे, गणेश ज्ञानबा शेलके, सय्यद आतिफ, उमेश मुंडा, सुशील ट्रेडर्सचे प्रतिनिधी, न्यू विजय कृषी सेवा केंद्राचे प्रतिनिधी, सय्यद राजीक, प्रकाश किशनराव खोडेकर, नितीन, आकाश प्रमोद कांबळे, गायत्री आकाश कांबळे यांच्यासह एकूण २८ व्यापारी व नागरिकांच्या सह्या आहेत. सदर निवेदन दि. २७ ऑक्टोबर रोजी सादर करण्यात आले असून, प्रशासनाने या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन परिसर सुरक्षित करावा.

खेत बचावो अभियानांतर्गत बेंबळा येथे नैसर्गिक शेती व पोषण परसबागेवर कार्यशाळा संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

खेत बचावो अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने मौजे बेंबळा येथे 'नैसर्गिक शेती व पोषण परसबागेच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबाची अन्नसुरक्षा' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

यावेळी गृहविज्ञान विषयतज्ज्ञ सौ. शुभांगी वाटाणे यांनी नैसर्गिक शेती, मृदा आरोग्य संवर्धन, सुरक्षित अन्न उत्पादन आणि पोषण परसबागेचे महत्त्व याविषयी शास्त्रीय मार्गदर्शन केले. घराच्या परिसरात विविध हंगामी पालेभाज्या, फळभाज्या व कडधान्यांची लागवड करून कमी खर्चात कुटुंबाची अन्न व पोषण सुरक्षा साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात महिला शेतकऱ्यांना पोषण परसबाग बियाणे किटचे वाटप करण्यात आले.

तसेच परसबाग निर्मिती व भाजीपाला लागवड तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करण्यात आले. गावातून जनजागृती रॅली काढून नैसर्गिक शेती, सुरक्षित अन्न आणि पोषण सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

भीमाशंकर पर्वतरांगेतील वृक्षतोड थांबवण्याची मागणी; निवेदनाद्वारे दिला आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे टोरंट पॉवर कंपनीच्या ऊर्जा प्रकल्पासाठी सह्याद्री भीमाशंकर पर्वतरांगेत हजारो दुर्मिळ वृक्षांची कत्तल होत असल्याचा आरोप करत माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या मालेगाव शाखेने तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात २९ ऑक्टोबर २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देण्यात आले.

भीमाशंकर परिसर जैवविविधतेने समृद्ध असून महाराष्ट्राचे नैसर्गिक वैभव आहे. अशा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात प्रकल्प राबविणे चुकीचे असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. शासनाने वृक्षतोड तातडीने थांबवून निवेदनाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भीमाशंकर पर्वतरांगेतील प्रकल्पासाठी सुरू असलेली वृक्षतोड कायमस्वरूपी थांबवावी, प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक परवान्यांची पुनर्तपासणी करावी आणि प्रकल्प अन्य पर्यायी मोकळ्या किंवा पडीक जागेत स्थलांतरित करावा, अशा तीन मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. निवेदनावर माणिक खिमाजी डोंगरे, अतुल ज्ञानदेव ढगाले, मिलिंद राघोजी खरात, कवि लक्ष्मण राठोड, विशाल संतराम ताले, शंकर नामदेव डडोके, अनिल गंगाराम जाधव आणि शरद सोनोने यांच्या सह्या आहेत.



राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

आम्ही विकासाच्या विरोधात नाही; मात्र जंगलांचा विनाश करून होणारा विकास मान्य नाही, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे. शासनाने लोकभावनेचा आदर न केल्यास संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण देण्यासाठी शासनाने सुधारित धोरण निश्चित केले आहे.

शासन निर्णयानुसार, सन २००५ ते २०२८ या कालावधीतील सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये समाविष्ट असलेले खेळ तसेच देशी व लोकप्रिय खेळांचा या धोरणात समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार जलक्रीडा, तिरंदाजी, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बास्केटबॉल, बॉक्सिंग, कॅनो-कयाक, सायकलिंग, घोडेस्वारी, तलवारबाजी, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, हँडबॉल, हॉकी, ज्युदो, मॉडर्न पेंटॅथलॉन, रोइंग, सेलिंग, नेमबाजी, टेबल टेनिस, तायक्वांदो, टेनिस, ट्रायथलॉन, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टिंग, कुस्ती, गोल्फ, रग्बी सेव्हन्स, स्केटबोर्डिंग, सर्फिंग, स्पोर्ट क्लाइंबिंग, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, बुद्धिबळ आणि क्रिकेट या ३६ खेळांचा समावेश आहे.असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, वाशिम यांनी कळविले आहे.

वडिलांच्या मित्राच्या पुढाकारातून विद्यार्थ्याला मिळाला आधार

प्रवीण गोटे यांच्या प्रयत्नांना यश; अध्ययन डिफेन्स अकॅडमीची संपूर्ण फी माफ करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाकडून पुढाकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वडिलांच्या निधनानंतर आर्थिक आणि भावनिक संकटाचा सामना करणाऱ्या एका विद्यार्थ्याला त्याच्या वडिलांचे मित्र शिक्षक प्रवीण गोटे यांनी मदतीचा हात देत मोठा आधार दिला आहे. विद्यार्थ्याच्या परिस्थितीची दखल घेत त्यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्याच्या उच्चमध्ये जाण्याच्या स्वप्नाला नवी उमेद मिळाली आहे.

वडिलांचे छत्र हरपल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यासमोर शिक्षण आणि भविष्याचा प्रश्न निर्माण झाला होता. अशा कठीण परिस्थितीत वडिलांचे मित्र प्रवीण गोटे यांनी विद्यार्थ्याला मदत करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ओम वळोकर यांच्याशी संपर्क साधून विद्यार्थ्याची परिस्थिती मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले.

यानंतर मुख्यमंत्री कार्यालयातील उपसचिव तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय स्वीय सहाय्यक अमोल पाटणकर यांनी विद्यार्थ्याच्या परिस्थितीची सहानुभूतीपूर्वक दखल घेत अध्ययन डिफेन्स अकॅडमीचे सह-संस्थापक चापुत चकमा यांच्याशी संपर्क साधला. विद्यार्थ्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन अकॅडमीची संपूर्ण फी माफ करण्यासाठी त्यांनी विनंती केली. या सहकार्यामुळे विद्यार्थ्याला मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.



प्रवीण गोटे यांच्या संवेदनशील पुढाकारामुळे अडचणीच्या काळात विद्यार्थ्याला मदतीचा आधार मिळाला असून, त्याच्या उच्चमध्ये जाण्याच्या ध्येयाला बळ मिळाले आहे. केवळ सहानुभूती व्यक्त न करता गरजू विद्यार्थ्याच्या भवितव्यासाठी प्रयत्न करण्याच्या त्यांच्या भूमिकेचे कौतुक होत आहे.

या मदतीबद्दल विद्यार्थ्याने प्रवीण गोटे , ओम वळोकर आणि अमोल पाटणकर यांचे आभार मानले आहेत. आपल्यावर दाखविण्यात आलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा निर्धारही त्याने व्यक्त केला आहे.दरम्यान, स्वर्गीय शिक्षक विश्वनाथ दगडूजी शिंदे यांच्या ६० टक्के अंशतः अनुदानित सेवेच्या अनुषंगाने त्यांच्या कुटुंबाला शासन नियमानुसार मिळणारे आर्थिक लाभ, आर्थिक सहाय्य आणि इतर पात्र सवलती मिळवून देण्यासाठीही लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

शिंदेंच्या पत्नीला नोकरीत घेण्याचे प्रयत्न!

विश्वनाथ शिंदे यांचे निधन झाल्याने त्यांचा परिवार आर्थिक संकटात सापडला आहे. या संकटात त्यांना दिलासा देण्यासाठी जिल्हाभरातील शिक्षक आर्थिक मदत करीत आहेतच. शिवाय शिंदे यांच्या पत्नीला नोकरीत घेण्याचे प्रयत्न सहकारी शिक्षक करीत आहेत, अशी माहिती शिक्षकांकडून देण्यात आली.

या सहकाऱ्यांनी दाखविलेल्या संवेदनशीलतेमुळे शोकाकुल कुटुंबाला काहीसा आर्थिक आधार मिळणार आहे. शिक्षकांनी जपलेली एकजूट आणि सामाजिक बांधिलकी परिसरात आदर्श ठरत आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३७ ■ बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

महसूलप्रमाणे अन्य विभागांनी देखिल सेवा उपलब्ध करून द्याव्या-संदीप देशमुख

अधिसूचित सेवा व अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा

जिल्ह्याच्या कामाचे आयुक्तांकडून कौतूक

वर्धा जनमाध्यम : महसूल विभागाच्यावतीने पुरविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या सेवा तत्परतेने नागरिकांना उपलब्ध होतात. त्याच धर्तीवर इतर विभागांनी देखील लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत आपल्या अधिसूचित सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश नागपूर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त संदीप देशमुख यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयुक्तांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी तसेच याअंतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, निवासी उपजिल्हाधिकारी राजू रणविर व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



वर्धा जिल्ह्यात लोकसेवा हक्क अधिनियमांर्गत नागरिकांना सेवा देण्याचे चांगले काम होत आहे. शासनाच्या विविध १ हजार २१२ सेवा अधिनियमांतर्गत आणून कालमर्यादेत त्या उपलब्ध करून देण्याचे बंधण घालण्यात आणले आहे. या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे श्री.देशमुख यांनी सांगितले.

सेवा हक्क अधिनियम नागरिकांना कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आहे. त्यामुळे विभागांनी वेळेची मर्यादा पाळली पाहिजे. ज्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित नाही, त्या सेवा देखील अधिसूचित सेवा गृहीत धरून वेळेत दिल्यास नागरिकांना आपण चांगला दिलासा देऊ शकू, या भावनेने काम करावे, असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी अधिनियमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा प्रत्येक आठवड्यात आढावा घेण्यात येतो. जिल्ह्यात काही सेवा तालुकास्तरावरुन देखील उपलब्ध करून दिल्या जातात. तालुका व ग्रामस्तरावर विशेष शिबिरे घेऊन जिल्ह्यात सेवा उपलब्ध करून देण्याचे काम होत असल्याचे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवांची माहिती दिली.

जिल्ह्यात महसूल, ग्रामविकास व सेतू अशा तीन यंत्रणांद्वारे कार्यान्वित १३२६ आपले सरकार सेवा केंद्र आहे. या केंद्रांद्वारे ऑनलाईन अर्ज स्विकारून सेवा दिल्या जातात. जिल्ह्यात २२ ग्रामपंचायतींच्या ठिकाणी आदर्श आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यात येत आहे. जिल्ह्यात अधिनियमांतर्गत कालमर्यादेत पुरविण्यात येणाऱ्या सेवांची टक्केवारी तसेच विविध विभागांच्या कामाची माहिती यावेळी सादर करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी राजू रणविर यांनी अधिनियमांतर्गत जिल्ह्याचा आढावा सादर केला.

रेती वाहतुकीच्या करात लाखोंचा घोळ, सालफळ ग्रामपंचायत संशयाच्या भोवऱ्यात

सामाजिक कार्यकर्ते प्रवीण धानके यांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार, चौकशी समिती नियुक्त

विरूळ (आकाजी), जनमाध्यम : आर्वी तालुक्यातील सालफळ ग्रामपंचायतीमध्ये रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून वसूल करण्यात आलेल्या कराच्या रकमेत गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. लाखो रुपयांच्या या कर वसुलीचा हिशेब संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली आहे.

सालफळ येथील वर्धा नदीच्या रेती घाटातून मोठ्या प्रमाणात रेती वाहतूक केली जाते. अवजड वाहनांमुळे गावातील रस्त्यांची दुरवस्था होत असल्याच्या तक्रारीनंतर ग्रामपंचायतीने रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कर आकारणी सुरू केली होती. या माध्यमातून लाखो रुपयांचा महसूल जमा झाल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र, या रकमेचा विनियोग आणि आर्थिक व्यवहारांमध्ये सरपंच व ग्रामसेवकांनी गैरव्यवहार केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते प्रवीण धानके यांनी केला आहे.

यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आर्वीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, पंचायत समिती आर्वी येथे तक्रार प्राप्त झाली असून, चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. समिती उद्या सालफळ येथे जाऊन चौकशी करणार असल्याची माहिती ग्रामविस्तार अधिकारी संगीता गोरे यांनी दिली. तर ग्रामसेवक नितीन साव यांनी या प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगत चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होईल, अशी भूमिका मांडली.

आता चौकशीतून कर वसुलीचा नेमका हिशेब आणि कथित गैरव्यवहाराचे सत्य बाहेर येणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

एसटी प्रशासनाला कामगारांचा इशारा; ५ नोव्हेंबरपासून बेमुदत धरणे

वेतनवाढ, भत्ते आणि २५ हजारांच्या दिवाळी भेटीची मागणी

वर्धा जनमाध्यम: एसटी महामंडळाचा गाडा रात्रंदिवस ओढणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याच आर्थिक प्रश्नांकडे प्रशासनाने पाठ फिरवल्याने कामगारांचा संताप उफाळला आहे. थकीत वेतनवाढ, घरभाडे व महागाई भत्ता, दिवाळी भेट आणि सण अग्रिम अशा मागण्यांसाठी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे.

३ नोव्हेंबरला घंटानाद, ४ नोव्हेंबरला धरणे, तर ५ नोव्हेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे. वर्धा विभागातील वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव आणि तळेगाव आगारांसह विभागीय कार्यशाळा व कार्यालयासमोर आंदोलन होणार आहे. कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपये दिवाळी भेट, १२ हजार ५०० रुपये सण अग्रिम, थकीत वेतनवाढीचा आर्थिक फरक, प्रलंबित भत्ते आणि निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी तातडीने देण्याची मागणी संघटनेने केली आहे. महागाईचा भार सहन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हक्काच्या पैशांसाठी आंदोलन करावे लागत असेल, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. कामगारांना केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष आर्थिक दिलासा हवा, अशी संघटनेची भूमिका आहे.

राज्याध्यक्ष संदीप शिंदे व महासचिव हनुमंतराव ताटे यांच्या नेतृत्वाखाली हा लढा उभारण्यात आला आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विभागीय सचिव शम्मी पठाण यांनी केले असून, मागण्या मान्य न झाल्यास संघर्ष तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

ग्रामीण मातीत फुलले प्रतिभेचे अणुऊर्जा पर्व दहेगाव गोसावीचा ऋषभ पाटील राष्ट्रीय स्तरावर झळकला

अणुऊर्जा महामंडळात निवड, वर्धा जिल्ह्याचा गौरव

सेलू जनमाध्यम : जिद्द असेल तर ग्रामीण भागातील मातीही प्रतिभेचे सोने घडवू शकते, याचा प्रत्यय सेलू तालुक्यातील दहेगाव गोसावी येथील ऋषभ दिलीप पाटील याने दिला आहे. अत्यंत खडतर स्पर्धेवर मात करीत त्याने भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडमध्ये (ञ्ज्ण्ष्ब्) निवड मिळवली आहे. ऋषभच्या या यशामुळे दहेगाव गोसावीच्या



शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण वर्धा जिल्ह्याची मान उंचावली आहे.

देशाच्या अणुविद्युत निर्मिती क्षेत्रातील महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणाऱ्या या प्रतिष्ठित सरकारी संस्थेत स्थान मिळविणे ही मोठी उपलब्धी मानली जाते. कठीण निवड प्रक्रियेतील गुणवत्ता सिद्ध करून ऋषभने हे यश संपादन केले.

ग्रामीण भागात राहूनही मोठी स्वप्ने पाहता येतात आणि मेहनतीच्या बळावर ती प्रत्यक्षात उतरवता येतात, हे त्याने दाखवून दिले. त्याच्या यशामागे असलेली जिद्द, सातत्य आणि मेहनत आज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ऋषभच्या या उल्लेखनीय यशाबद्दल दहेगाव गोसावी परिसरासह वर्धा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन होत आहे. एका गावातील तरुणाने देशाच्या महत्त्वपूर्ण ऊर्जा क्षेत्रात मिळवलेले हे स्थान अनेक युवकांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारे ठरणार आहे.

न्यायासाठी एसटी कर्मचाऱ्यांचा घंटानाद

आर्वी आगारातील अनोखे आंदोलन मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा



आर्वी जनमाध्यम : प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मंगळवारी आर्वी आगारात कर्मचाऱ्यांनी घंटानाद आंदोलन करीत शासन आणि प्रशासनाचा निषेध नोंदविला. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या नेतृत्वात ३, ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. त्यानुसार आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी आर्वी आगाराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर कर्मचारी एकत्र आले. हातात घंटा घेऊन जोरदार घोषणाबाजी करीत त्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर निवेदनाद्वारे तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनात सागर गोंडसे, रवी तराळे, रवींद्र गणेशकर, सरफराज नागोरी यांच्यासह आर्वी आगारातील मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते.

गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे खिसे कापणारी टोळी जेरबंद

बुलढाण्यातील चौघांना आर्वी पोलिसांनी ठोकल्या बेड्या, ३७ हजारांची रोकड अन् गुन्ह्यातील कार जप्त

आर्वी जनमाध्यम : बसस्थानकावरील गर्दीचा फायदा घेत प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या आंतरजिल्हा खिसेकापू टोळीचा आर्वी पोलिसांनी पर्दाफाश केला. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील चार आरोपींना जेरबंद केले. त्यांच्याकडून चोरीची संपूर्ण ३७ हजार रुपयांची रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली.



आर्वी तालुक्यातील जळगाव (बे.) येथील मुकुंद बाळकृष्ण नांदुरकर (७२) हे २२ ऑक्टोबर रोजी बँक ऑफ इंडियाच्या आर्वी शाखेतून ४७ हजार रुपये काढून गावाकडे जाण्यासाठी बसस्थानकावर आले होते. किराणा दुकानदाराला १० हजार रुपये दिल्यानंतर उर्वरित ३७ हजार रुपये त्यांनी खिशात ठेवले होते. बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या खिशातील रक्कम लंपास केली. याप्रकरणी २७ ऑक्टोबरला गुन्हा दाखल झाला होता.

पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अंबादास साळोकार (४४), अश्पाक पठाण (४५), शोहेब खा (२४) आणि संतोष शिंदे (३८) यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांच्याकडून ३७ हजार रुपये आणि एमएच ३७ जी ८२८८ क्रमांकाची कार जप्त करण्यात आली. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सतीश डेहनकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

जमीन दिली, आता रोजगारासाठी उठाबशा

प्रकल्पग्रस्तांचे अनोखे आंदोलन

वर्धा जनमाध्यम : विकासाच्या नावाखाली जमिनी घेतल्या, प्रकल्प उभारले; मात्र ज्यांनी आपल्या जमिनी आणि घरदाराचा त्याग केला, त्यांच्याच वाट्याला बेरोजगारी आली. सरकारच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी शिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्तांनी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात अनोखे आंदोलन केले. आंदोलन मंडपात उठाबशा काढून सरकार आणि प्रशासनाचा निषेध नोंदविण्यात आला. जमीन देऊन आम्ही नेमकी काय चूक केली असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. संजय धनाडे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. अमरावती येथील प्रकल्पग्रस्तांच्या मेळाव्यात आरक्षण वाढविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष खदखदत आहे. राज्यातील भरती प्रक्रियेत पदवीधर अंशकालीन संवर्गासाठी समांतर आरक्षणाच्या जागा उपलब्ध नसल्यास त्या पदांवर प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती करावी. एमपीएससीमार्फत भरण्यात येणाऱ्या अ, ब आणि क वर्गातील पदांवर संधी द्यावी, तर ड वर्गातील पदे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ज्येष्ठता यादीतून भरावीत, अशी मागणी करण्यात आली.



न्यायालयीन कर्मचारी गुरुवारी सामूहिक रजेवर

समान काम, समान वेतनासाठी आंदोलन, १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

हिंगणघाट जनमाध्यम : उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान काम, समान वेतन मिळावे, यासह विविध मागण्यांसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी सामूहिक रजेवर जाणार असल्याने न्यायालयीन कामकाज प्रभावित होण्याची शक्यता आहे. या आंदोलनात वर्धा जिल्ह्यातील चारही न्यायालयीन कर्मचारी संघटना सहभागी होणार आहेत. यासंदर्भात संघटनांनी हिंगणघाट तालुका वकील संघासह जिल्ह्यातील अन्य वकील संघटनांना पत्राद्वारे माहिती दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी उच्च न्यायालयाने दोन न्यायमूर्तींची विशेष समिती गठीत केली होती. या समितीने ३१ जानेवारी २०२५ रोजी समान काम, समान वेतनाच्या मागणीला अनुकूल अहवाल शासनाकडे सादर केला. मात्र, अद्याप शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार असून, मागण्यांची पूर्तता न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना

मुंबई जनमाध्यम : राज्यातील दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीने बाधित नागरिकांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीला आता सामाजिक सहभागाचे बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे. कंपन्या, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून अतिरिक्त निधी उभारून गरजूंना मदत केली जाणार आहे.

या सोसायटीच्या माध्यमातून हृदयरोग, कर्करोग, मूत्रपिंडविकार, मेंदूविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया तसेच महागडे आणि



दीर्घकालीन उपचारांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. दुर्मिळ आजारांवरील उपचार, औषधे आणि वैद्यकीय साहित्य यांसाठीही मदत करता येणार आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या आढावा बैठकीत सामाजिक दायित्वातून अतिरिक्त निधी उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार या सोसायटीची स्थापना करण्यात आली. रुग्णालये, स्वयंसेवी संस्था आणि कंपन्यांच्या सहभागातून वैद्यकीय मदतीचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वेळेवर आरोग्य क्षेत्रापुरतीच ही मदत मर्यादित राहणार नसून दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य संकटांतील बाधित कुटुंबांनाही सहाय्य केले जाणार आहे. गरिबांना आवश्यक वस्तूंचे वितरण, दिव्यांगांसाठी कार्यरत संस्थांना मदत तसेच आरोग्य शिबिरांचे आयोजनही करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी कंपन्या, संस्था आणि दानशूर व्यक्तींनी आर्थिक योगदान देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

दशरथ खराबे यांचे निधन

सेलू : तालुक्यातील घोराड येथील दशरथ कुशाबराव खराबे वय (५२) यांचा सावंगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यु झाला, त्यांच्या पश्चात आई पत्नी दोन मुले असा मोठा परिवार आहे, त्यांच्यावर अंत्यसंस्कार आज बुधवार रोजी घोराड येथील स्मशानभूमीत करण्यात येईल



नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर S2871848 वरील माझे MINHAZ MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील MINHAZ YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: वॉर्ड नं४ शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ४४५१०३

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नागपूर

दुरध्वनी क्र.०२५७/२२६०७७० ईमेल - mechdivngp@rediffmail.com

ई-निविदा सुचना क्र.१२, सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नागपूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून/ संस्थांकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचनाव ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. सदर कामाच्या निविदेत पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम	इसारा रक्कम	सुरक्षा ठेव रुपये	काम पूर्ण करण्याचा कालावधी	काम पूर्ण करण्याची पात्रता	मुल्य रु.
१.	बोर धरण प्रकल्प अंतर्गत वक्रद्वार आकार १२ X ५ मी.- ०९ संचाचे रबरसील बदलविणे, टर्न बकल पिनांना साफ करुन ग्रीसींग करणे, वक्रद्वार व संलग्न घटक भागास गंज रोधक रंगकामे करणे इ. देखभाल व दुरुस्तीची कामे	रुपये ३६६२०५६ जीएसटी वगळून	रुपये ३६७००	रुपये ७३४००	१२ महिने	कामाचा पुर्वानुभव असलेल्या पश्चात अर्हता निकश मध्ये पात्र होणारे कंत्राट-दारांकडून/संस्थां-कडून बी-१ निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सादर करतांना जलसंपदा विभागा-कडील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.	मुख्य निविदा कागदपत्रे रुपये २३६० + जीएसटी

ई-निविदेचे वेळापत्रक -

१) ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ - दि.०९.११.२०२६ सकाळी ११.०० वाजता
२) ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ व समाप्त दिनांक व वेळ - दि.०९.११.२०२६ सकाळी ११.०१ वा.पासून ते दि.२०.११.२०२६ संध्या.१८.०० पर्यंत
३) ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात व अंतिम दिनांक व वेळ - दि.०९.११.२०२६ सकाळी ११.०१ वा.पासून ते दि.२०.११.२०२६ संध्या.१८.०० पर्यंत
४) ई-निविदा तांत्रिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ - दि.२३.०९.२०२६ सकाळी १२.०० वा. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नागपूर यांचे कार्यालयात ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास)

नियम व अटी -

१) कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात नोटीस बोर्डावर सविस्तर नोटीस पहावयास मिळेल.
२) वरील निविदेमधील कामाच्या करारनाम्यात पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहेत.
३) संकेतस्थळावर प्रसिध्द होणाऱ्या नि विदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे. अन्यथा निविदा उघडल्यानंतर कोणतीही तकार स्विकारली जाणार नाही.
४) खालील ठिकाणी ई-निविदेबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
५) संकेत स्थळ http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

(स.सु.वाणी)
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग, नागपूर

(क.जिमाका-वर्धा/१५८/२०२६-२७)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला नवी गती मिळणार-प्रधानमंत्री

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआर क्षेत्र २०३० पर्यंत देशाचे महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



पुणे/प्रतिनिधी- पुणे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे नवी गती मिळणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगरदरम्यान मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे पुण्यातील मोठ्या आयटी क्षेत्राला अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. तसेच शहरातील जुन्या आणि नव्या भागांमधील संपर्क अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'च्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी चिंचवड महापौर रवी लांडगे, खासदार श्रीरंग बारणे उपस्थित होते.पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा, स्टार्टअप, नवोपक्रम आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असून, मेट्रोच्या वाढत्या सुविधांमुळे शहराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे नमूद करून प्रधानमंत्री म्हणाले, देशात २०१४ मध्ये केवळ २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यरत होते. आज हे जाळे सुमारे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज एक कोटीहून अधिक प्रवासी मेट्रोने प्रवास करीत आहेत. भारतीय मेट्रो नेटवर्क जगातील पहिल्या तीन मोठ्या मेट्रो नेटवर्कमध्ये गणले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रात २०१४ मध्ये केवळ १० ते ११ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू होता. आज सुमारे २०० किलोमीटर मेट्रो मार्ग सेवेत असून, ६८० किलोमीटरहून अधिक मार्गांची कामे सुरू आहेत. राज्यात मेट्रो पायाभूत सुविधांवर अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली असल्याचे श्री. मोदी म्हणाले.मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचतो, शहराची उत्पादकता वाढते आणि त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळते. पुणे मेट्रोचा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर उभारण्यात आला असून, सरकार आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नांतून विकासाची नवी संधी निर्माण होत आहे. शहरांची स्पर्धात्मकता आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.देशातील शहरांना विकासाची केंद्रे बनविण्यासाठी केंद्र सरकारने एक लाख कोटी रुपयांच्या अर्बन चॅलेंज फंडला मंजुरी दिली आहे. या माध्यमातून आगामी काळात शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होणार आहे. तसेच गेल्या १० ते १२ वर्षांत ५० कोटी लोकांना गरिबीतून बाहेर पडण्यास यश आल्याचा उल्लेख जागतिक बँकेच्या अहवालाच्या संदर्भाने त्यांनी केला. पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, विमानतळ, मेट्रो, वीज, पाणी आणि गॅस पाइपलाइनमधील गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे प्रधानमंत्री मोदी म्हणाले.

महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेने उभे असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले, शेतकऱ्यांनी काळजी करू नये, संकटाच्या काळात सरकार त्यांना मदत करेल. दिवाळीच्या सणात दुष्काळग्रस्त आणि संकटात असलेल्या शेतकरी कुटुंबांचाही विचार करून त्यांच्या घरातही सणाचा आनंद निर्माण होण्यासाठी सर्वांनी सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

देशातील मेट्रोचे जाळे १२०० किलोमीटरवर; २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू 'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'चे भूमिपूजन





२०३० पर्यंत पुणे, पिपरी-चिंचवड आणि पीएमआर क्षेत्रदेशाचे महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल-मुख्यमंत्री

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश (पीएमआर) परिसरात मेट्रो, इलेक्ट्रिक बस, इनर रिंगरोड, आउटर रिंगरोड, बोगदे आणि नव्या विमानतळासह आधुनिक वाहतूक सुविधांचे जाळे उभारण्यात येत आहे. या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून २०३० पर्यंत पुणे महानगर प्रदेश देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हिंजवडी आणि परिसर हा देशातील महत्त्वाचा आयटी हब आहे. या परिसरात दररोज हजारो कर्मचारी कामासाठी येतात. वाहतूक कोंडीमुळे त्यांना अनेकदा एक ते दोन तास अडकून पडावे लागते. मेट्रो सुरू झाल्यामुळे आयटी क्षेत्रातील कर्मचारी, विशेषतः तरुण- तरुणींना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन २०१८ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्यांच्याच हस्ते या प्रकल्पाचे लोकार्पण होत असल्याचा आनंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. देशात सार्वजनिक-खासगी भागीदारीतून (पीपीपी) मेट्रो प्रकल्प उभारण्याच्या धोरणानंतर शिवाजीनगर-हिंजवडी हा पहिला प्रकल्प ठरला. डीबीओटी तत्त्वावर टाटा प्रोजेक्ट्स आणि सीमेन्स यांनी या प्रकल्पाची उभारणी केली. केंद्र व राज्य सरकारचे सहकार्य, व्यवहार्यता तफावत निधी आणि महाराष्ट्र सरकारकडून करण्यात आलेले जमीन संपादन यामुळे हा प्रकल्प पूर्णत्वास आला. या प्रकल्पाच्या उभारणीपासून संचालनापर्यंत महिलांचे योगदान महत्त्वाचे असून ही 'पिंक पॉवर्ड' मेट्रो महिला शक्तीच्या सहभागाचे प्रतीक असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. पुणे शहरात सुमारे १२० किलोमीटरचे मेट्रो मार्ग तयार झाले असून काही मार्गांची कामे सुरू आहेत. देशातील मेट्रो विस्ताराचा सर्वाधिक लाभ महाराष्ट्राला झाला आहे. राज्यातील १२ महापालिका क्षेत्रांत मेट्रो सुरू आहे किंवा तिचे काम सुरू आहे. मेट्रो ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून आर्थिक विकासाला चालना देणारी यंत्रणा आहे. मेट्रोमुळे गुंतवणूक, रोजगार आणि त्याभोवतीचे आर्थिक परिसंस्थेचे जाळे विकसित होते, असे मुख्यमंत्री म्हणाले.



पुणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार-एकनाथ शिंदे

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करून नागरिकांचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी करण्यामध्ये मेट्रो महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. मेट्रो-३ हा पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला कलाटणी देणारा प्रकल्प असून, पुण्याच्या भविष्याला नवा आकार देणारा आणि नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या समस्या कमी करणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुणेकरांना मेट्रोची ऐतिहासिक भेट मिळत आहे. दिलेला शब्द पाळून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची कार्यपद्धती सरकारने ठेवली असून, महाराष्ट्राचा विकास वेगाने पुढे जात असल्याचे शिंदे म्हणाले.पुणे मेट्रो-३ हा देशातील सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारण्यात आलेला पहिला मेट्रो प्रकल्प आहे. राष्ट्रीय मेट्रो रेल धोरण २०१७ अंतर्गत डीबीएफओटी पद्धतीने या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. प्रकल्प मिशन मोडवर पूर्ण केल्याबद्दल पीएमआरडीए, महामेट्रो, टाटा प्रोजेक्ट्स, सीमेन्स आणि संबंधित अधिकाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. या प्रकल्पाच्या उभारणीमध्ये महिलांचा मोठा सहभाग असून, मेट्रो संचालनातही महिला महत्त्वाची जबाबदारी सांभाळणार आहेत. महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत, हे या प्रकल्पातून पुन्हा अधोरेखित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गामुळे पुण्याच्या विकासाला चालना मिळाली असून, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ आणखी कमी होणार आहे. तसेच पुण्याभोवती रिंगरोड विकसित करण्यात येत आहे. या सर्व प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन पुणेकरांना मोठा दिलासा मिळेल. पुणेकरांचे जीवन अधिक गतिमान आणि प्रवास अधिक सुलभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पुण्याच्या विकासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. मेट्रोमुळे पुणेकरांना मिळणाऱ्या सुविधांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, सुरुवातीला पुण्यात मेट्रोला किती प्रतिसाद मिळेल, याबाबत शंका व्यक्त केली जात होती. मात्र, आतापर्यंत ९० लाखांहून अधिक प्रवाशांनी मेट्रो प्रवासाला पसंती दिली आहे.

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे वाहतूक कोंडी कमी होणार केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने मेट्रोचे लोकार्पण आणि नवीन मार्गाचे भूमिपूजन हा ऐतिहासिक टप्पा आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर या २३ किलोमीटरच्या मार्गामुळे पुणे मेट्रोचे जाळे ५५ किलोमीटरपर्यंत विस्तारणार असून, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि लाखो नागरिकांना याचा लाभ होणार आहे. सप्टेंबर महिन्यात मेट्रोतून ९ लाख ५८ हजार ६०३ पुणेकरांनी प्रवास केले असून, मेट्रो ही आता पुणेकरांची जीवनवाहिनी बनली आहे. खडकवासला–खराडी, वनाज–चांदणी चौक, रामवाडी–वाघोली आणि मानिकबाग–नळस्टॉप या सुमारे ४६ किलोमीटरच्या नव्या मार्गाचे भूमिपूजनही होत आहे. यामुळे पुण्याच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण भागांची जोडणी अधिक सक्षम होऊन वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. पुण्याच्या भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन मेट्रो विस्तारासोबतच पीएमपीच्या ताफ्यात नव्या बस, इनर व आउटर रिंग रोड, भूमिगत रस्त्यांचे जाळे आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात असल्याचे मोहोळ म्हणाले. पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी यांनी प्रास्ताविकातून मेट्रो प्रकल्पाची माहिती दिली.

पुणे मेट्रो मार्गिका-३ देशातील पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो ठरणार- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

सांस्कृतिक, शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र असलेल्या पुणे शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीची गरज लक्षात घेता आधुनिक, सुरक्षित व पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. पुणे मेट्रो मार्गिका-३ ही देशातील सार्वजनिक-खासगी भागीदारीतून (पीपीपी) साकारलेली पहिली मेट्रो मार्गिका असून, सुमारे ८ हजार ३१३ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. विशेष म्हणजे, ही मार्गिका देशातील पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो ठरणार असून, सुमारे १०० महिला ट्रेन पायलट आणि स्थानकांवरील ५० टक्के महिला कर्मचारी या मार्गिकेचे संचालन करणार आहेत, हे अभिमानास्पद असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या.२०१८ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मार्गिकेची पायाभरणी झाली होती. टप्पा-२ मधील चार विस्तारित मार्गिकांनाही केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून, आज त्यांचे भूमिपूजन होत आहे. या ३१ किलोमीटर लांबीच्या आणि २८ स्थानकांच्या मार्गिकांसाठी केंद्र सरकारने सुमारे ९ हजार ८५८ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या विस्तारामुळे वनाज ते चांदणी चौक, रामवाडी ते विठ्ठलवाडी, कोथरूड, बावधन, विमाननगर, खराडी आणि वाघोली हे भाग जोडले जाणार असून, सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे मेट्रोचे जाळे १०० किलोमीटरपेक्षा अधिक होईल. या मार्गावरील आर. के. लक्ष्मण संग्रहालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ही स्थानके अनुक्रमे 'कॉमन मॅन' आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला अभिवादन करणारी ठरतील, असा उल्लेख त्यांनी केला. पुणे मेट्रोच्या प्रत्येक सविस्तर प्रकल्प अहवालाच्या (डीपीआर) निर्मितीपासून मंजुरीपर्यंत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. अर्थमंत्री म्हणून त्यांनी प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला, तसेच जुलै महिन्यात हिंजवडीतील मेट्रो स्थानकांची पाहणी करून कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरातील रस्ते, वाहतूक, पाणी, वीज, कचरा व्यवस्थापन आणि मेट्रो कनेक्टिव्हिटीच्या प्रश्नांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे. मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचणाऱ्या अंतर्गत रस्त्यांच्या ४२६ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून, ही कामे प्रत्यक्षात पूर्ण होण्याकडे पालकमंत्री म्हणून स्वतः बारकाईने लक्ष देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

'खेलो इंडिया'च्या माध्यमातून खेळ गावागावात पोहोचला-मुख्यमंत्री

पुणे/प्रतिनिधी- देशातील क्रीडा क्षेत्रात मोठे परिवर्तन होत असून, 'खेलो इंडिया'च्या माध्यमातून खेळ ग्रामीण भागातील गावागावात पोहोचला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे आयोजित ४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धा (मुख्यमंत्री चषक) समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रांत पाटील, आमदार शंकर जगताप, मनपा आयुक्त नवल किशोर राम, क्रीडा आयुक्त दीपक सांगला,बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव सुबिंदर सिंह गिल, महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष संदीप जोशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या क्रीडा परिसंस्थेमध्ये बालेवाडी येथील क्रीडा संकुल महत्वाची भूमिका बजावत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'खेलो इंडिया' स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे खेळाडू सातत्याने चांगली कामगिरी करून पदके मिळवत आहेत. राज्य शासनाने 'मिशन लक्ष्यवेध'च्या माध्यमातून विविध खेळांसाठी उत्कृष्ट प्रशिक्षण देणारी केंद्रे सुरू केली आहेत. बास्केटबॉल हा महाराष्ट्रातील लोकप्रिय खेळ असून, राज्याने देशाला अनेक दर्जेदार खेळाडू दिले आहेत. अशा राष्ट्रीय स्पर्धांमुळे खेळाडूंना अनुभव आणि राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळते. महाराष्ट्र बास्केटबॉल संघटनेने या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारतीय खेळाडूंच्या कामगिरीचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावेळी भारताने ४८ पदके मिळविली. विशेष म्हणजे १७ राज्यांतील खेळाडूंनी पदकांची कमाई केली. कबड्डी, नेमबाजी आणि तिरंदाजीसारख्या खेळांत सामान्य कुटुंबांतील खेळाडूंनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळविले. खेळाडूंची परिस्थिती नव्हे, तर त्यांची जिद्द, मेहनत आणि खेळाप्रती असलेली निष्ठा महत्वाची असते. सर्व विजेत्या आणि सहभागी संघांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्राचा संघ यंदा अंतिम फेरीपर्यंत पोहोचू शकला नसला, तरी त्यातून निराश होण्याचे कारण नाही. खेळात जय-पराजय होत असतो. पुढील स्पर्धेत अधिक चांगली कामगिरी करण्याची संधी खेळाडूंना मिळेल. खेळाडूंमध्ये जिद्द, महत्वाकांक्षा आणि खिलाडूवृत्ती असणे महत्वाचे असून, पराभवानंतरही न थांबता प्रयत्न करणारे खेळाडूच भविष्यात विजयाचे मानकरी ठरतात, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मेळघाटातील महिलांच्या 'सौर चरख्यावर निर्मित शाल'ची राष्ट्रीयस्तरावर दखल कलाकुसरीची विशेष शाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सुपूर्द

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील दुर्गम व आदिवासीबहुल मेळघाट क्षेत्रातील महिला कारागिरांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या चरख्याच्या साहाय्याने पारंपरिक,आधुनिक व पर्यावरण पुरकतेला कौशल्याचा साज चढवून तयार केलेली एक विशेष शाल सोमवारी २ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एका गौरवपूर्ण समारंभात स्वागतस्वरुपात प्रदान करण्यात आली.हा प्रसंग म्हणजे मेळघाटातील आदिवासी महिलांचे कौशल्य व आत्मनिर्भरता अधोरेखित करणारा थेट राष्ट्रीस्तरावरील बहुमानच ठरला आहे.दुर्गम व आव्हानात्मक भौगोलिक परिस्थिती असूनही मेळघाटच्या महिलांनी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घेतलेली ही झेप कौतुकास्पद ठरत असून, त्यांच्या या हस्तकलेने देशाच्या पटलावर अमरावती जिल्ह्याचे आणि संपूर्ण महाराष्ट्राचे नाव पुन्हा एकदा अभिमानाने उंचावले आहे. दिल्लीतील भारत मंडपम येथे २ नोव्हेंबर रोजी 'भारत रिन्युअल एनर्जी समिट २०२६' या गौरवपूर्ण आयोजनाच्या उद्घाटन सोहळ्यात स्वागत स्वरुपात मेळघाटातील खादी ग्रामोद्योगाच्या 'कुटीर' ब्रँडतर्फे तयार करण्यात आलेली आकर्षक नैसर्गिक पानांच्या ठश्यांची सौर चरखा शाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते भेट करण्यात आली. २ ते ५ नोव्हेंबर दरम्यान आयोजित या परिषदेत १३० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, ४० हून अधिक मंत्री, धोरणकर्ते, उद्योजक, गुंतवणूकदार, संशोधक आणि ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या पुढाकारातून सुरु करण्यात आलेला अमरावती विकेंद्रित सौर चरखा क्लस्टर हा ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना स्थानिक पातळीवर शाश्वत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती या महिलांच्या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. संस्थेने मेळघाटातील ग्रामीण व आदिवासी महिलांना सौर चरख्याद्वारे सूतनिर्मिती, हातमागाद्वारे वस्त्रनिर्मिती तसेच वस्त्रांवरील विविध कलात्मक प्रक्रिया यांसाठी प्रोत्साहित करून त्यांना रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. मेळघाटातील महिलांनी विशेष कलाकुसरीतून साकारलेली ही विशेष शाल म्हणजे पारंपरिक हस्तकला आणि आधुनिक नवोपक्रम, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक कारागिरांच्या आत्मनिर्भरतेचा एक उत्तम संगम आहे. दुर्गम भागात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक आणि हरित ऊर्जेचा वापर करून महिलांनी हे सूत कताईचे काम केले आहे. या पर्यावरणपूरक उपक्रमामुळे केवळ कार्बन फूटप्रिंट कमी होण्यास मदत झाली नाही, तर खादी आणि हस्तकलेला एक आधुनिक, डिजिटल व शाश्वत स्वरूप मिळाले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक आदिवासी कारागिरांचे कौशल्य आणि महिला बचत गटांच्या आर्थिक स्थैर्याला थेट प्रोत्साहन मिळाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवणारी ही कामगिरी ठरली आहे.

कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्नची राज्यात अंमलबजावणी

मुंबई : कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्नची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन सकारात्मक आहे. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालाच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात ये, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले. भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींसोबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत कामगारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. कामगार विमा योजनेसंदर्भात भारतीय मजदूर संघाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सोबत बैठक आयोजित करण्यात येईल, असेही कामगार मंत्री म्हणाले. घरेलू कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच नवीन कामगार कायद्यानुसार बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित योजनांचे स्वरूप याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव अनिल डुमणे आणि प्रदेशाध्यक्ष किरण मिलगिर उपस्थित होते.

आदिवासी बांधवांना आधार कार्ड व जन्म दाखले मिळण्यासाठी १६ जिल्ह्यांत विशेष मोहीम राबवा -मंत्री बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी- आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेले आधार कार्ड आणि जन्म दाखले उपलब्ध करून देण्याकरिता राज्यातील सर्व आदिवासी जिल्ह्यांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात यावी. राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांना स्वतंत्र आधार नोंदणी संच उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आदिवासी संघटनांनी पुढाकार घेऊन आदिवासी बांधवांमध्ये जनजागृती करावी, जनसभा आयोजित कराव्यात आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी, असे आवाहनही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी, कष्टकरी, महिला, बालके व कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीस वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित, डहाणूचे आमदार कॉम्रेड विनोद निकोले, माजी आमदार विवेक पंडित, कॉम्रेड जे. पी. गावीत, पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे, किसान सभेचे कार्याध्यक्ष रडका कलांगडा, कोषाध्यक्ष सदाशिव साबळे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पालघर जिल्हा सचिव किरण गहला, महसूल विभागाचे अवर मुख्य सचिव विकास खारगे, ठाणे, पालघर व अहिल्यानगर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.मंत्री बावनकुळे म्हणाले, आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कागदपत्रांच्या अभावामुळे अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घ्यावा. जन्म नोंदणीपासून आधार नोंदणीपर्यंतची प्रक्रिया सुलभ करून पात्र नागरिकांना या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विशेष शिबिरे आयोजित करावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी विशेष कालबद्ध मोहीम राबविण्यात यावी. सक्षम समित्यांनी प्रलंबित दाव्यांवर कारणासहित निर्णय घ्यावेत. ग्रामसभेचे अभिलेख, प्रत्यक्ष वहिवाटीचे पुरावे आणि कायद्यानुसार ग्राह्य धरता येणाऱ्या पुराव्यांचा विचार करावा. उपग्रह प्रतिमा व संबंधित तांत्रिक माहितीचाही पूरक साधन म्हणून वापर करावा, असे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

झुंडशाहीला वाव

आपल्या कामातून मतदारांची मने न जिंकू शकल्याने आणि त्यामुळे निवडणुकीत वारंवार पराभव पत्करावा लागल्याने कसे वैफल्य येते आणि त्यातून राजकीय पक्ष कसे पाखंडीपणा करण्यास प्रवृत्त होतात याचे उदाहरण रविवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर पहावयास मिळाले. मतपेट्यांमधून जनतेने नाकारल्याने करण्यात आलेला हा झुंडशाहीचा प्रयोगच म्हणावा लागेल. या रॅलीच्या आधी भाजपच्या दिल्ली युनिटने रामलीला मैदानात लावलेले राहुल गांधी आणि इंडिया ब्लॉकच्या इतर नेत्यांना लक्ष्य करणारे 'ठगो का मेला' नावाचे पोस्टर अतिशय बोलके ठरले. या पोस्टरमध्ये विरोधकांवर अफवा पसरवण्याचा आणि अराजकता निर्माण करण्याचा आरोप करण्यात आला आहे. इंडिया ब्लॉकची ही रॅली कथित निवडणूक अनियमितते‌चा निषेध करण्यासाठी आणि एसआयआर प्रक्रियेला विरोध करण्यासाठी आयोजित करण्यात आल्याचे म्हटले आहे. काँग्रेसने पुढाकार घेत काढलेल्या या रॅलीत इंडिया आघाडीतील सारे घटक पक्ष सहभागी झाले होते. पण वरकरणी ही इंडिया आघाडीची रॅली असल्याचे दाखवणाऱ्या काँग्रेसला मनातून मात्र अन्य घटक पक्षांना श्रेय घेऊ द्यायचे नव्हते, हेही प्रकर्षाने दिसून आले. काँग्रेसने काढलेल्या या वरातीमध्ये नाचण्यासाठी उबाठा गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेतेही हौसेने वहाडी बनून गेले होते. पण राहुल गांधींनी तेथे बोलण्याची संधी ना संजय राऊतांना दिली ना सुप्रिया सुळेंना दिली. राहुल गांधी यांचे महाराष्ट्राबद्दलचे दुजाभावाचे धोरण पूर्वीपासूनच दिसून आले राहिले आहे. कालच्या या रॅलीमध्येही महाराष्ट्राबद्दलचा आकस दिसून आला. येत्या काळात संजय राऊत हे राहुल गांधींचे गोडवे गातील तेव्हा त्यांना एकच प्रश्न असेल की, राहुल गांधी तुम्हाला दिल्लीतील रॅलीत सहभागी झाल्यानंतरही साधे भाषण करण्याची संधी देत नाहीत. मग त्यांचे गोडवे गाण्याचा अट्टाहास तरी कशासाठी? रामलीला मैदानाची क्षमता ५० हजारांच्या आसपास आहे. ते जेमतेम निम्मे भरले. याचा अर्थ २० पक्षांना मिळून २५ हजार लोकही जमवता आले नाहीत. त्यामुळे नामुष्की पत्करावी लागल्याने एआय जनरेटेड फोटो टाकून तेथे गर्दी दाखवण्याचा हास्यास्पद प्रयत्न काँग्रेस नेत्यांनी केला. रामलीला मैदानावर काढण्यात आलेल्या रॅलीचा हेतू स्पष्ट होता. कथित मतचोरीचा मुद्दा उचलणे, एसआयआर प्रक्रियेला विरोध करणे आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करणे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीला या माध्यमातून कार्यकर्त्यांचे एकत्रीकरण, विरोधी पक्षांची एकजूट आणि जनमतावर प्रभाव साधायचा होता. हा त्यांचा राजकीय प्रयत्न असला तरी राजकीय प्रभाव आणि घटनात्मक निष्पत्ती या वेगळ्या बाबी आहेत. रॅलीमुळे मागण्या जाहीर झाल्या तरी त्यामुळे आयोगाचा निर्णय रद्द झाला नाही, मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून हटले नाहीत आणि कोणावरही गुन्हा सिद्ध झाला नाही. त्यामुळे नेमके साध्य झाले तरी काय याचे उत्तर विरोधकांकडे नाही. ज्ञानेश कुमारांप्रमाणेच पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांवरही तोंडसुख घेण्यात आले. एआयच्या माध्यमातून बनावटगिरी करत तुम्ही गर्दी दाखवाल पण जनतेच्या हृदयात तुम्हाला स्थान नाही, त्याचे काय? संविधानिक पद भूषवणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्तांना तुरुंगात पाठवण्याची घोषणा कोणत्याही राजकीय व्यासपीठावरून करणे हा एक अपराधच म्हणावयास हवा. एखाद्या व्यक्तीविरुद्ध विशिष्ट आरोप असतील तर तपास यंत्रणांसमोर तक्रार, सक्षम प्राधिकरणाकडून तपास, पुराव्यांची न्यायालयीन तपासणी आणि अखेरीस न्यायालयाचा निर्णय, हा कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना रॅली काढून थयथयाट करणे यातच विरोधकांचे मुद्दे कसे गैरलागू आहेत हे स्पष्ट होते. आरोप कितीही गंभीर असला, तरी तो सिद्ध होईपर्यंत दोषी ठरवता येत नाही. मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची घटनात्मक प्रक्रिया मुद्दाम कठीण ठेवलेली आहे. संविधानाच्या कलम ३२४ (५) नुसार त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच आणि त्याच आधारांवर पदावरून हटवता येते. कलम १२४(४) मधील कसोटी म्हणजे सिद्ध झालेले गैरवर्तन किंवा अक्षमता. न्यायाधीशांच्या चौकशीविषयक कायद्यानुसार लोकसभेत किमान १०० किंवा राज्यसभेत किमान ५० सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांसह प्रस्ताव सादर करता येतो. तो संबंधित सभापतींकडून स्वीकारला गेल्यास चौकशी समिती आरोप तपासते; संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी मिळते. आरोप सिद्ध झाल्यावरही प्रक्रिया तिथे संपत नाही. दोन्ही सभागृहांनी स्वतंत्रपणे एकाच अधिवेशनात विशेष बहुमताने प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक असते. म्हणजे त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येचे बहुमत आणि उपस्थित तसेच मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश समर्थन, त्यानंतर राष्ट्रपती पदावरून हटवण्याचा आदेश देतात, त्यामुळे मोर्चा, राजीनाम्याची मागणी किंवा राजकीय विरोध हा या प्रक्रियेचा पर्याय नाही. हे सारे विरोधी पक्षांना ठाऊक नाही असे अजिबात नाही, पण या कायदेशीर प्रक्रियेतून आपल्याला काहीच सिद्ध करता येणार नाही हे ठाऊक असल्यानेच त्यांना ही नौटंकी करावी लागत आहे. एसआयआर म्हणजे मतदारयादीची सखोल फेरतपासणी. स्थलांतर, मृत्यू किंवा बदललेले पत्ते वेळेवर नोंदले न गेल्याने मृत मतदार, दुबार नोंदी, कायमचे स्थलांतरित आणि इतर अपात्र नोंदी यादीत राहू शकतात; पात्र मतदारांची नावे मात्र सुटूही शकतात. म्हणून अचूक यादी ही निवडणुकीच्या विश्वासार्हतेचा पाया आहे. मतदारयादीत नाव आहे म्हणून प्रत्येक नोंद तपासणीपलीकडे जाते असे नाही; पण तपासणीच्या नावाखाली पात्र नागरिकाचा मताधिकार धोक्यात येऊ नये, हेही तितकेच मूलभूत आहे. सरकारवर टीका करणे हा लोकशाहीचा अविभाज्य अधिकार आहे. घटनात्मक पदांवरील निर्णयांशी असहमती व्यक्त करणेही तितकेच स्वाभाविक. पण पुरावा मागण्याऐवजी आधीच शिक्षा ठरवणे आणि संस्थांवर राजकीय दबाव आणणे, हा गंभीर प्रमाद आहे.

शेतकऱ्याची व्याख्या काय?

संसदेत विशेष शेतकरी कायदा करून जोपर्यंत खरा शेतकरी, बागायतदार, शेतीमालाच्या खरेदीविक्रीतील दलाल, कसणारा शेतकरी, महिला शेतकरी या संज्ञांना स्वयंस्पष्ट कायदेशीर व्याख्या दिली जात नाही आणि प्रत्यक्ष कष्टकऱ्यांची अचूक ओळख पटवली जात नाही, तोपर्यंत सरकारी खजिन्यातून होणारा हा प्रचंड खर्च केवळ राजकीय घोषणाबाजी, भ्रष्टाचार आणि सार्वजनिक निधीचा अपव्यय ठरत राहील.

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्थेचा आधारस्तंभ मानला जाणारा शेतकरी हा राजकीय भाषणांचा, अनुदानांच्या विविध घोषणांचा आणि कर्जमाफीच्या आश्वासनांचा नेहमीच केंद्रबिंदू राहिला आहे. परंतु, अतिशय आश्चर्याची आणि दुर्दैवी गोष्ट म्हणजे स्वातंत्र्याच्या साडेसात दशकांनंतरही भारतीय राज्यघटनेत, संसदेच्या कोणत्याही कायद्यात किंवा शासनाच्या अधिकृत अधिसूचनेत 'शेतकरी' या शब्दाची स्वयंस्पष्ट आणि सर्वसमावेशक अशी अधिकृत कायदेशीर व्याख्याच उपलब्ध नाही.

ज्या घटकाच्या नावाने सरकारी तिजोरीतून आणि करदात्यांच्या खजिन्यातून दरवर्षी लाखो कोटी रुपये औदार्याने खर्च केले जातात, त्या 'शेतकऱ्याची' कायदेशीर व्याख्याच नसल्याने हा अथांग निधी नेमका कोणाच्या घशात चालला आहे, हा गंभीर आणि अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. 'आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते,' अशी भयानक अवस्था आज देशातील कृषी धोरणांची, अनुदानांच्या वाटपाची आणि तिजोरीतील निधीच्या खर्चाची झाली आहे का, अशी अत्यंत रास्त शंका घेण्यास इथे पूर्ण वाव आहे. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यानंतर किंवा १९४३ च्या भीषण बंगाल दुष्काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातील जमीन सुधारणा कायद्यांमध्ये (उदा. ३२ग कायदा) कुठेही 'शेतकरी' म्हणजे नेमके कोण, यावर कोणतीही ठोस कायदेशीर भूमिका घेतली गेली नाही. राज्यघटनेनुसार 'कृषी' हा राज्यसूचीतील विषय असल्याने केंद्र आणि राज्य सरकारे आपापल्या प्रशासकीय सोयीनुसार विविध आदेशांद्वारे 'शेतकरी' ठरवतात. या गोंधळामुळे शहरात राहणारे कागदोपत्री जमीनमालक किंवा राजकीय वजन असलेले बडे व्यावसायिक सरकारी अनुदाने, करसवलती आणि कर्जाचे लाभ सहज लाटतात; तर प्रत्यक्ष शेतात दिवसरात्र घाम गाळणारे भूमिहीन शेतमजूर, बटाईदार, कंत्राटी शेतकरी आणि महिला शेतकरी या सरकारी लाभांपासून कायम वंचित राहतात.

कायद्यात स्पष्ट आणि सर्वमान्य व्याख्या नसल्यामुळे सर्वोच्च न्यायालयालासुद्धा वेगवेगळ्या याचिकांमध्ये प्रकरणाच्या संदर्भानुसार अर्थ लावावा लागला आहे. 'राजस्थान राज्य वि. गंगा साहेब (१९८४)' प्रकरणात न्यायालयाने नमूद केले होते की 'फार्मर' ही एकसमान संकल्पना नसून ती जमिनीच्या मालकीशी किंवा प्रत्यक्ष शेतीकामाशी जोडली जाते. 'पी. राम रेड्डी वि. आंध्र प्रदेश (१९८८)' प्रकरणात न्यायालयाने सरकारला स्पष्ट बजावले होते की, लाभ वितरित करताना केवळ कागदोपत्री मालक आणि प्रत्यक्ष शेतात काम करणारा कष्टकरी यांच्यात स्पष्ट भेद केला पाहिजे. 'पी. व्ही. कृष्ण रेड्डी (१९९४)' प्रकरणात कृषी कर्ज योजनांमध्ये अचूक व्याख्ये अभावी होणाऱ्या गैरवापरावर बोट ठेवले गेले, तर 'सूरज भान वि. फायनान्शियल कमिशनर (१९७५)' प्रकरणात भूमिहीन पण प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या व्यक्तीलाही कृषक मानण्याची गरज व्यक्त केली गेली. 'गौरवकुमार बन्सल वि. भारत सरकार (२०११)' या जनहित याचिकेत तर न्यायालयाने स्पष्ट म्हटले होते, की 'शेतकरी' संज्ञा अस्पष्ट असल्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचे योग्य दस्तऐवजीकरण होत नाही; परिणामी पीडित कुटुंबांना मिळणारी शासकीय भरपाई व दिलासा मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होतात.



भारतातील वाढत्या शेतकरी आत्महत्या आणि गंभीर शेतीसंकटावर मात करण्यासाठी २००४ ते २००६ दरम्यान डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय शेतकरी आयोग' स्थापन करण्यात आला होता. या आयोगाने पाच सविस्तर अहवाल सादर करून सर्वसमावेशक उत्पादन खर्चावर (सी २) किमान ५० टक्के नफा जोडून 'किमान आधारभूत मूल्य' देण्याची, शेतमालाच्या वाजवी भावाला कायदेशीर हमी देण्याची आणि बटाईदार व महिला शेतकऱ्यांना संस्थात्मक पतपुरवठ्याची कायदेशीर ओळख देण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली होती. आयोगाच्या शिफारशींवर आधारित 'राष्ट्रीय शेतकरी धोरण २००७' प्रसिद्ध झाले खरे, परंतु ते केवळ एक धोरणात्मक दस्तऐवज राहिले; त्याला कोणताही कायदेशीर आधार दिला गेला नाही. आजतागायत स्वामिनाथन आयोगाच्या या मुख्य शिफारशी कागदावरच धूळ खात पडून आहेत आणि त्यामुळेच देशात शेतकरी आंदोलनांचा व अस्वस्थतेचा वणवा कायम पेटलेला दिसतो.

शासकीय आकडेवारीनुसार देशात १४.७ कोटी कृषक कुटुंबे असून त्यातील ८६ टक्के लहान व सीमांत शेतकरी आहेत. पण सरकारी योजनांमध्ये केवळ नोंदणीकृत जमीनमालकांनाच लाभार्थी मानले गेल्याने सुमारे ४० टक्के प्रत्यक्ष शेतमजूर आणि दोन कोटींहून अधिक बटाईदार कुठल्याही लाभास पात्र ठरत नाहीत. गेल्या दशकात केंद्र व राज्यांनी खत-बीज अनुदानावर १५ लाख कोटी, पीएम-किसान रोख हस्तांतरणावर साडेतीन लाख कोटी, कर्जमाफी व व्याजसवलतीवर सात लाख कोटी आणि पीक विमयावर तीन लाख कोटी असा एकूण २५ ते ३० लाख कोटी रुपयांचा प्रचंड निधी सरकारी खजिन्यातून खर्च केला. अलीकडे महिला शेतकऱ्यांसाठी 'नमो ड्रोन दीदी'सारख्या तंत्रज्ञान आधारित योजना राबवल्या जात असल्या, तरी मुळात 'शेतकरी' या शब्दाचा कायदेशीर पायाच धूसर असल्याने हा सर्व निधी खरोखर गरजूंपर्यंत पोहोचतो की मध्येच गायब होतो, याचे उत्तर सरकारकडे नाही.

युरोपीय युनियनमध्ये केवळ जमीन मालकी असणाऱ्याला नव्हे, तर '?क्टिव्ह फार्मर' ही संज्ञा वापरून, ज्याचे मुख्य उत्पन्न प्रत्यक्ष कृषी उत्पादनावर अवलंबून आहे, त्यालाच सवलती दिल्या जातात. अमेरिकेत कृषी विभागाने वार्षिक आर्थिक उलाढालीनुसार शेतकऱ्याची अचूक व्याख्या निश्चित केली आहे. जपानमध्ये 'सर्टिफाइड फार्मर' प्रणालीद्वारे प्रत्यक्ष शेती करणाऱ्यांची नोंदणी केली जाते, तर नेदरलँड्समध्ये अनुदानांवर अवलंबून न राहता थेट संशोधन, नवकल्पना आणि जागतिक बाजारपेठेशी शेतकऱ्याला जोडले जाते. याउलट, आपल्या देशात शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, बाजारपेठेत दलालांची मजबूत पकड आहे आणि हवामानाच्या अनिश्चिततेमुळे शेती कायम धोक्यात राहते. अशा स्थितीत एकदा कर्जमाफी दिली की पुढच्या वर्षी त्याहून मोठ्या कर्जमाफीची अपेक्षा निर्माण होते आणि रोख मदतीची सवय लागल्यामुळे शेतकरी स्वावलंबनाचा मार्ग सोडून देतो. या दुष्टचक्रामुळे सरकारी तिजोरीवर असह्य भार पडतो आणि देशाच्या पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षणासारख्या इतर अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांतील गुंतवणुकीवर गंभीर मर्यादा येतात.

थोडक्यात, 'शेतकरी म्हणजे कोण?' या मूलभूत आणि घटनात्मक प्रश्नाचे उत्तर न शोधता केवळ राजकीय फायद्यासाठी अब्जावधी रुपयांचा निधी वाटत राहणे म्हणजे आजाराचे मूळ निदान न करता तात्पुरती वेदनाशामक गोळी देण्यासारखे आहे. संसदेत विशेष शेतकरी कायदा करून जोपर्यंत खरा शेतकरी, बागायतदार, शेतीमालाच्या खरेदीविक्रीतील दलाल, कसणारा शेतकरी, महिला शेतकरी या संज्ञांना स्वयंस्पष्ट कायदेशीर व्याख्या दिली जात नाही आणि प्रत्यक्ष कष्टकऱ्यांची अचूक ओळख पटवली जात नाही, तोपर्यंत सरकारी खजिन्यातून होणारा हा प्रचंड खर्च केवळ राजकीय घोषणाबाजी, भ्रष्टाचार आणि सार्वजनिक निधीचा अपव्यय ठरत राहील.

(साभार म.टा.)

- राजीव शहा

जीएसटी सुधारणांच्या नव्या पर्वास प्रारंभ

१ नोव्हेंबरपासून भारतात जीएसटी सुधारणांचे नवे पर्व सुरू झाले आहे. १ जुलै २०१७ रोजी लागू झालेली जीएसटी करप्रणाली ऐतिहासिक सुधारणा ठरली. तिच्या बळकटीकरणाचा नवा अध्याय लिहिला जात आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये जीएसटी सुधारणांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या आहेत. १ जुलै २०१७ रोजी लागू झालेल्या जीएसटी करप्रणालीमुळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेला एक नवी दिशा मिळाली. अलीकडे नवी दिल्ली येथे केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित जीएसटी परिषदेच्या ५७ व्या बैठकीत करव्यवस्थेला अधिक सुलभ, पारदर्शक, नागरिकाभिमुख आणि व्यवसायस्नेही बनवण्याच्या दिशेने नवा अध्याय सुरू झाला आहे.

१ नोव्हेंबरपासून लागू झालेले जीएसटीचे नवे रोडमॅप आणि एप्रिल २०२७ पासून जीएसटी प्रणालीमध्ये प्रस्तावित करण्यात आलेले महत्त्वपूर्ण बदल भारताच्या करव्यवस्थेला नवी गती देणारे ठरतील. कार्यशील भांडवलाचा प्रवाह अधिक गतिमान करणे आणि विश्वासावर आधारित प्रशासनाची स्थापना करणे, या दिशेनेही महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. भारतामध्ये जीएसटीचे सध्याचे स्वरूप एका रात्रीत तयार झालेले नाही. उलट, गेल्या ४ दशकांमध्ये राबवण्यात आलेल्या आर्थिक आणि प्रशासकीय सुधारणांचा तो परिणाम आहे. १ जुलै २०१७ रोजी देशभरात एकात्मिक जीएसटी कायदा लागू करण्यात आला. यामुळे भारताच्या अप्रत्यक्ष करप्रणालीत मोठे परिवर्तन घडून आले. उत्पादन शुल्क, सेवाकर, राज्यस्तरीय मूल्यवर्धित कर आणि इतर अनेक अप्रत्यक्ष करांना एका व्यापक करप्रणालीमध्ये सामावून घेण्यात आले.

२०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात जीएसटीचे सरासरी मासिक संकलन सुमारे ९०,००० कोटी रुपये होते. सप्टेंबर २०२६ मध्ये हे संकलन वाढून २ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले. ही वाढ भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढत्या औपचारिकीकरणाचे, करअनुपालनातील सुधारणांचे आणि करप्रणालीच्या बळकटीकरणाचे महत्त्वपूर्ण द्योतक आहे. जीएसटीमुळे करसंकलनात वाढ होण्याबरोबरच उद्योग-व्यवसायांसाठी एकसंध राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण होण्यास मदत झाली. विविध राज्यांमधील करांचे अडथळे कमी झाले. मालवाहतूक, वितरण आणि पुरवठा साखळीच्या व्यवस्थापनामध्ये अधिक सुसूत्रता आली. देशांतर्गत व्यापाराच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची सुधारणा ठरली आहे.

जीएसटी परिषदेच्या अलीकडील बैठकींमध्ये अनुपालनाचा खर्च कमी करणे आणि सुधारित व्यवस्थेमध्ये प्रवेश करणे अधिक सुलभ बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. नवीन जीएसटी नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या कमी जोखमीच्या आणि पात्र अर्जदारांना डिजिटल आणि जोखीम मूल्यमापनावर आधारित स्वयंचलित प्रक्रियेद्वारे नोंदणी देण्याची व्यवस्था केली. यामुळे नव्याने व्यवसाय सुरू करणाऱ्या उद्योजकांना नोंदणी प्रक्रियेतील विलंबाचा सामना करावा लागणार नाही. तसेच, निर्यातदार आणि कराच्या उलट दरररचनेमुळे परतावा मागणाऱ्या करदात्यांना त्यांच्या परताव्याच्या दाव्यांपैकी ९० टक्क्यांपर्यंत रक्कम तात्पुरत्या स्वरूपात मंजूर करण्याची व्यवस्था केली आहे. यामुळे निर्यातदार आणि उत्पादकांच्या कार्यशील भांडवलावरील ताण कमी होईल. मालविक्रीनंतरच्या सवलती आणि स्पष्टता देण्यासाठी तसेच व्यापाऱ्यांना अनावश्यक त्रास होऊ नये यासाठी काही तरतुदी अधिक व्यावहारिक बनवल्या. अधिकाऱ्यांना मूळ आदेश देण्यापूर्वीच्या काही प्रकरणांमध्ये दंड आकारणीची प्रक्रिया अधिक



क्रेडिट नोटशी संबंधित अनुपालन नियम अधिक व्यावहारिक आणि लवचीक केले आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक व्यवहारांनुसार करदायित्वाचे योग्य समायोजन करणे शक्य होईल.

छोट्या व्यापाऱ्यांना मोठा दिलासा

जीएसटी सुधारणांच्या अंतर्गत छोट्या व्यापाऱ्यांसाठीही अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. अधिकाऱ्यांना कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रियांमध्ये सुलभ करण्याचे अधिकार दिले. आभियोजनासंबंधीच्या तरतुदींमध्येही सुधारणा केल्या आहेत. छोट्या आणि प्रामाणिक व्यापाऱ्यांना अनावश्यक फौजदारी कारवाईचा सामना करावा लागू नये, यासाठी करप्रणाली अधिक संतुलित करण्याचा प्रयत्न केला. छोट्या विवादांमधून दिलासा देण्यासाठी १०,००० रुपयांपर्यंतच्या कमी रकमेच्या प्रकरणांमध्ये कारणे दाखवा नोटीस जारी करण्याच्या तरतुदींबाबतही सुधारणा केल्या. कलम १२५ अंतर्गत सर्वसाधारण दंडाच्या मर्यादेमध्ये कपात केली. तसेच, कंपोझिशन योजनेचा लाभ घेणाऱ्या करदात्यांसाठी करदर आणि विवरणपत्रांशी संबंधित प्रक्रियांमध्ये सुलभता आणली. ई-कॉमर्स मंचांच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या छोट्या आणि असंघटित विक्रेत्यांसाठी नोंदणी व अनुपालन प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर दिला आहे.

डिजिटल यंत्रणेमुळे पारदर्शकता वाढणार

जीएसटी सुधारणांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे डिजिटल यंत्रणेचा विस्तार. करभरणा, विवरणपत्रे, परतावा, नोंदणी आणि करदात्यांच्या तक्रारींचे निवारण या सर्व प्रक्रियांमध्ये तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करण्याचा प्रयत्न होत आहे. करदात्यांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार जाण्याची आवश्यकता कमी व्हावी, करनिर्धारणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी आणि निर्णय घेण्यासाठी लागणारा वेळ कमी व्हावा, या उद्देशाने डिजिटल व्यवस्थेला प्राधान्य देण्यात येत आहे. यामुळे करप्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. व्यापारी आणि करप्रशासन यांच्यातील अनावश्यक संपर्क कमी झाल्यास प्रक्रियेत अधिक विश्वासार्हता निर्माण होऊ शकते.

सुधारणांची अंमलबजावणी महत्त्वाची

जीएसटीसंबंधी अलीकडील सुधारणांचे स्वागत करायला हवे. परंतु जीएसटीला खऱ्या अर्थाने 'गुड अँड सिम्पल टॅक्स' बनवण्यासाठी अजूनही काही महत्त्वपूर्ण आघाड्यांवर काम करणे आवश्यक आहे. पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू, विजेचे दर आणि प्रवेशन कराशी संबंधित प्रश्नांचा व्यापक विचार करण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रांतील करप्रणालीचा जीएसटीच्या एकात्मिक व्यवस्थेशी अधिक सुसंगत समन्वय साधला गेला पाहिजे.

पेट्रोल आणि डिझेलसारख्या वस्तूंवरील करांचा जीएसटीच्या इनपुट टॅक्स क्रेडिट व्यवस्थेशी पूर्ण समन्वय नसल्याने उद्योगांना काही अडचणींचा सामना करावा लागतो. यात सुधारणा गरजेची आहे. विशेषतः उत्पादन, वाहतूक आणि वितरण क्षेत्रातील करांचा एकत्रित परिणाम लक्षात घेऊन सुधारणा केल्यास उद्योगांच्या खर्चामध्ये कपात होऊ शकते. मला अपेक्षा आहे की, केंद्र सरकार आणि जीएसटी परिषद या सुधारणांना पुढे नेताना करप्रणाली अधिक सुलभ आणि उद्योगस्नेही करण्यासाठी ठोस निर्णय घेतील. एप्रिल २०२७ पासून लागू होणाऱ्या प्रस्तावित सुधारणा आणि त्यानंतरच्या दीर्घकालीन उपाययोजनांमुळे जीएसटीच्या प्रक्रियांमध्ये अधिक सुसूत्रता निर्माण होईल. करआकारणी, करनिर्धारण, करभरणा आणि करपरतावा या सर्व प्रक्रियांमध्ये पारदर्शकता वाढेल. भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने जीएसटीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. काही वर्षांतील अनुभव लक्षात घेता, आता या करप्रणालीला अधिक परिपक्व, पारदर्शक आणि परिणामकारक बनवण्याची वेळ आली आहे.

नोव्हेंबर २०२६ पासून सुरू झालेल्या आणि एप्रिल २०२७ मध्ये पुढील टप्प्यात जाणाऱ्या या सुधारणांमुळे भारताच्या करव्यवस्थेला नवी दिशा मिळेल. देशाच्या आर्थिक प्रगतीला अधिक गती मिळेल आणि भारताची जीएसटी व्यवस्था जगातील अधिक सुलभ, २०२७ च्या अंमलबजावणीच्या तारखा तसेच कायदेशीर बदलांचे तपशील प्रकाशनापूर्वी अधिकृत अधिसूचनांशी पडताळणे आवश्यक आहे.

डॉ. जयंतीलाल भंडारी

बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

धाडसी चोरी बँकेची भिंत फोडून तिजोरी 250 फूट ओढली सहा लाखांवर डल्ला!

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ सुरक्षा व्यवस्था रामभरोसे!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. ३ : बँकेची भिंत फोडायची, वजनदार तिजोरी बाहेर काढायची, तब्बल २०० ते २५० फूट अंतरापर्यंत फरफटत न्यायची आणि ती फोडून सहा लाखांहून अधिक रुपयांची रोकड लंपास करायची! एखाद्या चित्रपटातील थरारक प्रसंग वाटावा, अशी धक्कादायक चोरी पाटण येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत घडली आहे.



चोरट्यांनी बँकेची सुरक्षा व्यवस्था भेदत ६ लाख ९ हजार ९२९ रुपयांवर डल्ला मारला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून बँकेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी बँकेच्या मागील भिंतीला सब्बल, घन, हातोडी आणि छन्नीच्या साहाय्याने मोठे भगदाड पाडले. त्यातून आत प्रवेश करून वजनदार तिजोरी बाहेर काढली. त्यानंतर ती तब्बल २०० ते २५० फूट अंतरापर्यंत ओढत नेऊन घन, हातोडी आणि छन्नीच्या साहाय्याने फोडण्यात आली. तिजोरीतील ६ लाख ९ हजार ९२९ रुपयांची रोकड घेऊन चोरटे पसार झाले. चोरट्यांना पकडणे हे पोलिसा समोरील आव्हान असले, तरी बँकेच्या सुरक्षेतील त्रुटींची चौकशी करून जबाबदारी निश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे, मोबाईल फॉरेन्सिक पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. चोरट्यांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार मिलिंद सरकटे तपास करीत आहेत.

सकाळी उघड झाला चोरीचा थरार

मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) सकाळी सातच्या सुमारास बँकेच्या भिंतीला पडलेले भगदाड आणि परिसरातील अस्ताव्यस्त साहित्य नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

यापूर्वीही चोरी मग सुरक्षा कुठे?

विशेष म्हणजे, याच बँक शाखेत यापूर्वीही चोरीची घटना घडल्याची माहिती आहे. असे असतानाही बँकेत सुरक्षा कर्मचारी तैनात नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे वारंवार चोरीच्या घटना घडूनही सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा का झाली नाही? सीसीटीव्ही, अलार्म आणि सुरक्षारक्षकांची व्यवस्था नेमकी कुठे होती? बँकेच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची? असे सवाल उपस्थित होत आहेत.

फटाकेवरील देवतांच्या प्रतिमांचा अवमान रोखा,गोवंश तस्करावर कठोर कारवाई करा!

विश्व हिंदू परिषद मुकुटबन प्रखंडाचे पोलीस प्रशासनाला निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. ३ : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर देवी-देवतांची छायाचित्रे असलेल्या फटाक्यांच्या विक्रीवर बंदी घालावी, तसेच गोवंश तस्करी व अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशा विविध मागण्यांचे निवेदन विश्व हिंदू परिषद, मुकुटबन प्रखंडच्या वतीने मुकुटबन पोलीस स्टेशनला देण्यात आले.



या निवेदनातून हिंदू देवी-देवतांची छायाचित्रे असलेल्या फटाक्यांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांची तपासणी करून नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, तसेच अशा प्रकारच्या फटाक्यांची विक्री न करण्याबाबत विक्रेत्यांना सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय परिसरातील गोवंश तस्करी आणि अवैध वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांनी विशेष गस्त वाढवावी, संशयास्पद वाहनांची तपासणी करावी आणि तस्करीचे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दरम्यान, सर्व हिंदू बांधवांनी देवी-देवतांची छायाचित्रे असलेले फटाके खरेदी करू नयेत. आपल्या आराध्य देवतांचा सन्मान राखण्यासाठी अशा फटाक्यांवर बहिष्कार टाकावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषद, मुकुटबन प्रखंडच्या वतीने करण्यात आले. या निवेदनामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या विक्रीचा प्रश्न तसेच गोवंश तस्करी रोखण्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

थोडक्यात



उपाध्यक्ष नितीन भुतडा यांचा व्यापारी महासंघातर्फे भव्य सत्कार!

महागाव : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नितीन भुतडा यांचा महागाव तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना नितीन भुतडा म्हणाले की, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक ही जशी शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जाते, तशीच ती व्यापारी बांधवांचीही बँक आहे. आगामी काळात व्यापाऱ्यांना व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक कर्जपुरवठा करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील. व्यापारी बांधवांनी आपल्या बँकिंग व्यवहारांसाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेला प्राधान्य द्यावे तसेच बँकेत फिक्स डिपॉझिट (मुदत ठेवी) करून बँकेच्या आर्थिक बळकटीकरणास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. या सत्कार सोहळ्याला महागाव तालुका व्यापारी महासंघाचे जगदीश नरवाडे, सुरेश शर्मा, सुधीर पोदुटवार, विशाल चक्रवार, अविनाश,अमील कंठावर, गजानन फटिंग, मनोज तगडपलेवार, ज्ञानेश्वर काप्रतवार, सुदाम भाऊ खंदारे, समाधान ठाकरे, दमकोंडावार सर मंगेश पाटील वानखेडे, विलास सेबे, अमोल व्हडगिरे, विलास कवाणे, सुरेश नरवाडे विशाल डहाळे गजानन साबळे विलास काळे,रामजी नाईक डॉ.इरफान कुंदन, श्रीधर भवानकर, निलेश पाटील नरवाडे आदी व्यापारी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदाम खंदारे आभार समाधान ठाकरे यांनी केले.

सात वर्षांच्या संघर्षानंतर माहिती आयुक्तांचा दणका..!

रजनीकांत बोरेले यांच्या द्वितीय अपिलची दखल.

पांढरकवडा : माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती तब्बल



सात वर्षे उपलब्ध न करून दिल्याने राज्य माहिती आयोगाच्या अमरावती खंडपीठाने प्रशासनाला चांगलाच दणका दिला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांच्या द्वितीय अपील क्रमांक २८४२/२०१९ मध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार अभिजीत नांदुरकर यांना १५ दिवसांत संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर तत्कालीन जन माहिती अधिकारी पी. टी. खटीक यांच्यावर २५ हजार रुपयांपर्यंत शास्तीची कारवाई का करू नये, याबाबत लेखी खुलासा मागविण्यात आला आहे. बोरेले यांनी १९ जून २०१९ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, केळापूर येथे मनरेगा संदर्भात माहिती मागितली होती. मात्र, विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील आणि त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीदरम्यान तत्कालीन अधिकाऱ्यांकडून माहिती दिल्याचे अमिलेखात पुरावे उपलब्ध नसल्याचे विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात राज्य माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(१०) नुसार अंतरिम आदेश पारित केले. खटीक यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी २५० रुपये, कमाल २५ हजार रुपयांपर्यंत शास्ती का लावू नये, याचा खुलासा मागविण्यात आला आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांच्या जबाबदारी बाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी केळापूर यांनाही पुढील सुनावणीला सक्षम उपस्थित राहून खुलासा सादर करण्याची नोटीस बजावण्याचे निर्देश आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे. सात वर्षे माहितीच्या प्रतीक्षेत राहून आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागणे, ही माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणी वरील गंभीर प्रश्नचिन्ह ठरले आहे.

अनाथ बालकांच्या आयुष्यात मायेची दिवाळी..!

यवतमाळ : दिवाळीच्या झगमगाटात समाजातील अनाथ, वंचित आणि निराधार बालकांच्याही आयुष्यात आनंदाची फुले फुलावीत, या संवेदनशील भावनेतून यवतमाळमध्ये माणुसकीचा दीपोत्सव साजरा करण्यात आला. विवेकानंद विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आणि दानशूर सहकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध बालगृहांमधील बालकांना निमंत्रित करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद वाटला.या उपक्रमांतर्गत बालकांना त्यांच्या आवडीनुसार आकाश मॉलमध्ये नवीन कपड्यांची खरेदी करून देण्यात आली. त्यानंतर दारव्हा रोडवरील हॉटेल एकविरा येथे स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. नवीन कपड्यांची भेट, स्वादिष्ट भोजन आणि आपुलकीच्या सहवासामुळे बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. विशेष म्हणजे, केवळ सणापुरती मदत न करता गेल्या पाच वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. बालकांना प्रेम, सन्मान आणि आपलेपणाची जाणीव करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिल गायकवाड आणि अमित शिरमाते यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली. विवेकानंद विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या दानशूर सहकाऱ्यांच्या योगदानातून हा आनंदोत्सव उत्साहात पार पडला. स्वतःच्या आनंदात वंचितांनाही सहभागी करून घेण्याची वृत्तीच खऱ्या अर्थाने दिवाळीचा प्रकाश अधिक व्यापक करते, असा माणुसकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

विजेच्या लपंडावात रब्बी पिके करपण्याची भीती!

महावितरणच्या विरोधात शेकडो शेतकऱ्यांचा कार्यालयावर धडक मोर्चा.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

फुलसावंगी, दि. ३ : निसर्गाच्या अवकृपेने खरीप हंगाम हातचा गेल्यानंतर रब्बी पिकांवर आशा लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आता महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याने भर घातली आहे. कधीही वीज गायब होत असल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले असून, विजेच्या लपंडावात रब्बी पिके करपण्याची भीती निर्माण झाली आहे. या मनमानी कारभाराविरोधात टाकळी, नारळी आणि आमडापूर येथील शेकडो संतप्त शेतकऱ्यांनी फुलसावंगी येथील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारला.



> **शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या असून लवकरच तोडगा काढून त्यांचे समाधान करू.**
>
> **— राहुल डोंगरे,**
> **उपअभियंता, फुलसावंगी विद्युत उपकेंद्र**

आधीच दुष्काळामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आता विहिरी आणि कूपनलिकांमध्ये उपलब्ध असलेल्या मर्यादित पाण्यावर रब्बी पिके जगविण्याची धडपड सुरू आहे. मात्र, कोणतेही निश्चित वेळापत्रक नसताना वारंवार वीज खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. रात्री-अपरात्री शेतात थांबूनही ऐन सिंचनाच्या वेळी वीज गायब होत असल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. फुलसावंगी विद्युत उपकेंद्रातून परिसरातील सुमारे ४२ गावांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, तांत्रिक बिघाड आणि भारनियमनाच्या नावाखाली अनियमित वीजपुरवठा होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शेतीसाठी नियमित, पूर्ण दाबाने आणि निर्धारित वेळापत्रकानुसार वीज द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी उपअभियंता राहुल डोंगरे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेत लवकरच तोडगा काढून समाधान करण्याचे आश्वासन दिले. मात्र, आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती महत्त्वाची असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास रस्ता रोको आणि महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्याचे आंदोलन छेडले जाईल, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

शासकीय धान्याचा काळाबाजार उघड, तांदूळ व ट्रक सह २७ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. ३ : शासकीय सार्वजनिक वितरण प्रणाली अतर्गत गरजू लाभार्थ्यांसाठी वितरित करण्यात येणाऱ्या तांदळाची काळ्या बाजारात विक्री करण्याचा प्रकार महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळच्या पथकाने धडक कारवाई करीत तब्बल १९४.९६ क्विंटल तांदूळ आणि ट्रक असा एकूण अंदाजे २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अवैध धंदे व गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार २४ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्याबाबत गुप्त माहिती मिळाली. पथकाने नागपूर-तुळजापूर मार्गावर पेट्रोलिंग करीत असताना ट्रक क्रमांक MH-२६-BE-१८२१ संशयास्पदरीत्या जात असल्याचे आढळले. ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तांदूळ आढळून आला. चालक यांच्याकडे तांदळाच्या खरेदीची पावती,बिल किंवा वाहतुकीचा वैध परवाना मागितला असता तो कोणताही कागदोपत्री पुरावा सादर करू शकला नाही. त्यानंतर तहसील कार्यालय महागाव यांच्याशी पत्रव्यवहार करून सदर तांदूळ शासकीय सार्वजनिक वितरण प्रणालीतील असल्याची खातरजमा करण्यात आली. पुरवठा विभागाच्या अहवालानुसार ट्रकमधील एकूण १९४.९६ क्विंटल तांदूळ शासकीय वितरण प्रणालीतील असल्याचे स्पष्ट झाले. हा तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेला जात असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी चालक अंबादास नंदू व्यवहारे, शेख शौकत शेख महताब व वाजिद (पूर्ण नाव समजू शकले नाही) यांच्याविरुद्ध महागाव पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ तसेच पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे पो.स्टे. महागाव यांचे मार्गदर्शनात सपोनि. धिरज बांडे, पोउपनि. अमोल राठोड, पुरवठा अधिकारी मोहन कोल्हे तहसील कार्यालय महागाव, सफौ. मुन्ना आडे, संतोष भोरगे,व अन्य स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीपणे पार पडली.

बालकांना हक्काचे कुटुंब,दत्तक पालकांचे स्वप्न साकार!

यवतमाळ जिल्ह्यात प्रथमच तीन दत्तक विधान आदेश पारित..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ३ : अनाथ व निराधार बालकांना केवळ आधार देण्यापलीकडे जाऊन त्यांना प्रेम, माया आणि सुरक्षित कौटुंबिक वातावरण मिळवून देण्याच्या दिशेने यवतमाळ जिल्ह्यात महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून दत्तक विधान नियमावली २०२२ अंतर्गत जिल्ह्यात प्रथमच तीन बालकांच्या दत्तक विधानाचे आदेश पारित करण्यात आले. त्यामुळे तीन बालकांना हक्काचे कुटुंब मिळाले असून, अनेक वर्षांपासून पालकत्वाची प्रतीक्षा करणाऱ्या दाम्पत्यांचे स्वप्न साकार झाले आहे.



या तिन्ही प्रकरणांमध्ये बालकांचे सर्वोत्तम हित केंद्रस्थानी ठेवून कायदेशीर प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी आणि प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दत्तक विधान आदेशांना मान्यता देत संबंधित पालकांना आदेश वितरित केले. या प्रक्रियेत जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि बाल न्याय यंत्रणेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अनधिकृत दत्तक प्रक्रियेपासून सावध राहण्याचे आवाहन बालक दत्तक घेणे ही केवळ पालकत्वाची इच्छा पूर्ण करणारी बाब नसून, त्या बालकाच्या संपूर्ण आयुष्याची जबाबदारी स्वीकारण्याची सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे इच्छुक दाम्पत्यांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्ती अथवा मध्यस्थाच्या माध्यमातून दत्तक प्रक्रिया न करता शासनमान्य कायदेशीर प्रक्रियेचाच अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले. दत्तक पालकांनी बालकांचे संगोपन, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवावे, असेही त्यांनी सांगितले. तीन बालकांना मिळालेला हा कौटुंबिक आधार म्हणजे संवेदनशील प्रशासन आणि सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संगम ठरला आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे संपर्क साधावा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनात वर्षावास समारोप संपन्न..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि. ३ : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात वर्षावास समारोप कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडला. बौद्ध धर्मातील अत्यंत महत्त्वाची धार्मिक परंपरा असलेल्या वर्षावासाची सांगता यावेळी करण्यात आली. वर्षावास ही भगवान गौतम बुद्धांनी सुरू केलेली प्राचीन बौद्ध परंपरा आहे. या काळात भिक्षू पावसाळ्यातील तीन महिने एकाच ठिकाणी वास्तव्यास राहून ध्यान, चिंतन, धम्माचा अभ्यास तसेच उपासकांना धम्माचे मार्गदर्शन करतात. पावसाळ्यात होणारा प्रवास टाळणे, सूक्ष्म जीवांची हिंसा होऊ नये आणि भिक्षूंना साधनेसाठी अनुकूल वातावरण मिळावे, हा या परंपरेमागील मुख्य उद्देश आहे. साधारणपणे आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंत वर्षावासाचा कालावधी असतो. या तीन महिन्यांच्या कालावधीत धम्माचे आचरण, विचारांचे आदानप्रदान आणि सामाजिक प्रबोधनाला विशेष महत्त्व दिले जाते. या समारोपीय कार्यक्रमाला माता रमाई महिला मंडळ, मुकुटबनच्या सर्व पदाधिकारी व सदस्य, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. वर्षावासाच्या माध्यमातून भगवान बुद्धांचे विचार, धम्माचे महत्त्व आणि सामाजिक एकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी अधोरेखित झाला. उपस्थितांच्या सहभागामुळे कार्यक्रम उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.



शेतरस्त्यांच्या कामांना आता बाळू जाधवांचे नेतृत्व!

घाटंजी, दि. ३ : मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदण रस्ते योजनेच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी आणि विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सहअध्यक्षपदी बाळू दशरथ जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल विभागाने ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन शुद्धी पत्रकातून या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केले आहे. यापूर्वी या पदासाठी अंकुश अनंतराव ठाकरे यांचे नाव निश्चित करण्यात आले होते. मात्र, नव्या शुद्धीपत्रकाद्वारे त्यांच्या जागी बाळू जाधव यांचे नाव समाविष्ट करण्यात आल्याने प्रशासकीय पातळीवर महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्यांची वणवण थांबविणे, पावसाळ्यातील दळणवळणाच्या अडचणी दूर करणे आणि शेतीमालाची वाहतूक सुलभ करणे, हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आता सहअध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर जाधव यांच्यासमोर रखडलेल्या शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

शेतकरी कन्यांच्या स्वप्नांना वडसहाय्य फाऊंडेशनचे बळ!

विभागीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभुळगाव, दि. ३ : ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलींनी जिद्द आणि मेहनतीच्या बळावर क्रीडा क्षेत्रात यशाची झेप घेतली आहे. जिल्हास्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी करत अमरावती येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना वडसहाय्य फाऊंडेशनने रायफल गन भेट देऊन प्रोत्साहन दिले.



आर्थिक मर्यादांमुळे ग्रामीण गुणवंतांच्या स्वप्नांना खीळ बसू नये, ही भूमिका घेत फाऊंडेशनने पुढाकार घेतला. केवळ कौतुकाचे शब्द नव्हे, तर खेळाडूंच्या गरजेनुसार प्रत्यक्ष मदतीचा हात देत त्यांच्या यशाच्या वाटेला बळ दिले. ग्रामीण मुलींमध्ये गुणवत्ता असूनही साधनांच्या अभावामुळे अनेक स्वप्ने अपूर्ण राहतात, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन केलेला हा उपक्रम उल्लेखनीय ठरला. यावेळी योगेश धानोरकर, अनिकेत पोहोकार, अक्षय राऊत, अमोल लाकडे, अतुल गावंडे, अमित ठाकरे, निलय पोफारे, अनिकेत राऊत, आशिष मोघे, तिलक डोमडे, शंकर मश्राम, कविश गावंडे आदी उपस्थित होते. गुणवत्तेला संधी आणि स्वप्नांना साधने मिळाली, तर ग्रामीण कन्याही यशाचे लक्ष्य अचूक भेदू शकतात, हाच संदेश या उपक्रमाने दिला.

दिवाळीच्या गर्दीत पुसद बाजारपेठ वाहतूकीच्या विळख्यात!

'आम्ही पुसदकर सोशल फाउंडेशन'चे पोलिसांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ३ : दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत उसळलेली गर्दी आणि त्यात अरुंद रस्त्यांवरून धावणारी वाहने यामुळे पुसद शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडण्याची स्थिती निर्माण झाली आहे. संभाव्य अपघात आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सुभाषचंद्र बोस चौक ते नगीना मशीद चौक ते सोनार लाईनमार्गे महावीर चौक या मार्गावरील तीनचाकी व चारचाकी वाहनांची वाहतूक दिवाळीची गर्दी संपेपर्यंत तात्पुरती बंद करावी, अशी ठोस मागणी 'आम्ही पुसदकर सोशल फाउंडेशन'ने निवेदनात संबंधित मार्गाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून वाहनबंदीचा निर्णय घेणे, रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग हटविणे तसेच दुचाकी आणि पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र व सुरळीत वाहतूक व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. दिवाळीच्या बाजारपेठेत नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा वाहतुकीच्या नियोजनाकडे दुर्लक्ष होऊ नये. गर्दी वाढल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी प्रशासनाने वेळीच पावले उचलावीत, अशी अपेक्षा फाउंडेशनच्या जागरूक नागरिकांनी व्यक्त केली आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



डॉ.निलेशकुमार इंगोले यांचा सत्कार

अमरावती- नवनियुक्त केंद्रप्रमुख, केंद्रस्तरीय विशेष शिक्षक व नवनियुक्त शिक्षकांचे स्वागत व अभिनंदन करण्यासाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, अमरावती व स्व. सौ. सुनीता पाटील मेमोरियल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वागत व अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात पं. स. धारणी येथील नवनियुक्त केंद्रप्रमुख, डॉ. निलेशकुमार इंगोले यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.जोशी हॉल, अमरावती येथे पार पडलेल्या या सोहळ्याला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष कार्यक्रमात विभागीय परीक्षेव्दारे नवनियुक्त झालेले केंद्रप्रमुख, डॉ. निलेशकुमार इंगोले यांचा जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. सिद्धेश्वर काळुसे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्च देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नवनियुक्त केंद्रप्रमुखांच्या शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदारीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या. या स्वागत सोहळ्याच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील नव्या नेतृत्वाचा सन्मान व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला राज्य उपाध्यक्ष किरण पाटील, जिल्हाध्यक्ष गजानन चौधरी, इतर पदाधिकारी, अधिकारी वर्ग, नवनियुक्त केंद्रप्रमुख, विशेष शिक्षक, शिक्षण सेवक व शिक्षक, आदी उपस्थित होते.



रामकृष्ण चिखलकर यांचा सेवापूर्ती

अमरावती- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी अमरावती शहरांतर्गत विद्युत भवन उपकेंद्र येथील यंत्रचालक रामकृष्ण चिखलकर यांचा कार्यकारी अभियंता अमरावती शहर मुख्य कार्यालयात सेवापूर्ती सोहळा पार पडला. त्यांचा सपत्नीक सत्कार कार्यकारी अभियंता संजय शृंगारे यांनी केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय शृंगारे, सत्कारमूर्ती रामकृष्ण चिखलकर व लता चिखलकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता वानखडे, वैशाली पंधरे, रुपाली खोब्रागडे, विलास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रतिभा साहित्य संघाचे मंगेश वानखडे, पत्रकार जीवन राऊत, वंदना खोब्रागडे, वंदना वानखडे, सहायक अभियंता राजेश गांजरे, पूर्वा वन्हेकर, कैलास अंबाडकर, रवी शिराळकर, कृष्णा तट्टे, हेमंत मस्करे, अधिर बेदरकर, गजानन गव्हाळे, प्रदीप गंधे, अनुप धर्माळे, हरीश इंगोले, मनीष केंदळे, अमोल काकडे, आशिष चव्हाण, संजय खेडकर, अजय बावणे, प्रवीण दळवी, सौरभ खरबडे, सुक्षाली गाठे, सुषमा दळवी, प्रशांत भराडे आदींची उपस्थिती होती.

स्वच्छ अमरावतीच्या संकल्पाला मिळणार नवी गती

स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्राप्त यंत्रसामग्री व वाहनांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

अमरावती/का.प्र.

शहराला स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त आणि आरोग्यदायी शहर बनविण्याच्या दिशेने अमरावती महानगरपालिकेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी स्वच्छ भारत अभियानांतर्गत अमरावती महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या स्वच्छता यंत्रसामग्री व विविध वाहनांचे प्रातिनिधिक लोकार्पण राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. स्वच्छता व्यवस्थेला आधुनिक स्वरूप देणे, कचरा संकलन व वाहतुकीची यंत्रणा अधिक सक्षम करणे तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता प्रभावीपणे राखणे या उद्देशाने या वाहनांची व यंत्रसामग्रीची उपलब्धता महत्त्वपूर्ण ठरणार आहे. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर येणारा ताण लक्षात घेता आधुनिक साधनसामग्रीचा वापर केल्यामुळे स्वच्छता मोहिमेला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे.लोकार्पण सोहळ्यात खासदार डॉ. अनिल बोंडे,



आमदार प्रविण पोटे पाटील, आमदार सुलभा खोडके, आमदार प्रताप अडसूळ, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता डॉ. राजेंद्र तायडे, शिक्षण समिती सभापती ॲड. प्रीती रेवणे, नगरसेवक आशिष अतकरे, मिलींद बाबल, संजय नरवणे, प्रशांत वानखडे, चंदू खेडकर, सैय्यद राशद अली, विनोद तानवैस, संजय तिरथकर, नगरसेविका शाह बीबी बतुल ताहेर, सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप पाठबागे, नगरसचिव अक्षय निलंगे, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

तोमोय प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलचा वार्षिक महोत्सव उत्साहात

'कलर क्रिएटर्स अँड एरा इनोव्हेटर्स' संकल्पनेतून कला, साहित्य आणि संस्कृतीचा रंगारंग आविष्कार

अमरावती/का.प्र.

तोमोय प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने 'कलर क्रिएटर्स अँड एरा इनोव्हेटर्स' (रंग निर्माते आणि युगप्रवर्तक) या संकल्पनेवर आधारित भव्य वार्षिक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कला, साहित्य आणि संस्कृतीचे विविध रंग उलगडणाऱ्या या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.



या कार्यक्रमाला पोलीस आयुक्त राकेश ओला आणि श्रीमती ओला यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच वास्तुविशारद आशा देशमुख, सूर्यप्रभा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अरुंधती देशमुख, सचिव आदित्य देशमुख, खजिनदार, प्रशासन समिती सदस्या वृषाली देशमुख आणि तोमोय मॉन्टेसरी स्कूलच्या समन्वयक अर्चना जोशी यांची विशेष उपस्थिती होती.शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली आवळे, उपमुख्याध्यापिका मेघना मिटकरी आणि प्रशासक (सामान्य प्रशासन) सतीश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, संगीत आणि अभिनयाच्या माध्यमातून आपली कला,सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांचे दर्शन घडविले.महोत्सवाच्या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांनी विविध महान साहित्यिक, कलाकार आणि युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वांचे जीवनकार्य व विचार आपल्या सादरीकरणातून जिवंत केले.

रंगीबेरंगी वेशभूषा, आकर्षक रंगमंच सजावट,मनमोहक संगीत आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कलाविष्कारामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर पाहुणे, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले. राष्ट्रगीताने या भव्य वार्षिक महोत्सवाची उत्साहपूर्ण सांगता झाली.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारा आणि भारतीय कला-संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणारा हा वार्षिक महोत्सव संस्मरणीय ठरला.

महावितरणच्या मनमानीविरोधात ६ पासून आंदोलन

अमरावती/का.प्र.

महावितरण प्रशासनाच्या कथित मनमानी, हुकूमशाही आणि अन्यायकारक धोरणांविरोधात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने आक्रमक पवित्रा घेतला आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी ६ नोव्हेंबरपासून अमरावती परिमंडळ कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सर्कल सचिव अमोल काकडे यांनी दिली.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या वतीने रविवार दि. १ नोव्हेंबर रोजी संघटनेची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड मोहन शर्मा होते. महावितरणमधील तांत्रिक, अतांत्रिक तसेच लेखा विभागातील रिक्त पदे तातडीने भरणे, कर्मचारी भरती होईपर्यंत रिस्ट्रक्चरिंग रद्द करणे, कर्मचाऱ्यांचे आठ तासांचे काम निश्चित करणे आणि अतिरिक्त कामाचा मोबदला देणे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. दुष्काळी परिस्थितीत



थकीत वीजबिल वसुलीसाठी कर्मचाऱ्यांवर सक्ती करू नये, रजा नाकारण्याचे प्रकार थांबवावेत, स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करू नये, अपूर्ण टूलकिटऐवजी संपूर्ण साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशाही मागण्या आहेत.

तसेच सीपीएफ ट्रस्टच्या संदर्भात सभासदांनी हरकती नोंदविण्याची मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी प्रशांत शिंदे, राजेंद्र सलामे, मोहम्मद जरीन, नितीन तट्टे यांच्यासह विविध विभागांतील पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

डॉ.विजया संगावार आणि प्रा.गणेश येरावार यांचे पर्यावरणपूरक संशोधन

प्लास्टिक कचऱ्यापासून धागे बनवणाऱ्या यंत्राला 'पेटंट'

अमरावती/का.प्र.

पर्यावरणासाठी धोका ठरणाऱ्या टाकाऊ प्लास्टिकच्या समस्येवर विदर्भातील संशोधकांनी प्रभावी व पर्यावरणपूरक तोडगा शोधून काढला आहे. अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या भौतिकशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका डॉ. विजया संगावार आणि आर्वी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. गणेश येरावार यांनी विकसित केलेल्या 'डिझाइन ऑफ प्लास्टिक वेस्ट फायबर मेकिंग मशिन' या तंत्रज्ञानाला भारत सरकारकडून अधिकृत 'डिझाइन पेटंट' मंजूर झाले आहे. २७ ऑक्टोबर रोजी य पेटंटवर केंद्र सरकारची मोहोर उमटली.

डॉ. विजया संगावार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. गणेश येरावार यांनी हे महत्त्वपूर्ण संशोधन पूर्ण केले आहे.



विकसित करण्यात आलेली ही 'फायबर मेकिंग मशीन' पूर्णपणे प्रदूषणमुक्त आहे. दैनंदिन वापरातील जवळपास सर्व प्रकारच्या टाकाऊ प्लास्टिकचे पुनर्वापर (रिसायकलिंग) या यंत्राद्वारे शक्य होणार



डॉ.विजया संगावार प्रा.गणेश येरावार

आहे. विशेष म्हणजे, या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या घातक रसायनांचा वापर करावा लागत नाही. अतिशय कमी ऊर्जा आणि अत्यल्प खर्चात टाकाऊ प्लास्टिकवर प्रक्रिया करून औद्योगिक वापरासाठी आवश्यक असणारे उच्च गुणवत्तेचे फायबर्स (धागे) तयार करता येतात. संशोधन क्षेत्रात सातत्य राखणाऱ्या डॉ. विजया संगावार यांच्या नावावर नोंदवले गेलेले हे पाचवे पेटंट आहे, तर प्रा. गणेश येरावार यांचे हे दुसरे पेटंट ठरले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण, पर्यावरण आणि विज्ञान वर्तुळातून दोन्ही संशोधकांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

भविष्यातील संधींची नवी कवाडे खुली

या यंत्राद्वारे तयार होणारे धागे उद्योग क्षेत्रातील विविध उत्पादनांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. यामुळे लघुउद्योजक, स्टार्टअप्स आणि वस्त्रोद्योग क्षेत्राला कच्च्या मालाचा नवा व स्वस्त पर्याय उपलब्ध होईल. पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच औद्योगिक संधींची नवी कवाडे या संशोधनामुळे खुली झाली असून, प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाच्या दिशेने हे तंत्रज्ञान क्रांतिकारी पाऊल ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

आदिवासी व भूमिहीन मजुरांना रोजगार मिळणार का?

रोजगार अधिकार यात्रेतून प्रशासनाला जाब!

मेळघाट/वार्ताहर

मेळघाट व अचलपूर परिसरातील गरीब आदिवासी, भूमिहीन मजूर आणि गरजू कुटुंबांना रोजगाराची हमी मिळावी, या मागणीसाठी रोजगार अधिकार यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक हाताला काम आणि केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. मात्र, प्रत्यक्षात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, असा सवाल या यात्रेच्या माध्यमातून उपस्थित केला जात आहे.

२७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या रोजगार अधिकार



यात्रेच्या माध्यमातून मेळघाट व अचलपूर परिसरातील रोजगाराच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जात आहे. आदिवासी, भूमिहीन आणि वंचित घटकांना त्यांच्या हक्काचा रोजगार मिळावा, ही प्रमुख मागणी आहे.याच अनुषंगाने ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग, धारणी यांच्या कार्यालयात रोजगार अधिकार यात्रेचे निवेदन व पाठपुरावा करण्यात येणार आहे.तसेच ४ नोव्हेंबर २०२६ रोजी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या कार्यालयात रोजगार अधिकार यात्रेच्या माध्यमातून रोजगाराच्या प्रश्नांवर लक्ष वेधण्यात येणार आहे.मेळघाट व अचलपूर परिसरातील बांधवांनी तसेच सर्व समाजबांधवांनी रोजगाराच्या या न्याय्य लढ्यात सहभागी व्हावे आणि प्रत्येक गरजू कुटुंबाला रोजगाराचा हक्क मिळवून देण्यासाठी एकजूट दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.प्रत्येक हाताला काम, प्रत्येक कुटुंबाला रोजगार आणि प्रत्येक मजुराला न्याय मिळालाच पाहिजे!

पालकमंत्र्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय धनुर्धर कुमकुम मोहोड हिचा सत्कार

स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या धनुर्विद्या मैदानाचे उद्घाटन

अमरावती/का.प्र.

कुमकुम मोहोड आणि यशदीप भोगे या धनुर्धरांसह,भारतीय महिला क्रिकेट संघाची खेळाडू भारती फुलमाळी यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेत केलेल्या उच्च दर्जाच्या कामगिरीमुळे अमरावतीला जागतिक बहुमान मिळाला आहे. स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेच्या धनुर्विद्या मैदानाहूनही असेच आंतरराष्ट्रीय स्तरावर या जिल्ह्याचे नाव झळकवणारे खेळाडू तयार होतील, असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.आंतरराष्ट्रीय धनुर्धर कुमकुम मोहोड यांची भेट घेऊन त्यांनी सत्कार केला.

येथील निंभोरा खुर्द भागात स्थित स्कूल ऑफ स्कॉलर्स मध्ये नव्याने निर्मित धनुर्विद्या मैदानावर पालकमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्रशिक्षित तिरंदाज विद्यार्थ्यांनी नेम धरला व औपचारिकरित्या फित कापून धनुर्विद्या मैदानाचे उद्घाटन केले.त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे,आमदार सर्वश्री प्रताप अडसळ,



प्रवीण तायडे,राजेश वानखडे,अग्निहोत्री गृप ऑफ इन्स्टिट्यूटचे सचिव सचिन अग्निहोत्री, शाळेचे मुख्याध्यापक एन.संतोष कुमार आदी यावेळी उपस्थित होते.मुख्याध्यापक एन.संतोष कुमार यांनी स्वागतपर भाषण केले तर अग्निहोत्री गृप ऑफ इन्स्टिट्यूटचे सचिव सचिन अग्निहोत्री यांनी प्रास्ताविक केले.शाळेचे माजी विद्यार्थी आंतरराष्ट्रीय धनुर्धर यशदीप भोगे यांचे प्रशिक्षक गणेश विश्वकर्मा यांच्या उपस्थितीत यशदीप यांचे वडील संजय भोगे यांचा यावेळी श्री. बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जपान येथे नुकत्याच आयोजित आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या धनुर्धर कुमकुम मोहोड यांच्या साई नगर परिसरातील गोसावी कॉलनीत स्थित घरी जाऊन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचा सत्कार केला.खासदार डॉ. अनिल बोंडे,आमदार सर्वश्री प्रताप अडसळ, प्रवीण तायडे,राजेश वानखडे,कुमकुम यांचे वडील अनिल मोहोड,आई रुपाली मोहोड आणि कुटुंबीय आदी यावेळी उपस्थित होते.

खेळातून समन्वय आणि संघभावनेची जाणीव-आ.सुलभा खोडके

मराठा फ्रेंड्स क्लबच्या वतीने विभागीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा

अमरावती/का.प्र.

खेळ हा केवळ मनोरंजनाचा किंवा शारीरिक व्यायामाचा प्रकार नसून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, समन्वय आणि संघभावना निर्माण करणारे प्रभावी माध्यम आहे. जीवनात यश संपादन करण्यासाठी एकमेकांशी समन्वय साधून आणि संघटनात्मक भावनेतून काम करण्याची वृत्ती खेळाच्या माध्यमातून विकसित होते, असे प्रतिपादन आ. सुलभा खोडके यांनी केले. मराठा फ्रेंड्स क्लब रुख्मिणीनगरच्या वतीने आयोजित विभागीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेच्या उदघाटनाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना



शुभेच्छा देत त्यांच्या क्रीडागुणांचे कौतुक केले. या विभागीय खो-खो स्पर्धेमध्ये अमरावती विभागातील विविध शाळांमधील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. १४ व १७ वर्ष वयोगटातील या स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी मैदानावर चुरशीचे सामने खेळत आपल्या अंगीभूत क्रीडाकौशल्याचे दमदार प्रदर्शन केले. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेला आमदार महोदयांनी शुभेच्छा देऊन आयोजकांचे अभिनंदन देखील केले याप्रसंगी मराठा फ्रेंड्स क्लबचे अध्यक्ष सर्वश्री जगदीश नाना बोन्डे, उपाध्यक्ष-[illegible]दाहाके, सब्जीवाले,प्रकाश आवारे, सचिव-श्याम गुल्हाने. कोषाध्यक्ष-अँड.सुनिल पुंड. सहसचिव-पंकज गुल्हाने, सहकोषाध्यक्ष-नितीन डहाके, जिल्हा क्रीडा अधिकारी-गणेश जाधव, अमरावती जिल्हा खो-खो असोशिएशनचे-सचिव गजेंद्र रघुवंशी, राजाभाऊ देशमुख, नितीन चव्हाळे, दिलीपे फुलझेले, छोटूभाऊ देशमुख, शेख सलीम, पापा चंदेल, किशोर भुयार, संजय बोबडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस क्रीडा प्रमुख सार्थक खोरगडे आदींसह खो-खो क्रीडा स्पर्धेत सहभागी संघातील खेळाडू, संघ व्यवस्थापक,प्रशिक्षक तसेच क्रीडाप्रेमी प्रामुख्याने उपस्थित होते.

चारा टंचाई आणि उपाययोजना

चालु आर्थिक वर्षातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. चारा टंचाई, उपाययोजना आणि चारा उत्पादन या विषयीची ही माहिती...



विशेष लेख

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हे प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहेत. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंदाच्या खरीप हंगामापासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. त्यातही चाऱ्याअभावी पशुधन वाचविणे ही एक मोठी समस्या समोर उभी राहणार आहे.

महाराष्ट्र राज्यात २०२६ च्या नैऋत्य मोसमी पावसामध्ये झालेली तूट, पावसाचे असमान वितरण, खरीप पिकांच्या उत्पादनात झालेली घट तसेच यावर्षीच्या रब्बी हंगामामधील संभाव्य कमी पेरणी क्षेत्र यामुळे पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत राज्यभरात चारा उत्पादनावर भर देण्यात येणार आहे.

राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीस चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता ६ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयान्वये गठीत अभ्यासगटाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये चारा उत्पादन वाढविणे, कमी पाण्यात येणाऱ्या व बहुकापणी चारा पिकांना प्रोत्साहन देणे, चारा बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे, शासकीय जमिनींवर चारा लागवड करणे, चारा उत्पादनाबाबत प्रात्यक्षिके आयोजित करणे आणि उपलब्ध यंत्रसामग्रीचा वापर करणे इत्यादी उपाययोजनांची शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय यंत्रणा, कृषी विद्यापीठ, तालुका बीज गुणन केंद्र व संबंधित संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०२० मध्ये चारा टंचाईच्या काळात कृषी विभागाने करावयाची कार्यवाही नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने अभ्यासगटाच्या कृषी विभागाशी संबंधित शिफारशींची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता कृषी विभागामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची गरज ओळखून त्यादृष्टीने शासनाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

दुष्काळजन्य परिस्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत अभ्यासगटाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अहवालातील कृषी विभागाशी संबंधित शिफारशी विचारात घेऊन, राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

चारा बियाण्यांची उपलब्धता व नियोजन

रब्बी हंगाम २०२६ मध्ये चारा बियाण्याची कमतरता भासू नये याकरीता आयुक्त (कृषी) यांनी चारा पिकांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांची जिल्हानहाय व पिकनिहाय मागणी पशुसंवर्धन विभागातील संबंधित अधिकारी यांच्या समन्वयाने निश्चित करावी. त्यानुसार महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, एच.आय.एल., वृक्षभको, एन.एफ.एल., आय.एफ.एफ.डी.सी., आय.सी.ए.आर., के.व्ही.के. इत्यादी यांच्या समन्वयाने बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तथापि, यासंदर्भातील केंद्र शासनाच्या सर्वसाधारण व विशिष्ट मार्गदर्शक सूचनांचे तसेच आवश्यक त्या नोंदणी, परवाना इत्यादींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत उत्पादन देणारी व एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यास प्राधान्य देण्यात यावे. यासाठी स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार, सिंचनाची उपलब्धता व पीक कालावधी विचारात घेऊन योग्य चारा पिकांची शिफारस पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या समन्वयाने शेतकऱ्यांना करण्यात यावी.

चारा साक्षरता अभियान व प्रोत्साहन

स्थानिक परिस्थितीनुसार मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, शुगरग्रेझ व इतर योग्य चारा पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे. सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे अशा क्षेत्रांमध्ये रब्बी हंगामात चारा पिकांची लागवड वाढविण्यासाठी आवश्यक बियाणे, खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, पेरणीची योग्य वेळ, कापणी व पुनर्वाढ साठवणूक व अपव्यय कमी करणे इत्यादी बाबत कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणांनी पशुसंवर्धन विभाग, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांच्या समन्वयाने मार्गदर्शन करावे.

चारा पिकांची लागवड, उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, कापणीचे नियोजन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन याबाबत शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत. चारापिकांचे लागवड तंत्र, खत व्यवस्थापन व अल्प कालावधीचे गवत व हंगामी चारापिके इत्यादी चारा लागवडीच्या तांत्रिक बाबींबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कृषी विभागाच्या नियमित विस्तार कार्यक्रमांचा प्रभावी वापर करावा.

कृषी विभागाच्या जमिनीवर चारा

वृक्षी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे व महाबीज इत्यादी कडील जमिनींचा आढावा घेऊन, जेथे शक्य आहे व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत अशा क्षेत्रांवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेज, ज्वारी, बाजरी यासारख्या चारा पिकांची रब्बी हंगामात प्राधान्याने लागवड करण्यात यावी. हायड्रोफोनिक, अझोला व बिनकाटेरी निवडून लागवड यासारख्या पर्यायी स्रोताद्वारे चारा उत्पादन करण्याच्या पद्धतींचा कृषी विद्यापीठाद्वारे मोहिम स्वरुपात कार्यक्रम राबविण्यात यावा. संबंधित संस्थांनी उपलब्ध जमीन, सिंचन सुविधा, लागवडीसाठी आवश्यक निविष्ठा व अपेक्षित उत्पादन यांचा विचार करून चारा लागवडीचा नियोजन आराखडा तयार करावा.

कृषी विद्यापीठे व बीज गुणन केंद्रांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक चारा लागवड प्लॉट विकसित करण्यात यावेत. या प्रक्षेत्रांचा उपयोग शेतकरी प्रशिक्षण, चारा पिकांचे प्रात्यक्षिक व तंत्रज्ञान प्रसारासाठी करण्यात यावा. ही कार्यवाही करताना संबंधित जमिनींचा मूळ उद्देश, अंमलात असलेली प्रचलित कार्यपद्धती यांचा अवलंब करावा.

चारा कापणीसाठी यंत्रसामग्री

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील कस्टम हायरींग सेंटर, कृषी औजारे बँक यांची व त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीची माहिती शेतकऱ्यांना तसेच पशुसंवर्धन विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावी. पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही माहिती व त्यांच्याकडील माहिती विचारात घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

जिल्ह्यातील उपलब्ध चाऱ्याचे/चारापिकांचे लागवडीखालील क्षेत्राचे मॅपिंग व सूक्ष्म नियोजन करण्यासाठी चारापिकांखालील क्षेत्र, पीकनिहाय पेरणी क्षेत्र व अपेक्षित उत्पादन (पीक अवशेषांसह) याबाबतची माहिती तसेच चारा उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्था/कंपन्या (FPO/FPC) यांचे नेटवर्क तयार करण्यासाठी आवश्यक माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधित यंत्रणांच्या मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी.

चारा उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे. आयुक्त (वृक्षी) यांनी आवश्यकतेनुसार त्यांच्या स्तरावर स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात.

आयुक्त (कृषी), विभागीय कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी वरील बाबींच्या अनुषंगाने नियमितपणे आढावा घ्यावा. शासन परिपत्रकातील कृषी विभागाच्या संबंधित बाबींच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरीता कृषी आयुक्त स्तरावर संचालक, विस्तार व प्रशिक्षण, विभाग स्तरावर संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका स्तरावर संबंधित तालुका कृषी अधिकारी हे नोडल अधिकारी राहतील. असेही शासनाने सुचित केले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांनी या शिफारशी/सूचनांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच उपाययोजना व अंमलबजावणी करण्याकरीता कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे व सर्व संबंधितांना स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात व क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय ठेवून कार्यवाही करण्याबाबत निर्देशही देण्यात आले आहेत.

शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. त्याचे सोबती पशुधनही तितकेच महत्वाचे आहे. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती

सरकारचे खाज़गी जुनी वाहने नष्ट करण्याचे धोरण व वास्तव

प्रति,

नितिन गडकरी, महामार्ग आणि परिवहन मंत्री. भारत सरकार, नवी दिल्ली.

माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई

मा.श्री. चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री व पालक मंत्री-नागपूर महाराष्ट्र

राज्य, मुंबई

विषय:- केंद्र व राज्य सरकारचे खाज़गी जुनी वाहने नष्ट (scrap) करण्याचे धोरण व वास्तव.

सस्नेह नमस्कार,

केंद्र व राज्य सरकारने खाज़गी जुनी वाहने (can-Scorter)(Sub) नष्ट करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले आहे. जुन्या वाहनामुळे वाढणारे प्रदूषण कमी करणे हा उद्देश योग्य आहे.

केंद्र सरकारने प्रमाणीत नष्ट ठिकाणी नष्ट केलेल्या (scrap) वाहनांना COD (certificate of deposite) देण्याची व्यवस्था केली आहे. याचा उपयोग करून नवीन खरेदी केलेला वाहनावर जो RTO टॅक्स लागतो त्यावर २५ के सुट व नवीन वाहनाच्या Ex- Showroom किंमती वर ३% OEM सवलता देण्याची घोषणा आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजीनी जुनी वाहने BS-3 ची (scrap) केल्यानंतर मोटार रोड टॅक्स (RTO) मध्ये ३० टक्के सुट देण्याची घोषणा आहे.



मी माझी २००६ची(Tata Indica Diesal) कार (scrap) वाहेला आहे.मिळालेले COD सोबत आहे. मी महिन्द्राची नवीन गाडी विकत घेतली आहे. त्या गाडीचा MVTax १३५३०० रु आहे. यावर मला २०,२९५ रुपयाची सुट देण्यात आली आहे. जाहीर ३० टक्याप्रमाणे ४०५९०रुपये होते. मला २०२९५ रुपये कमी मिळाले हे बरोबर आहे, हा अन्याय दूर व्हावा ही विनंती तर आहेच पण पत्र लिहण्याचे कारण ही चांगली घोषणा व धोरण योग्य प्रकारे राबविले तर जुनी वाहन वापरातून काढणे व प्रदूषण कमी करणे यशस्वी होईल.

आपण विचार करावा, न्याय द्यावा ही आग्रहाची विनंती.

सर्व पुरावे सोबत जोडले आहे.

विजय जावधिया
शेतकरी संघटना पाईक

कोरड्या दुष्काळाची झळ आणि कर्जाचा विळखा

विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे विदारक वास्तव

विदर्भातील कोरडा दुष्काळ आणि कर्जाचा विळखा या दुहेरी संकटामुळे बळीराजाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून चालू वर्षात (२०२६) शेतकरी आत्महत्यांचे विदारक वास्तव पुन्हा एकदा तीव्रतेने समोर आले आहे. विदर्भातील यवतमाळ, अमरावती, वर्धा, वाशीम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये हे संकट अधिक गडद झाले असून, अवघ्या ६ दिवसांत १० शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. गेल्या अनेक दशकांपासून पूर्व आणि पश्चिम विदर्भातील (विशेषतः अमरावती आणि नागपूर विभाग) शेतकरी सातत्याने टोकाचे पाऊल उचलत आहेत. नुकत्याच समोर आलेल्या आकडेवारीनुसार, परिस्थिती अजूनही भीषण असून दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी कमालीचे निराश झाले आहेत.कोरडा दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या हा महाराष्ट्रातील, विशेषतः मराठवाडा आणि विदर्भ या भागांतील एक अत्यंत गंभीर आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.कोरड्या दुष्काळामुळे पेरणी वाया जाते किंवा पिके जळून खाक होतात. शेतीसाठी घेतलेले बँक कर्ज किंवा सावकारी कर्ज फेडणे अशक्य झाल्यामुळे शेतकरी मानसिक दबावाखाली येतात.

वर्ष २०२४ मध्ये महाराष्ट्रात २,७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या (सरासरी दिवसाला ७ आत्महत्या). वर्ष २०२५ च्या पहिल्या ८ महिन्यांत हा आकडा १,१८३ वर पोहोचला होता. मराठवाडा आणि विदर्भ हे दोन विभाग कोरड्या दुष्काळाचा सर्वाधिक फटका बसणारे भाग आहेत. मराठवाड्यात २०२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ७८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले, तर विदर्भातही केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत ८१० हून अधिक आत्महत्यांची नोंद झाली आहे.नजिकच्या काळात ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ च्या काळातही हिंगोली, नांदेड (लोहा) यांसारख्या भागांत कोरड्या दुष्काळामुळे आणि गरिबीमुळे अनेक तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत.



खते, बियाणे आणि कीटकनाशकांचा खर्च सातत्याने वाढत आहे. प्रतिकूल परिस्थितीतून पीक वाचवले, तरी बाजारात शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडते. मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, आजारपण आणि दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाल्याने निर्माण होणारी हतबलता शेतकऱ्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त करते.हवामान बदल पावसाचे अनिश्चित वेळापत्रक, कधी तीव्र कोरडा दुष्काळ तर कधी अचानक येणारी अतिवृष्टी या चक्रात शेती व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे.

कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या यांचा थेट व अत्यंत गंभीर संबंध आहे. विशेषतः ग्रामीण भारतात आणि शेतकरी वर्गामध्ये कर्जबाजारीपणामुळे होणाऱ्या आत्महत्या हा एक अत्यंत संवेदनशील सामाजिक आणि आर्थिक प्रश्न बनला आहे.राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीक कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणींमुळे शेतकरी सावकारांच्या विळख्यात अडकतात. कर्जमाफीच्या योजनांमधील तांत्रिक त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळत नाही.जागतिक संशोधनानुसार, जे लोक गंभीर आर्थिक संकटात किंवा कर्जाच्या विळख्यात अडकलेले असतात, त्यांच्यामध्ये आत्महत्येचा विचार येण्याची शक्यता सामान्य लोकांपेक्षा ३ पटीने जास्त असते.

सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस किंवा पिकांवर पडणारी कीड यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. शेतीत लावलेले भांडवलही वसूल न झाल्याने घेतलेले कर्ज फेडणे अशक्य होते.बाजारात पिकाला उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळाल्यामुळे शेतकरी तोट्यात जातो आणि कर्जाचा डोंगर वाढतच जातो. बँका किंवा प्रामुख्याने खाजगी सावकार आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या मानसिक त्रासामुळे अनेक व्यक्ती टोकाचे पाऊल उचलतात.कर्जाचा बोजा असतानाच मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न किंवा आजारपण यासाठी आणखी कर्ज घ्यावे लागते, ज्यामुळे मानसिक दबाव वाढतो.

शेतमालाला हमीभाव मिळणे आवश्यक आहे पिकांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. जेणेकरून त्यांना मानसिक आधार मिळेल.नैसर्गिक आपत्तीच्या काळात पीक विम्याची रक्कम त्वरित मिळणे आणि गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणे आवश्यक आहे.

शेतकरी जगला तरच देश जगेल. त्यामुळे कोरड्या दुष्काळाच्या काळात आपण सर्वांनी संवेदनशील बनून, राजकीय आणि प्रशासकीय सीमांच्या पलीकडे जाऊन आपल्या अन्नदात्याला मायेचा आणि हक्काचा हात देणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

प्रा. डॉ सुधीर
अग्रवाल, वर्धा
९५६१५९४३०६

बारा वर्षात जमीनींची सर्वाधिक लूट..

अदानीला गुजरातेत ऊर्जा प्रकल्पासाठी १,३२,००० एकर जमीन मिळाली. फक्त बंदरांसाठी अदानीकडे ४५,००० एकर जमीनीची लॅन्ड बॅन्क आहेच. खाणकामासाठी वनजमीन आणि बिगर वनजमीन मिळून ६५०० एकर जमीन आहे. ही फक्त तीन मोठ्या सेक्टर्सची आकडेवारी आहे. बाकी जमीन वेगळीच. याशिवाय लीजवर म्हणजे दीर्घ भाडे मुदतीवर अदानीला १० वर्षापासून ९९ वर्षापर्यंत दिलेली हजारो नव्हे कदाचित लाखो एकर्स जमीन वेगळी. आधीचे तीनही आकडे पब्लीक डोमेनमध्ये उपलब्ध आहेत. पुढची आकडेवारी कुठेही उपलब्ध नाही.

तीन मोठ्या सेक्टर्सची जमीन धरली तरी अदानीची लॅन्ड बॅन्क आज १,८०,००० एकरांच्या आसपास आहे. इतर छोट्यामोठ्या कंपन्यांचं होल्डींग आणि लीजवरच्या जमिनी धरल्या तर हा ग्रुप आज किमान २,५०,००० एकरांपुढे असावा असा अंदाज आहे. २०१४ साली या ग्रुपची लॅन्डबॅन्क २०,००० एकरची होती. त्यात किती पट वाढ वगैरे विषय सोडून द्या. तो नंतर पाहू.

गुगलवरची आकडेवारी असं सांगते की २०१४ पासून २०२६ पर्यंत भारतात तब्बल २३,००,००० एकर शेतजमीन बिगरशेती झाली. यात अर्थातच केवळ टेंडरसाठी काढलेली विकासकामे असतील आणि लोकोपयोगीही थोडीफार असतील. गृहनिर्माण धरून.

एका माहितीनुसार त्यात एक पंच्याऐंशी वर्षाचे शेतकरी म्हणत आहेत की एक गुंठाही शेतजमीन आता सरकारला देणार नाही, मरेपर्यंत संघर्ष करीन. मेलो तरी चालेल. हा एकूणच संघर्ष कुठपर्यंत आला आहे ते पहा. मोदी-शहांचा धाक फक्त पत्रकारांनाच किंवा सरकारी अधिकाऱ्यांनाच आहे असे समजू नका. हे लोक शेतकरी आणि शेतीचेही कर्दनकाळ आहेत. या देशात जमीनींची लूट गेल्या बारा वर्षात झाली तेवढी देशाच्या उभारणीच्या काळातही झाली नाही. घरे, रस्ते, धरणे, फॅक्टरी यांसाठी जमीन लागते हे समजूच शकतो पण उद्योगपतींच्या लॅन्डबॅन्क फुगत जाणे आणि शेतकरी लॅन्डलेस करत जाणे हा लोकांशी केलेला द्रोह आहे.

याविरोधात कोणी आवाज उठवला की मोदी-शहा-फडणवीस-शिंदे त्याला देशद्रोही आणि नक्षलवादी ठरवणार. आणि त्यांचे अंधभक्त ट्रोलिंगसाठी धडपडत येणार.या अंधभक्तांचे डोळे तेव्हाच उघडतील जेव्हा उपजाऊ शेतजमीन संपल्यामुळे त्यांना गहू, ज्वारी, तांदळाऐवजी मोबाईलचे चार्जर आणि क्रेडीट कार्ड खाऊन दिवस काढावे लागतील. तोपर्यंत हे विकास हव्वाच की असे म्हणणार.

-विश्वंभर चौधरी

हलाल मुक्त दीपोत्सवाचा संकल्प!

काही दिवसांवर आलेली दिवाळी हा आपला सर्वात मोठा आणि आनंदाचा सण. दिव्यांचा लखलखता प्रकाश, रांगोळ्यांची कलाकुसर, दारावर आंब्याच्या पानांचे तोरण आणि आनंदाचे वातावरण म्हणजेच आपला दीपोत्सव! आपल्या संस्कृतीत दिवाळीत तयार होणारे फराळाचे पदार्थ, गोडधोड आणि नैवेद्य हे पूर्णपणे पारंपरिक आणि सात्विक पद्धतीने तयार केले जातात. परंतु, गेल्या काही वर्षांपासून बाजारातील व्यवहारांवर एका विशिष्ट प्रकारच्या 'हलाल' प्रमाणपत्राचे सावट पसरत चालले आहे, ज्याची आपल्या संस्कृतीला किंवा सणांना कधीही गरज नव्हती.

विशेष चिंतेची गोष्ट म्हणजे, जे व्यवसाय किंवा ब्रँड्स पूर्णपणे शुद्ध शाकाहारी आहेत आणि ज्यांचा मांसाहाराशी दूरदूरपर्यंत संबंध नाही, त्यांच्या उत्पादनांवरही अशा प्रकारच्या प्रमाणपत्रांची सक्ती केली जात असल्याचे दिसते. सुका मेवा, दूध उत्पादने आणि फराळाचे गोड पदार्थ यांसारख्या पूर्णपणे सात्विक गोष्टींवरही हे शिक्के मारले जात आहेत. प्रश्न हा पडतो की, ज्या उत्पादनांचा मांसाहाराशी काहीही संबंध नाही, त्यावर अशी एकतर्फी व्यावसायिक सक्ती का केली जात आहे? हा ग्राहकांच्या आणि शाकाहारी उद्योजकांच्या स्वातंत्र्यावर व विश्वासावर विनाकारण लादलेला बळजबरीचा निर्बंध नाही का?

दीपावलीचा सण हा कोणत्याही व्यावसायिक किंवा धार्मिक दबावाखाली न येता, पूर्णपणे स्वदेशी, पारंपरिक आणि सात्विक पद्धतीने साजरा व्हायला हवा. आपल्या शहरातील स्थानिक उद्योजक, गृहउद्योग आणि लहान व्यावसायिक अत्यंत पारदर्शक पद्धतीने उत्तम फराळ तयार करतात. त्यांना कोणत्याही अनावश्यक प्रमाणपत्रांच्या जाळ्यात अडकवण्यापासून मुक्त ठेवणे ही काळाची गरज आहे.

या अनावश्यक सक्तीपासून आणि व्यावसायिक दबावापासून वाचण्यासाठी आपण जागरूक ग्राहक बनणे गरजेचे आहे. कोणतीही वस्तू किंवा फराळ खरेदी करताना त्याचे लेबल तपासावे, आपल्या



पारंपरिक स्थानिक उत्पादकांना प्राधान्य द्यावे, तसेच अशा अनावश्यक प्रमाणपत्रांची सक्ती करणाऱ्या उत्पादनांना पर्याय निवडावा.चला, या दिवाळीत आपण संकल्प करूया कोणत्याही बाह्य दबावाला थारा न देता, आपल्या स्थानिक व शुद्ध शाकाहारी उत्पादकांना बळ देऊया आणि अस्सल 'हलाल मुक्त दीपोत्सवाचा संकल्प' पूर्णत्वास नेऊया!

वर्षा आवदे
नागपूर

■ बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

सात महिन्यांचे अनुदान तीन तासांत जमा!

मध्य प्रदेशातील व्यक्तीच्या खात्यात रक्कम गेल्याचे सांगून महिलेची टाळाटाळ

संजय नाईक यांचा पंचायत समितीत आक्रमक पवित्रा

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

सात ते आठ महिन्यांपासून अनुदानासाठी पंचायत समितीचे उंबरठे झिजवणाऱ्या छाया संजीवन वानखडे यांना अखेर तीन तासांत दिलासा मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष संजय नाईक यांनी आक्रमक पवित्रा घेत गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात धडक दिल्यानंतर ८४ हजार ५०० रुपयांचे रखडलेले अनुदान जमा करण्यात आले.

समाजकल्याण विभागाच्या २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मागासवर्गीय महिला लाभार्थी योजनेतून वानखडे यांना झेरॉक्स मशीन मंजूर झाले



होते. त्यांनी स्वतः मशीन खरेदी करून जीएसटी बिलासह आवश्यक कागदपत्रे पंचायत समितीकडे सादर केली. मात्र, सात-आठ महिने उलटूनही अनुदान मिळाले नाही. त्यातच अनुदानाची रक्कम मध्य प्रदेशातील एका व्यक्तीच्या खात्यात जमा झाल्याचे सांगून त्यांची वारंवार बोळवण करण्यात येत होती.

अखेर २ नोव्हेंबर रोजी छाया वानखडे यांनी संजय नाईक यांच्याकडे कैफियत मांडली. नाईक यांनी थेट पंचायत समिती गाठून गटविकास अधिकाऱ्यांना जाब विचारला. आजच्या आज अनुदान जमा करा, अन्यथा जबाबदार अधिकाऱ्यांकडून रक्कम वसूल करून द्या, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. प्रशासनाच्या दिरंगाईचा निषेध करत त्यांनी पाच लिटर डिझेल आणल्याचे सांगून न्याय न मिळाल्यास कार्यालयात आत्मदहनाचा इशाराही दिला. या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाची धावपळ उडाली आणि अवघ्या तीन तासांत महिलेच्या खात्यात अनुदान जमा झाले.

अनुदान मध्य प्रदेशात गेलेच कसे?

मंजूर अनुदानासाठी सात-आठ महिने लाभार्थी महिलेची फरफट झाली. मध्य प्रदेशातील व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा झाल्याचे सांगणाऱ्या यंत्रणेने प्रत्यक्षात अनुदान जमा करण्यासाठी अवघे तीन तास घेतले. मग इतके महिने लाभार्थी महिलेला कार्यालयाचे उंबरठे झिजवायला का लावले? अनुदानाच्या विलंबाला जबाबदार कोण, याची चौकशी होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

अकोटमध्ये १६० किलो गोवंश मांस जप्त; दोघे ताब्यात!

शहर पोलिसांची पहाटे कारवाई; ३२ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोट ■

गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी ठेवल्याच्या गुप्त माहितीवरून अकोट शहर पोलिसांनी मंगळवारी (३ नोव्हेंबर) सकाळी धडक कारवाई केली. या कारवाईत सुमारे १६० किलो गोवंश मांस आणि इतर साहित्य असा एकूण ३२ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अकोट शहरातील इफ्तेखार प्लॉट परिसरातून आझादनगरकडे जाणाऱ्या मार्गावरील एका कॉम्प्लेक्समध्ये गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी ठेवल्याची माहिती अकोट शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते यांनी पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांना माहिती दिली. त्यांच्या आदेशानुसार मंगळवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास पोलीस पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी छापा टाकला.

या छाप्यात अंदाजे १६० किलो गोवंश मांस आढळून आले.

त्यासोबत इतर साहित्यही पोलिसांनी जप्त केले. पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून एकूण ३२ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी शेख तनवीर शेख सलाम (वय ४२, रा. कांगारपुरा, अकोट) आणि शेख ईलियास अब्दुल अहमद बशीर (रा. इफ्तेखार प्लॉट, अकोट) या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.



वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, पोलीस हवालदार गणेश सोळंके, नायक पोलीस कॉन्स्टेबल विपुल सोळंके तसेच पोलीस कॉन्स्टेबल मोहन दुर्गे, अश्विन चौव्हाण आणि उमेश थोरात यांनी ही कारवाई केली.

शेतात लपविला होता गावठी कट्टा; एलसीबीचा छापा!

अकोट फैलमधील २२ वर्षीय तरुण जेरबंद; कट्टा आणि मोबाईलसह १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

अवैध शस्त्र बाळगून गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या तरुणावर स्थानिक गुन्हे शाखेने ऑपरेशन प्रहारअंतर्गत कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी उमेश खान जाकीर खान (वय २२, रा. मेहमूद नगर, अकोट फैल, अकोला) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गावठी देशी कट्टा आणि मोबाईल असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी जिल्ह्यातील अवैध शस्त्रधारकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस



निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी विशेष पथक तैनात केले आहे. दरम्यान, २ नोव्हेंबर रोजी पथकाला एका तरुणाकडे नेहमी देशी कट्टा असतो आणि त्याच्या माध्यमातून गंभीर गुन्हा करण्याची तसेच परिसरात दहशत निर्माण करण्याची शक्यता असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

या माहितीची खातरजमा करून पथकाने उमेश खान याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपल्याकडे लोखंडी गावठी कट्टा असल्याचे सांगितले. हा कट्टा शेतात लपवून ठेवल्याची माहितीही त्याने दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याला सोबत घेऊन शेतशिवार गाठले. तेथून ४० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा आणि गुन्ह्यात वापरलेला एक लाख रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात आर्म ॲक्टच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास व कायदेशीर कारवाई सुरू आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकात अधिकारी निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णू बोडखे, माजिद पठाण, अनिल चव्हाण यांच्यासह पोलीस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, भारकर धोत्रे, अमित दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, स्वप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धीरज वानखडे, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, सतीश पवार, अशोक सोनवणे, भीमराव दिपके तसेच चालक विनोद ठाकरे, प्रवीण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनीष ठाकरे, देवानंद खरात व प्रकाश लोखंडे यांचा सहभाग होता.

पाण्याचा अपव्यय भोवला; दोन ज्वेलर्सना प्रत्येकी पाच हजारांचा दंड!

गांधी रोडवरील प्रकाश आणि अशोक ज्वेलर्सवर मनपाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. दुकानांसमोर, शटर आणि जाहिरात फलकांवर पाणी शिंपडून अपव्यय केल्याप्रकरणी गांधी रोडवरील प्रकाश ज्वेलर्स आणि अशोक ज्वेलर्स या दोन प्रतिष्ठानांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पूर्व झोनच्या पथकाने मंगळवारी (३ नोव्हेंबर) ही कारवाई केली.

महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहरात झोननिहाय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. या पथकांकडून पाण्याचा अनावश्यक वापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जात आहे. पूर्व झोनअंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मधील गांधी रोडवर दुकानांच्या समोर, शटर आणि बॅनरवर पाणी शिंपडून अपव्यय केला जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार पथकाने प्रत्यक्ष कारवाई करीत दोन्ही प्रतिष्ठानांकडून प्रत्येकी पाच हजार रुपये दंड वसूल केला.

राज्यस्तरीय माळी समाज युवक-युवती परिचय मेळाव्याची नियोजन सभा संपन्न

अकोला : माळी समाज सेवा बहुउद्देशीय मंडळ, खडकी बु. अकोला यांच्या वतीने खडकी बु अकोला येथे २७ वा राज्यस्तरीय माळी समाज युवक-युवती परिचय मेळावा रविवार, दिनांक २७ डिसेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. पूर्वनियोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, नोंदणी प्रमुख व समाजबांधवांची सभा रविवारी उन्नतीनगर, कौलखेड येथे पार पडली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वामनराव वानखडे, मेळावा अध्यक्ष सुरेंद्र आरेकर, शंकरराव गि-हे, तुकाराम खडके, प्रशांत वानखडे, गजेंद्र काळे, शत्रुघ्न बिरकड, गणेश ढोणे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन व मान्यवर स्वागताने कार्यक्रम सुरू झाला.

रावणदहनाचा खर्च टाळून शेतकऱ्यांसाठी 51 हजारांची मदत

निलेश देव मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम; जिल्हाधिकाऱ्यांकडे धनादेश सुपूर्द

■ प्रतिनिधी | अकोला ■

अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देण्यासाठी निलेश देव मित्र मंडळाने यंदा रावणदहनाचा भव्य सोहळा रद्द करून त्यावरील खर्च मदत निधीसाठी वळविला. या उपक्रमातून संकलित झालेला ५१ हजार रुपयांचा धनादेश सोमवारी (२ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

निलेश देव मित्र मंडळ, ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प आणि स्वराज्य गणेशोत्सव मंडळ, जठार पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्त २० ऑक्टोबर रोजी जठार पेठेतील बिर्ला राम मंदिरात सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत १३ तास अखंड श्रीराम जप करण्यात आला. अकोल्यातील पाणीटंचाई दूर व्हावी आणि शेतकरी बांधवांवरील संकटाचे निवारण व्हावे, यासाठी सामूहिक प्रार्थनाही करण्यात आली. उत्सवावरील खर्च टाळून गरजू शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय मंडळाने घेतला. नागरिक, व्यापारी आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून ५१ हजारांचा निधी उभारण्यात आला. 'शेतकऱ्यांच्या घरात आनंदाचा दिवा पेटणे, हीच खरी दिवाळी आहे. उत्सवापेक्षा संकटात सापडलेल्या बांधवांना आधार देणे महत्त्वाचे आहे,' अशी भावना निलेश देव यांनी व्यक्त केली. यावेळी ॲड. गिरीश गोखले, डॉ. स्नेहा गोखले, जयंतराव सरदेशपांडे, नरेश बियाणी, संजय गुप्ता, राजेंद्र गुणलवार, कैलास तिरपुडे, रामहरी डांगे, विजय वाघ, शाम नेने, राम उमरेकर, निलेश दुधलम, प्रवीण खाबोरकर, अजय शास्त्री, नरेंद्र परदेशी, प्रकाश जोशी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



अकोला महानगरपालिका, अकोला
विद्युत विभाग

निविदा सुचना क्र. ०३, (सन २०२६-२७)

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मार्फत विशिष्ट नागरी सेवा सुविधा निधी (सन २०२४-२५) अंतर्गत प्रभाग क्रमांक १३ मध्ये शिवर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सौंदर्यीकरण करणे या कामा करीता सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत महाराष्ट्र शासन यांचे कडे नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून निविदा मागण्यात येत आहे संबंधित इच्छुकांनी विस्तृत माहिती करिता खालील नमूद संकेतस्थळावर भेट द्यावी.

Portal: http://amcakola.in

जा.क्र./ अमपा/विद्युत/१२३/२०२६,
विद्युत विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०२/११/२०२६

स्वा/ -
शहर अभियंता
अकोला महानगर पालिका, अकोला

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २८१/२०२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- शाजीया परवीन जफर अली

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल. ता. अकोट, जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार शाजीया परवीन जफर अली ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे शाजीया परवीन जफर अली यांचा जन्म दिनांक १९/०७/१९९३ रोजी मौजे रेल ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक : ०३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २८३/२०२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- सैय्यद उमेर अली जफर अली

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल. ता. अकोट, जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार सैय्यद उमेर अली सै जफर अली यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे सैय्यद उमेर अली जफर अली यांचा जन्म दिनांक ०५/०६/१९८९ रोजी मौजे रेल ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदती हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: ०३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २८२/२०२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- कौसर परवीन जफर अली

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल. ता. अकोट, जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार कौसर परवीन जफर अली यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे कौसर परवीन जफर अली यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७९ रोजी रेल ता. अकोट येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक : ०३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २८०/२०२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- राजेका बी अब्दुल मजीद

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल. ता. अकोट, जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार राजेका बी अब्दुल मजीद ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे राजेका बी अब्दुल मजीद यांचा जन्म दिनांक ०४/०४/१९७१ रोजी मौजे रेल ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोंटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता अजा दिनांक: ०३/११//२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २८६/२०२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- सुमय्या परवीन जफर अली

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल ता. अकोट,जि. अकोला

ज्या अर्थी अर्जदार सुमय्या परवीन जफर अली यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे सुमय्या परवीन जफर अली यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९८८ रोजी मौजे रेल ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: ०३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक २७९/२६ चौता २०/११/२०२६

अर्जदार :- जुबेर अली जफर अली

विरुध्द

गैरअर्जदार : सचिव ग्रा. पं. रेल.

ज्या अर्थी अर्जदार जुबेर अली जफर अली ह्यांनी, या न्यायालय अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे जुबेर अली जफर अली यांचा जन्म दिनांक १०/०१/१९९६ रोजी मौजे रेल ता. अकोट येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक : ०३/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जनमाध्यम न्यूज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

वाहतूक पोलीस की वसूली पोलीस

चालक गाडीत, तरीही नो पार्किंगचे ५०० रुपयांचे चलन

वर्धेत कारवाईच्या नावाखाली मनमानीचा आरोप; हिंगणघाटमध्ये शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याच्या व्यवसायावरही परिणाम

वर्धा/जनमाध्यम

वाहतुकीचे नियम सर्वांसाठी समान आहेत. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. मात्र, नियमांची अंमलबजावणी करताना विवेक, परिस्थिती आणि तारतम्य यांनाही काही स्थान आहे की नाही? वर्धा शहरातील वाहतूक पोलिसांच्या एका कारवाईने हाच प्रश्न ऐरणीवर आणला आहे. चालक वाहनात उपस्थित असताना वेगवेगळ हजेरी लावण्यासाठी खाली उतरलेल्या महिला वैद्याच्या हातात थेट ५०० रुपयांचे 'नो पार्किंग'चे चलन थोपविण्यात आले. त्यामुळे वाहतूक नियंत्रण सुरू आहे की दंडाच्या नावाखाली वसुलीचा धडाका, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

शहरातील पतंजली औषधालयात वैद्य म्हणून कार्यरत असलेली महिला काल सकाळी सुमारे ११ वाजता कामावर पोहोचली. औषधालयासमोर वाहन उभे करून थंब इम्प्रेशनद्वारे हजेरी लावण्यासाठी त्या खाली उतरल्या. वाहन रस्त्यावर अडथळा निर्माण करीत होते का? चालक उपस्थित असताना ही कारवाई कोणत्या नियमाच्या आधारे करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे वाहतूक विभागाने देण्याची गरज आहे. संबंधित महिला वैद्याने या कारवाईविरोधात महिला वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याविरुद्ध ऑनलाइन तक्रार केल्याची माहिती आहे.

अपघातांचे निमित्त, दंडाचा धडाका

वाहतूक नियमांच्या



अंमलबजावणीच्या नावाखाली वाहनचालकांना वेठीस धरण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप होत आहे. हिंगणघाटमध्ये १५ ऑगस्ट रोजी घडलेल्या अपघातानंतर वाहतूक पोलिसांच्या कारवाईचा जोर वाढल्याचे चित्र आहे. अपघातांचे कारण पुढे करून वाहनचालकांना धारेवर धरले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियंत्रण, जनजागृती, नियमांचे पालन आणि धोकादायक ठिकाणी उपाययोजना करण्याऐवजी दंडात्मक कारवाईवरच अधिक भर दिला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे.

पाचशे रुपयांची भाजी, पाचशे रुपयांचा दंड

या कारवाईचा फटका केवळ वाहनचालकांनाच बसत नसून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाही बसल्याचा आरोप आहे. भाजीपाला विक्रीसाठी बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईचा सामना करावा लागत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय बंद केल्याचे सांगितले जाते.

वाहतूक पोलिसांचे प्राथमिक काम रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवणे, अपघात रोखणे आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी देणे हे आहे. मात्र, कारवाईच्या पद्धतीमुळे पोलिसांविषयी विश्वास निर्माण होण्याऐवजी भीती आणि नाराजी वाढत असेल तर ही निश्चितच चिंतेची बाब आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करा; पण नियमांच्या नावाखाली सामान्य नागरिक, नोकरदार महिला आणि कष्टकरी शेतकऱ्यांना त्रास देऊ नका.

वाहतूक विभागाने कारवाईचा उद्देश स्पष्ट करावा. दंड आकारण्याचे निकष काय आहेत, कारवाई करताना परिस्थितीचा विचार केला जातो का आणि नागरिकांच्या तक्रारींची दखल कोण घेणार, याचे उत्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी द्यावे. अन्यथा वाहतूक पोलीस म्हणून नव्हे, तर दंड वसुली पोलीस म्हणूनच विभागाची ओळख निर्माण होण्यास वेळ लागणार नाही,

महावंश बुध्द विहारात वर्षावास कार्यक्रम



वर्धा/जनमाध्यम

नेरी पुनर्वसन येथील महावंश बुध्द विहारात वर्षावास समापन कार्यक्रम प्रबोधनपर व्याख्यानाने आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दीपक मेश्राम, रमेश जोगे, जिल्हा संघटक भारतीय बौध्द महासभा वर्धा व ज्योत्स्नाताई वासनिक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष रविंद्र काळपांडे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रंजना मिरगे यांनी केले तर कार्यक्रमाची भूमिका वर्षावास काळात भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन कर्ते बळवंत दाहाट यांनी विषद केली. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन निलिमा दाहाट यांनी केले तर आभार प्रदर्शन सरस्वती पाटील यांनी केले. कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक सुखदेवराव मिरगे यांनी बहारदार बुद्ध गित गाऊन उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी उपस्थितांना भोजनदान देण्यात आले तर रात्री कोजागिरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवि मिरगे, सुशील बनसोड, श्रीकृष्ण टोकसे, दयाराम मनवर,बबन दाहाट,विलास मुन,मंगेश नगराळे,प्रमोद काळपांडे, प्रतीक गडलींग इतर युवा कार्यकर्ते व महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

संक्षिप्त

शेतातील आठ हजारांची पाण्याची मोटार चोरीला

समुद्रपूर- तालुक्यातील निरगुडी शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने आठ हजार रुपये किमतीची पाण्याची मोटार चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. नंदकिशोर किष्णाजी घोटे (४२, रा. निरगुडी) यांच्या शेतातील टेक्समो कंपनीची पाण्याची मोटार चोरीला गेली. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास ते शेतात गेले असता मोटारीला जोडलेली केबल तुटलेली दिसली. पाहणी केली असता मोटार जागेवर आढळून आली नाही. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने केबल तोडून मोटार लंपास केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी घोटे यांच्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी २ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

लघवी करण्यास मनाई केल्याने तिघांची मारहाण

हिंगणघाट- घराशेजारी लघवी करण्यास मनाई केल्याच्या कारणावरून तिघांनी एका ५० वर्षीय व्यक्तीला शिवीगाळ करीत मारहाण केल्याची घटना सावली (वाघ) येथे घडली. घनश्याम सोमाजी मगरे यांनी हिंगणघाट पोलिसांत तक्रार दाखल केली. १ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास ते घराबाहेरील रस्त्यावर बसले होते. यावेळी नागेश पाल हा त्यांच्या घराशेजारी लघवी करीत असल्याने त्यांनी महिलांची व मुलींची ये-जा असल्याचे सांगत विरोध केला. यावरून नागेशने शिवीगाळ केली. त्यानंतर रंजित खेकारे आणि गोलू मन्ने तेथे आले. गोलूने मगरे यांना हाताबुक्क्यांनी मारहाण केली. यात त्यांच्या डोळ्याला सूज आली. तिघांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

पत्नी माहेरी गेल्यानंतर व्यावसायिकाने गळफास घेऊन आत्महत्या

पुलगाव- पत्नी माहेरी गेल्यानंतर रामटेके लेआउट परिसरातील ३६ वर्षीय चिकन व्यावसायिकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १ नोव्हेंबर रोजी रात्री उघडकीस आली. आनंद ईश्वर हाटे (३६) असे मृतकाचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आनंद हाटे यांचे पुलगाव येथे चिकनचे दुकान होते. त्यांचा पहिल्या पत्नीशी घटस्फोट झाल्यानंतर १२ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी दुसरे लग्न केले होते. त्यांची दुसरी पत्नी नेहा ही १५ दिवसांपूर्वी नागपूर येथे माहेरी गेली होती. घटनेच्या दिवशी रात्री ८ वाजताच्या सुमारास आई कविता हाटे या मुलाला पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर गेल्या. खिडकीतून पाहिले असता आनंद गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले.कुटुंबीयांनी दरवाजा तोडून त्यांना खाली उतरविले. मित्राच्या वाहनाने ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

चिराग पासवान यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

हिंगणघाट- केंद्रीय मंत्री तथा लोक जनशक्ती पार्टी (रामविलास)चे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग रामविलास पासवान यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगणघाट येथील पक्ष कार्यालयात वर्धा जिल्हा लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. केक कापून, पेढे वाटून तसेच कविता आणि शेरोशायरीच्या माध्यमातून चिराग पासवान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोक जनशक्ती पार्टीचे वर्धा जिल्हाध्यक्ष डॉ. आनंद जगताप होते. यावेळी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री दिवंगत रामविलास पासवान यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रदेश सचिव तथा पत्रकार केशव तितरे, जिल्हा उपाध्यक्ष मोरेश्वर पिंपळशेंडे, जिल्हा कोषाध्यक्ष राजेंद्र मुनोत, सल्लागार समिती अध्यक्ष कन्हैयालाल हेमनानी, तालुकाध्यक्ष सुरेंद्र डोंगरे, सल्लागार दामोदर वानखेडे, जिल्हा महासचिव नागेंद्र जयराज, जिल्हा सचिव रमेश घोडे, तालुका उपाध्यक्ष अंकुश हुडे, संभाजी मुजबैले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोरेश्वर पिंपळशेंडे यांनी केले. संचालन केशव तितरे यांनी केले. यावेळी कमलाकर कावळे, याकूबभाई चिकनवाले, शब्बीरभाई चुडिवाले, मधुकर डंभारे, चंपत बाबणे, गोविंदा दांडेकर, मनोहर कानेरकर यांच्यासह पक्षाचे सदस्य आणि परिसरातील चिराग पासवान यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गवळी समाजाच्या एकजुटीचे कारंजात शक्तिप्रदर्शन

पहिलाच तालुका मेळावा उत्साहात; गुणवंतांचा गौरव, महिला व युवा आघाडीच्या अध्यक्षांची निवड

कारंजा (घा.)/जनमाध्यम

समाजाची ताकद संघटनेतून आणि संघटनेची ताकद एकजुटीतून निर्माण होते, याचा प्रत्यय कारंजा येथे आला. महाराष्ट्र गवळी समाज संघटनेच्या वतीने आयोजित कारंजा तालुक्यातील पहिल्याच समाज मेळाव्याला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मान्यवरांचे मार्गदर्शन, गुणवंतांचा सन्मान आणि नवीन कार्यकारिणीच्या घोषणेमुळे मेळावा उत्साहात पार पडला.



गोमातेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब गलाटे होते. जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढोबळे यांनी शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रश्नांवर समाजाने संघटित होऊन लढण्याची गरज व्यक्त केली. युवकांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब गलाटे यांनी समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने वाटचाल केल्यास समाजाचा सर्वांगीण विकास शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

कारंजा तालुका युवा आघाडीच्या अध्यक्षपदी स्वप्निल घासाड,तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सविता सुरेश काळोकार यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून शुभेच्छा देण्यात आल्या.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक साहेबराव अवचट, पोलीस विभागात नियुक्त निकिता कोरडे तसेच सेवानिवृत्त अंबादास आवथळे, अंबादास वैध, ज्ञानेश्वर साठे आणि गुलाब भड यांचा सत्कार करण्यात आला. सरपंचांसह गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

जगदीश डोळे यांनी प्रास्ताविक केले. खुशी चरोडे व नंदिनी अवथळे यांनी संचालन, तर हरीश चरोडे यांनी आभार मानले. समाजाच्या एकजुटीचा आणि नव्या संघटनात्मक वाटचालीचा संकल्प या मेळाव्यातून पुढे आला.

कोजागिरीच्या चांदण्यात लायन्स क्लब स्नेहमेळावा

सामाजिक उपक्रमांच्या नियोजनावरही चर्चा



आर्वी/जनमाध्यम

सामाजिक, वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविणाऱ्या लायन्स क्लब आर्वीच्या वतीने कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.२ नोव्हेंबर रोजी साईनगर येथील आयनॉक्स सेलिब्रेशन हॉलमध्ये आयोजित या स्नेहमेळाव्याला क्लबच्या सदस्यांनी सहपरिवार उपस्थिती लावत उत्साहाला रंगत आणली.

कार्यक्रमाला लायन्स क्लब आर्वीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी प्रांतपाल डॉ.रिपल राणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी क्लबच्या सदस्यांनी कोजागिरीचा आनंद घेत परस्परांशी संवाद साधला.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे दोन नवानिर्वाचित सदस्यांचा लायन्स क्लब परिवारात अधिकृत प्रवेश करण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी त्यांचे स्वागत करून पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.समाजोपयोगी कार्याचा विस्तार करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.प्रसंगी प्रा. डॉ. दीपक चव्हाण,सुधाकर बेदरकर,ॲड. सुरेंद्र जाने, राजीव देशमुख, सुमन देशमुख, पंकज गोडबोले,प्रशांत कांडलकर,सुशील अवचार,नितीन वानखेडे,डॉ. सुधीर ढबाले,सचिन राठोड,श्री.गोडे,डॉ.कालिंदी राणे,सुनीता जाने,मनीषा ढाके,आरती देशमुख,अपर्णा वानखेडे,शुभांगी देशमुख,संगीता ढबाले, कल्पना बेदरकर यांच्यासह क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५० वर्षीय इसमाची आत्महत्या

हिंगणघाट - पायाच्या दुखण्याने त्रस्त असलेल्या ५० वर्षीय इसमाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हिंगणघाट शहरातील कोचर वॉर्डात २ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. उज्जनकुमार रामसिरज श्रीवास (५०) असे मृतकाचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी उज्जनकुमार यांच्या पायात काठी रुतल्याने त्यांच्यावर दोन महिन्यांपूर्वी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र,त्यानंतरही पायाचा त्रास कायम होता. घटनेच्या दिवशी दुपारी त्यांची आई चंद्रकला श्रीवास व लहान भाऊ औषधे आणण्यासाठी घराबाहेर गेले होते. दरम्यान, घरी एकटे असलेल्या उज्जनकुमार यांनी हॉलमधील पंख्याला दुपट्ट्याच्या साहाय्याने गळफास घेतला.आई घरी परतली असता हा प्रकार उघडकीस आला. त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. हिंगणघाट पोलिसांनी मर्ग दाखल केला.



बालकांच्या आजारांकडे दुर्लक्ष करू नका डॉ. प्रीती सत्याम यांचे पालकांना आवाहन

बोरगाव/मेघे

लहान मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्याने त्यांचे आजार वेगाने बळावू शकतात. त्यामुळे पालकांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे किंवा अँटिबायोटिक्स देऊ नयेत. बालक आजारी पडल्यास तातडीने बालरोगतज्ज्ञांशी संपर्क साधावा, असे आवाहन सेंट थॉमस इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. प्रीती सत्याम यांनी केले. बोरगाव मेघे येथे १ नोव्हेंबर रोजी डॉ. अभय मोहिते व डॉ. भाग्यश्री मोहिते यांच्या पुढाकारातून बाल आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. डॉ. प्रीती सत्याम व माजी नगरसेवक रामविलास साहू यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शिबिरात परिसरातील अनेक बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

ज्वारीचे धांडे नेण्यावरून शेतकऱ्याला मारहाण

आष्टी - शेतातून ज्वारीचे धांडे आणल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका शेतकऱ्याच्या डोक्यावर लाकडाने प्रहार करून जखमी करण्यात आल्याची घटना वाडेगाव येथे घडली. सुरेश रामकृष्ण खंते (४५) यांनी याप्रकरणी आष्टी पोलिसांत तक्रार दिली. १ नोव्हेंबर रोजी पूजेसाठी ज्वारीचे धांडे आणण्याकरिता ते शेतात गेले होते. संबंधित शेतातील महिलेने धांडे नेण्यास परवानगी दिल्याने त्यांनी पाच धांडे घेतले. मात्र, यावरून रवींद्र रामचंद्र मोगरे याने आक्षेप घेतला. सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास पुन्हा वाद झाला. यावेळी मोगरे याने शिवीगाळ करीत लाकडाने खंते यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूला मारले. त्यात ते जखमी झाले. उपचारानंतर त्यांनी तक्रार दिली. आष्टी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

NAME IN CHANGE
OLD NAME
MANGESH SHALIKRAM INGLE
NEW NAME
MANGESH SHALIGRAM INGLE
-ADDRESS -
SEWAGRAM ROAD, DOCTOR COLONY, SWASTIK NAGAR, WARUD, POST-SEVAGRAM, TQ. DIST. WARDHA

ओबीसी जनगणनेचा मुद्दा हिवाळी अधिवेशनात गाजवणार

खा.अमर काळे यांचा केंद्र सरकारला इशारा; शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही संसदेत जाब विचारणार

वर्धा/जनमाध्यम

ओबीसींची नेमकी लोकसंख्या जाहीर करण्याची केंद्र सरकारची तयारी नसेल, तर हा प्रश्न संसदेत धडाडणार ओबीसी जनगणनेचा मुद्दा आगामी हिवाळी अधिवेशनात आक्रमकपणे लावून धरणार असून,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही केंद्र सरकारला जाब विचारणार असल्याचा स्पष्ट इशारा खा.अमर काळे यांनी दिला.

३१ ऑक्टोबर रोजी वर्ध्यात आयोजित ओबीसी जनगणना परिषदेदरम्यान त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्यासह विविध मान्यवरांच्या



उपस्थितीत झालेल्या या परिषदेत ओबीसींच्या लोकसंख्येचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

देशातील ओबीसींची नेमकी संख्या समोर आल्याशिवाय सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक न्यायाची धोरणे कशी आखणार? असा सवाल उपस्थित करीत काळे यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर निशाणा साधला.जनगणनेत ओबीसींची स्वतंत्र नोंद आणि अधिकृत आकडेवारी ही केवळ मागणी नसून समाजाच्या हक्कांचा प्रश्न असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दुसरीकडे,शेतकऱ्यांच्या समस्यांवर बोलताना भाजप नेत्यांच्या वक्तव्यांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्याऐवजी त्यांच्याबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरणे हा शेतकरी वर्गाचा अपमान असल्याचे ते म्हणाले.उत्पादन खर्च,हमीभाव आणि उत्पन्नाच्या प्रश्नांवर केंद्राने ठोस भूमिका घ्यावी,अशी मागणीही त्यांनी केली.

निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात १ नोव्हेंबरला दिल्लीत इंडिया आघाडीच्या महामोर्चातही वर्ध्यातून मोठा सहभाग राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.लोकशाही संस्थांची स्वायत्तता आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दाही आंदोलनातून उपस्थित केला जाणार आहे.ओबीसींचे हक्क, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि लोकशाहीचे संरक्षण या तिन्ही आघाड्यांवर सरकारला घेरण्याची तयारी काळे यांनी या भूमिकेतून स्पष्ट केली.

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

लग्नाचे आमिष, महिलेने तरुणाला १४.५१ लाखांना गंडविले

तिवसा पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः- लग्नाचे आमिष दाखवून विश्वास संपादन केला. त्यानंतर फ्लॅट खरेदी, आर्थिक अडचणी आणि गुंतवणुकीसह विविध कारणे पुढे करून एका महिलेने तरुणाकडून तब्बल १४ लाख ५१ हजार ४६६ रुपये उकळल्याचा प्रकार तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांत धाव घेतली. त्याच्या तक्रारीवरून संबंधित महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भूषण हेमराज तालन (३४, रा. निंबोरा, डेलवाडी, तिवसा) यांच्याशी वर्धा येथील नागपूर रोड परिसरातील एका महिलेने मोबाइल क्रमांकाच्या माध्यमातून संपर्क साधला. या महिलेने भूषण यांच्याशी विवाह करण्याचे तसेच आयुष्यभर साथ देण्याचे आश्वासन दिले. तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून भूषण यांनी तिच्याशी संवाद वाढविला. त्यानंतर महिलेने विविध आर्थिक कारणे सांगून त्यांच्याकडे पैशांची मागणी सुरू केली. फ्लॅट खरेदीसाठी पैसे भरणे, वैयक्तिक आर्थिक अडचणी, गुंतवणूक आणि इतर आवश्यक कामांचा हवाला देत संबंधित महिलेने भूषण यांच्याकडे वारंवार पैशांची मागणी केली. तिच्या सांगण्यावरून भूषण यांनी १५ जुलै ते २१ ऑक्टोबर या कालावधीत वेगवेगळ्या तारखांना फोन-पे, गुगल-पे आणि यूपीआयच्या माध्यमातून विविध बँक खात्यांमध्ये एकूण १४ लाख ५१ हजार ४६६ रुपये ऑनलाइन पाठविले.

मात्र, वारंवार पैसे देऊनही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने भूषण यांना आपली फसवणूक झाल्याचा संशय आला. त्यानंतर त्यांनी तिवसा पोलीस ठाणे गाठून संपूर्ण प्रकाराची तक्रार नोंदविली. त्यांच्या तक्रारीवरून मोबाइलधारक संबंधित महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

Personal Cook / Home Chef पाहिजे.

जाहीर नोटीस

वि.१६ वे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती यांचे न्यायालयात

सक्शेशन नं.२१७८/२०२६ **चौ.ता.१८.११.२०२६**

अर्जदार -
१. **नितिन सुखदेवराव लव्हाळे**, वय ५७ वर्षे, धंदा- नोकरी
२. **केतन नितिन लव्हाळे**, वय २९ वर्षे, धंदा- शिक्षण
३. **श्रावणी नितिन लव्हाळे**, वय २३, धंदा-शिक्षण
सर्व रा. गोंडबाबा मंदिर समोर, दस्तुर नगर रोड, पटवारी कॉलनी, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार - Nil

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **मयत रंजना नितिन लव्हाळे** यांचे निधन दि.२६/०७/२०२६ रोजी झाले असून वरील अर्जदार त्याचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत **वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती** या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोद घ्यावी.

आज दि.२९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय,(व.स्तर) अमरावती**

MAHAVITARAN E-TENDER NOTICE

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of E-Tender for the work of giving power supply to 1 no. HT connection in r/o. M/s. Shree Hari Spinning Mills Pvt. Ltd., Nandgaon Peth having Contract Demand 3350 KVA & Connected Load 2680 KW (Consumer No. 366589017400), Plot No. B-6-1/2, Textile Park, Additional Industrial Area, Nandgaon Peth, Ta. & Distt. Amravati under Amravati-Rural Sub Division under NSC Scheme of tender no. SE/O&M/AMT/TECH/2026-27/NSC/HT Conn/T-12. The estimated cost of tender is Rs. 455.6548 Lakhs. Tender Fee- Rs. 5000+ 18% GST (Non-refundable).

Date of availability of Bid Documents on MSEDCL E-tendering Website http://works.mahadiscom.in/eTender/etender: 01.11.2026.

Last Date & Time for Submission of Bid: 16.11.2026 upto 23.55 Hrs.

For further details of Invitation for Bids & Bid Documents, please visit MSEDCL website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

Superintending Engineer MSEDCL, O & M Circle Amravati.
Email ID. seamravati2011@gmail.com

HO PR No 267/26 Superintending Engineer
Dt.29.10.26 M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati.

नगर परिषद पुसद, जि.यवतमाळ

जा.क्र.नपपु/भांडारपाल/३९/२०२६, दिनांक ३.११.२०२६

जाहीर निविदा सूचना (दुसरी वेळ)

मुख्याधिकारी, नगर परिषद पुसद हे ईच्छुक व्यापारी/संस्था/कंत्राटदार यांच्याकडून खालील कामाकरीता निविदा/दरपत्रक मागवित आहत. लिफाफा बंद दरपत्रके रोखपाल, नगर परिषद पुसद यांच्याकडे स्विकारण्यात येतील. प्रत्येक बाबीचा, अनामत, रक्कम नियम व अटी (कोरे) निविदा दरपत्रक बाबतचा तपशील भांडारपाल विभाग नगर परिषद येथे कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून पहावयास मिळतील.

अ. क्र.	कामाचे नांव
१.	नगर परिषद कार्यालयात विविध प्रसंगी व्हीडीओ चित्रीकरण करणे व फोटो काढणे.
२.	नगर परिषद पुसद करीता विविध कार्यालयीन कामाकरीता फर्निचर व इतर साहित्य पुरवठा करणे
३.	शहरामध्ये विविध प्रसंगी बॅरीकेटींग करणे, बिछायत खुर्च्या, मॅट, जाहीरात ध्वनिक्षेपित करणे व साऊंड सिस्टीम सह कापडी वॉटरप्रुफ मंडप उभारणे
४.	विविध कार्यकमाकरीता पुष्पहार, पुष्पगुच्छ व बुके पुरविणे
५.	नगर परिषद पुसद करीता छपाई साहित्य पुरवठा करणे
६.	नगर परिषदेच्या विविध कामाकरीता भाडोत्री वाहन पुरविणे

तरी ईच्छुक व्यापारी/संस्था यांनी जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून दिनांक १७.११.२०२६ पर्यंत आपापले सीलबंद लिफाफे खालील नमुद विवरणाप्रमाणे सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रक/निविदांचा विचार केला जाणार नाही.

१. निविदा दरपत्रक शुल्क, ईसारा रक्कम भरण्याचे व सीलबंद लिफाफे सादर करण्याचे ठिकाण	रोखपाल, नगर परिषद पुसद
२. कोरे निविदा दरपत्रक मिळण्याचे ठिकाण	भांडारपाल/प्रशासन विभाग, न.प.पुसद

नोट -
१. कोणत्याही प्रकारचे ॲडव्हॉन्स दिले जाणार नाही.
२. ही जाहीर सुचना नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर लावलेली आहे.
३. कोणत्याही किंवा सर्व निविदा (दरपत्रके) कारण न दर्शविता अमान्य किंवा बदल करण्याचे अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

**स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पुसद**

सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६५४/२०२६ **ने.ता.२५.११.२०२६**

अर्जदार -
१. **श्रीमती शिलाबाई नारायण पडोळे,** वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री अंकुश नारायण पडोळे,** वय ३६ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.प्रणिता प्रमोद रहाटे,** वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.प्रशांत नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --
कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **नारायण भिमराव पडोळे** हे **दिनांक १८/०८/२०२६** रोजी **निंभी , ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- १२/१०/२०२६ शिक्का

**आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी**

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.सौरभ किशोरराव ढेंगे** पत्ता सरमसपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२६ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/24975 जुना मालमत्ता क्र. २६०००६८३ नझुल शिट क्र.१४-ए प्लॉट नं.२९ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **किशोर बालाराम ढेंगे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.सौरभ किशोरराव ढेंगे** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - यातीलच उर्वरित घर व खुली जागा
पश्चिमेस - रस्ता
दक्षिणेस - अमरसिंग चौव्हाण यांचे घर
उत्तरेस - श्रीराम भागवत यांचे घर

शिक्का

**मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर**

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५३५/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार : १. राजेश पुंडलिकराव चरहाटे, वय ६० वर्षे, व्यवसाय - शेती
२. शिवाजी पुंडलिकराव चरहाटे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - शेती
दोन्ही रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत पुंडलिकराव मोतीराव चरहाटे** यांचा मृत्यू दिनांक **३१.०७.२०२६** रोजी चांगापूर, ता.जि.अमरावती येथे झाला. **तसेच नर्मदाबाई पुंडलिकराव चरहाटे** हिचा दि.**१९.०८.२०२४** रोजी रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५३५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**३१.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.७०२/२०२६ ने.ता.१५.१२.२०२६

अर्जदार - १. सौ.शालिनी विठ्ठलराव तडोकार,
वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराची बहीण **नामे सुमन केशवराव आसरे** ही अविवाहीत असतांना दिनांक **०९.०८.२०२६** रोजी अंबाडा ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.११.२०२६ शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२६३/२०२६
विजया अधिक चार -वि- निरंक
पुढील ता.३०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. विजया प्रभाकरराव देशपांडे, वय ८१ वर्षे, व्यवसाय - आराम
रा.बगीचा जवळ, नवाथे चौक, इंद्रायणी कॉलनी, साईनगर, अमरावती
२. श्रीनिवास प्रभाकरराव देशपांडे, वय ५८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.लाईन नं.२, गार्डनजवळ, हाऊस नं.१६, इंद्रायणी कॉलनी, रुक्मिणीनगर, अमरावती
३. नितीन प्रभाकरराव देशपांडे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.इंद्रायणी गार्डन, हाऊस नं.१६, इंद्रायणी कॉलनी, नवाथे नगर,रुक्मिणीनगर अमरावती
४. जयश्री गजेंद्र कुळकर्णी, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.१३६९, गुरुकृपा परशराम चौक, चैतन्यवाडी, बुलढाणा
५. धनश्री अजय कुळकर्णी, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.रामनगर, वडगांव रोड, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रभाकर रामचंद्र देशपांडे** हे दिनांक 10.09.2006 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विजया प्रभाकरराव देशपांडे अधिक चार** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजया प्रभाकरराव देशपांडे अधिक चार** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

वि. ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)

कि.कि.अर्ज क्रमांक १२८०/२०२६

अर्जदार : महादेव हरी उर्फ हरिभाऊ रामटेके
वय ८० वर्षे,
रा.जेतवन विहारजवळ, राहुल नगर, जुनी वस्ती, बडनेरा,
ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **महादेव हरी उर्फ हरिभाऊ रामटेके**, यांनी **हरिभाऊ विकम रामटेके** यांच्या मृत्यूची नोंद दिनांक २१.१२.१९८१ रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०८.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशान्वये,
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६५९/२०२६ ने.ता.०३.११.२०२६

अर्जदार - १. श्रीमती लता बाळकृष्ण खडसे वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.धर्मदास बाळकृष्ण खडसे वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
३. श्री रुपचंद बाळकृष्ण खडसे, वय ३१ वर्षे, धंदा - मजुरी
४. श्री.राजपाल बाळकृष्ण खडसे, वय २९ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ चे वडील **नामे बाळकृष्ण आकारामजी खडसे** हे दि.**०८.०६.२०२६** रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.११.२०२६ शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.बाबुराव जगतराम जुमडे** पत्ता अब्बासपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२७ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/0074+75 जुना मालमत्ता क्र. २१९००२७०/७१ नझुल शिट क्र.६-सी प्लॉट नं.९१ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **जगतराम सदाशिव जुमडे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.बाबुराव सदाशिव जुमडे ईतर ६ नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - रोड
पश्चिमेस - श्री.रामराव जुमडे यांचे घर
दक्षिणेस - रोड
उत्तरेस - विखार यांचे घर

शिक्का

**मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर**

Appendix E, No.7
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri Harish Jadhavrao Shende
Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

NOTICE TO SHOW CAUSE WHY EXECUTION SHOULD NOT ISSUE (0.21, R, 16)

Spl.Dkst./106/2024
Ratanlal Kanhaiyyalalji Bhutada -Vs- Narayan Amrutrao Adekar & 1
Next Date 16.11.2026

To,
Narayan Amrutrao Adekar & 1
R/o Radha Swami Jewelers, Motinagar Chowk, Amravati.
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Ratanlal Kanhaiyyalalji Bhutada** has made application to this Court for execution of decree in Suit No., on the allegation that the said decree h as been transferred to him by assignment or without assignment, this is to give you notice that you are to appear before this Court Jt.CJSD, Amravti on the 16.11.2026, to show cause why execution should not be granted.

Given under my hand and the seal of the Court, this 31.10.2026

शिक्का **Jt.Civil Judge, Sr.Dn.,Amravati**

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.७१७/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार - १. पद्मा बाबाराव मुंदाफळे, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
२. प्रतिक बाबाराव मुंदाफळे, वय २७ वर्षे, धंदा - शिक्षण
३. स्नेहा बाबाराव मुंदाफळे, वय २५ वर्षे, धंदा - घरकाम
तिघेही रा.आष्टगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील **बाबाराव रामरावजी मुंदाफळे** हे दि.**२७.०९.२०२५** रोजी आष्टगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.११.२०२६ शिक्का

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

वि. एस.एस.भिंगारदेव, ७ वे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)

कि.कि.अर्ज क्रमांक १२६०/२०२६

अर्जदार : हेमलता मनोहर धुताले
वय ४६ वर्षे,
रा.स्टेट बॅंक मागे, अयोध्या नगर, मोर्शी, ता.मोर्शी,
जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०७ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **हेमलता मनोहर धुताले** यांची मुलगी नामे **ऋतुजा मनोहर धुताले** हिचा जन्म हा दिनांक **२९.०७.२०००** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशान्वये,
०७ वे न्यायालय, कनिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२६४/२०२६
चंद्रकला बसवंतराव बोडखे अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२६.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. चंद्रकला बसवंतराव बोडखे, वय ७७ वर्षे, व्यवसाय - आराम
रा.तुळजाभवानी हॉलजवळ, घनश्याम नगर, व्हीएमव्ही, अमरावती
२. अतुल बसवंतराव बोडखे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - खा.नोकरी
रा.शेगांव समोर किराणा जवळ, घनश्याम नगर, गुणवंत वाडी, अमरावती
३. अमोल बसवंतराव बोडखे, वय ४० वर्षे, व्यवसाय - खा.नोकरी
रा.प्लॉट नं.४, घनश्याम नगर, शेगांव,व्ही.एम.व्ही., अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बसवंतराव पुंजाजी बोडखे** हे दिनांक 29.07.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंद्रकला बसवंतराव बोडखे अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रकला बसवंतराव बोडखे अधिक दोन** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५३७/२०२६ ने.ता.०८.१२.२०२६

अर्जदार : १. अनिल सहदेवराव शिरसाठ, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.गुरुकृपा नगर अहमदाबाद शहर ता.जि.अहमदाबाद (गुजरात)
२. नंदा संजय कांबळे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत सहदेवराव सोमाजी शिरसाठ** यांचा मृत्यू दिनांक **०३.१२.२०००** रोजी **तसेच मयत कांताबाई सहदेवराव शिरसाठ** हिचा दि.**२०.०५.१९८१** रोजी रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५३७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**३१.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन

अमरावती-जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ निमित्त फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) यांच्या निर्देशानुसार, पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथील सह-अभ्यासक्रम विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.'स्वस्थ भारत – प्रतिजैविक प्रतिरोधाविषयी जनजागृती या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, संशोधनवृत्ती तसेच फार्मसी क्षेत्रातील ज्ञान व कौशल्यांचा विकास करणे हा होता.स्किटून्स स्पर्धेच्या समन्वयक म्हणून प्रा. जान्हवी जी. लाटे, रील स्पर्धेच्या समन्वयक म्हणून प्रा. रेणुका वि. सुताने, वैज्ञानिक पोस्टर सादरीकरण स्पर्धेच्या समन्वयक म्हणून प्रा. गौरवी खेरडे, फार्मा प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या समन्वयक म्हणून प्रा. अनुश्री ठेलकर आणि पत्रक निर्मिती स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा. दीप चौधरी यांनी जबाबदारी सांभाळली.महाविद्यालयाच्या सह-अभ्यासक्रम विभागाच्या वतीने आयोजित या सर्व उपक्रमांचे मार्गदर्शन व पर्यवेक्षण प्रा. रुपाली गावंडे आणि राम घोटकर यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीप्ती बी. रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपली कल्पकता, वैज्ञानिक विचार आणि विषयज्ञान सादर करण्याची संधी मिळाली.



टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये दिवाळी सण उत्साहात

अंजनगाव बारी-विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित सीबीएसई टायटन्स पब्लिक स्कूल, बडनेरा येथे दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने लक्ष्मीपूजन करून करण्यात आली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व पटवून देत सुरक्षित आणि आरोग्यदायी दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण विद्यार्थी आरुष सोलंके याचे बहारदार संचालन ठरले.यावेळी विद्यार्थ्यांनी वसुबारस आणि भाऊबीज या सणांचे महत्त्व अधोरेखित करणारी सुंदर नाटिका सादर केली.या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य अजय चौबे यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

अशफीया फरहीन डॉक्टर झाल्याबद्दल वेलकम होम कार्यक्रम

शिराळा-येथील समाजसेवका तथा सहेर बहुउद्देशीय संस्था अध्यक्षा नजमुन्नीसा उर्फ नजमा काझी यांची डॉ अशफीया फरहीन च्या आगमन प्रसंगी वेलकम होम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्यांच्या राहत्या घरी पॅराडाईज कॉलनी अमरावती येथे हर्ष उल्लासात कार्यक्रम साजरा करण्यात आला.एका अंगणवाडी सेविका ची मुलगी डॉक्टर झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.नजमा काझी यांनी मुलीच्या उज्वल भविष्यासाठी आणि मानवसेवा करण्यासाठी मुलीला प्रेरणा दिली.सदर वेलकम होम कार्यक्रमाला उपस्थित नगरसेवका फरनाज आहद अली, सिमा साखरे वलगाव,सायरा मंसुरी,मेराज बाजी,साफीया खान,रहेना बाजी,रजीया बाजी, आयशा बाजी, उम्मे सलमा, यासमीन बाजी,नाजीया,उजमा,सादेका बाजी,अमीरन देशमुख,अफसाना बाजी, शबाना सैय्यद नागपूर, विदर्भ की दहाड रिपोर्टर सईद खान, दै भास्कर समीर भाई,अजीज शाह पत्रकार नागपूर, शितल पाटील नागपूर व प्रफुल्ल या सर्वांचे उपस्थित राहिल्या बदल नजमा काझी यांनी आभार व्यक्त केले.



संजय सरवटकर पुरस्काराने सन्मानित

अमरावती - स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) पुणे येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात पूर्णानगर, ता. भातकुली (जि. अमरावती) येथील निर्भीड पत्रकार संजय सरवटकर यांना 'स्वाभिमानी लेखणी गौरव - २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक प्रा. नामदेवराव जाधव आणि प्रा. लक्ष्मण हाके तसेच भाजपा प्रवक्ता संदीप खर्डेकर,यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी संपादक डी. एस. लोखंडे पाटील यांनी संजय सरवटकर यांनी ग्रामीण भागातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी केलेल्या निर्भीड पत्रकारितेचा गौरवपूर्ण आढावा मांडला. यावेळी कार्यकारी संपादिका सोनाली कबाडे पाटील यांच्यासह राज्यभरातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवस्थान जमिनींच्या नुकसानाबाबत लवकरच निर्णय घेणार!

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे 'मंदिर महासंघा'ला आश्वासन

अमरावती/का.प्र.



राज्यातील भीषण दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, देवस्थान जमिनींना 'फार्मर आयडी' व इतर जाचक अटींविना सरसकट नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी 'महाराष्ट्र मंदिर महासंघ' आणि विदर्भातील विविध देवस्थानांच्या प्रतिनिधींनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय येथे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेतली.

यावर ''लवकरच दुष्काळाच्या प्रश्नावर राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार असून, त्यामध्ये देवस्थान जमिनींचा विषय प्राधान्याने मांडून सकारात्मक निर्णय घेतला जाईल व हा विषय नक्कीच मार्गी लावू,'' असे ठोस आश्वासन महसूलमंत्री ना. बावनकुळे यांनी दिले आहे.

या प्रश्नांसाठी मंदिर महासंघाच्या शिष्टमंडळाने महसूलमंत्र्यांसोबतच अमरावती येथील भाजपचे राज्यसभा खा.डॉ. अनिल बोंडे, आ.प्रवीण पोटे-पाटील, भाजपचे आ.सुनील वानखेडे आणि भाजपचे आ. प्रतापराव अडसड यांचीही भेट घेतली आणि देवस्थान जमिनींवर होणाऱ्या अन्यायाबाबत त्यांना सविस्तर निवेदन दिले. सध्या राज्यात अनेक जिल्ह्यांत भीषण दुष्काळ असून शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे देवस्थानांचे हक्काचे उत्पन्न बुडाले असून त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. शासनाकडून शेतकऱ्यांसाठी मदत मोहीम राबवली जात असली तरी, 'कृषी संस्था' किंवा 'फार्मर आयडी'चे चुकीचे अर्थ काढून प्रशासनाकडून देवस्थानांना या मदतीपासून हेतुपूर्वक वंचित ठेवले जात आहे. पूर्वीप्रमाणेच देवस्थानांच्या सर्व जमिनींना विनाअट सरसकट नुकसान भरपाई मिळावी, अशी प्रमुख मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

याप्रसंगी 'मंदिर महासंघा'चे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांच्यासह महासंघाच्या कोअर टीमचे सदस्य अनुप जयस्वाल आणि हिंदु जनजागृती समितीचे समन्वयक श्रीकांत पिसोळकर, तसेच अमरावती जिल्ह्यातील प्रमुख देवस्थानांचे विश्वस्त व मंदिर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यामध्ये प्रामुख्याने श्री पिंगळाई देवी संस्थान (नेर पिंगळाई), श्री अवधूत महाराज (विठोबा सावंगा), श्री कोंडेश्वर संस्थान, संत मीरा दातार मंदिर (बडनेरा), श्री रेणुका देवस्थान (नांदगाव, खंडेश्वर) आणि श्री आशा मनीषा देवस्थान (दर्यापूर) यांसह २५ हून अधिक देवस्थानांच्या प्रतिनिधींचा समावेश होता.

राज्यातील सर्व देवस्थानांच्या न्याय्य हक्कांसाठी मंदिर महासंघाच्या नेतृत्वाखाली हा लढा असाच सुरू राहील, असा निर्धार उपस्थित विश्वस्तांनी या वेळी व्यक्त केला.

कुऱ्हा परिसरातील शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात!

कुऱ्हा/वार्ताहर

यंदाच्या पावसाळ्यात पावसाने पाठ फिरवल्याने कुऱ्हा परिसरातील शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्यामुळे खरीप हंगामातील पिकांची वाढ खुंटली असून, अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हाताशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेने हिरावून घेतल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी मोठ्या अपेक्षेने पेरणी केली होती. बियाणे,खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरी यासाठी मोठा खर्च केला. मात्र, पावसाने सुरुवातीपासूनच अनियमित हजेरी लावल्याने पिकांना अपेक्षित पाणी मिळाले नाही. परिणामी सोयाबीन, कपाशी तसेच इतर पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही शेतांमध्ये पिकांची वाढ खुंटली, तर काही ठिकाणी पिके पूर्णपणे वाळून गेली आहेत.

यंदाच्या हंगामात निसर्गाने साथ न दिल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले आहे. शेतीसाठी घेतलेले कर्ज, वाढता उत्पादन खर्च आणि अपेक्षित उत्पन्न न मिळण्याची परिस्थिती यामुळे शेतकऱ्यांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

विशेष म्हणजे, राज्य सरकारने परिस्थितीची दखल घेत दुष्काळ जाहीर केला असला, तरी प्रत्यक्ष मदत आणि शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे गरजेचे आहे. आधार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पीक नुकसानीचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा आणि दुष्काळी सवलतींचा लाभ द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. शासनाने वेळीच मदतीचा हात दिला नाही, तर शेतकऱ्यांचे आर्थिक संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकीकडे दिवाळीच्या रोषणाईने बाजारपेठा उजळत असताना दुसरीकडे कुऱ्हा परिसरातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात मात्र आर्थिक संकटाचा अंधार पसरला आहे.

तूर पीकही लागले सुकायला

पश्चोट/वार्ताहर

यावर्षी सुरुवातीपासूनच पावसाचे प्रमाण अल्प असल्याने जमिनीतील ओल कमी झाली. त्यातच तापमानात प्रचंड वाढ झाल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असल्याने तूर पिकेही धोक्यात आलेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत कमालीची भर पडली आहे. तालुक्यातील शेतकरी खरिपात मूग, उडीद, कापूस, ज्वारी, भुईमूग, सोयाबीन अशा पिकाप्रमाणेच सोयाबीन, तूर मूग, कपाशी, उडीद तूर किंवा सलग तूर यांची लागवड करतात. खंड पडत असल्याने व असलेला पाऊस कमी जास्त प्रमाणात पडत होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन पिके काढावीच लागली नाहीत तर काही शेतकऱ्यांना नाममात्र स्वरूपात सोयाबीन उत्पादन झाले, परंतु सद्यस्थितीला तालुक्यातील विविध गावातील शेतशिवारात जमिनीतील ओलावा संपत चालल्याने शेतातील तूर पिके ही सुकू लागले आहे. शासनाने तत्काळ शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी, अशा प्रकारची मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्साहात

'वंदे मातरम' हा स्वातंत्र्याची क्रांती घडवून आणणारा मंत्र-प्रा.निखिल मोहोड

मोर्शी/वार्ताहर



देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'वंदे मातरम' हा मंत्र आपल्या हृदयात ठेवून १४८ क्रांतिकारकांनी फाशीच्या तख्तावर जाताना अखेरच्या क्षणीही 'वंदे मातरम'चा जयघोष केला. त्यांच्या बलिदानातून देशभक्तीची प्रेरणा मिळते,असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अमरावती जिल्हा कार्यवाह प्रा. निखिल मोहोड यांनी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मोर्शी नगरच्या वतीने शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित विजयादशमी उत्सवात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०१ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वयंसेवकांच्या पथकाने भगव्या ध्वजाला मानवंदना दिली. त्यानंतर घोषपथकाच्या साथीने शिवाजी हायस्कूलच्या मैदानावरून भव्य पथसंचलनाला सुरुवात झाली. संघाच्या पारंपरिक गणवेशातील स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने संचलन केले. हे पथसंचलन जयस्तंभ चौक, मंत्री मार्केट, पटेल मार्केट आणि महात्मा गांधी मार्केट या प्रमुख मार्गांवरून काढण्यात आले.

यानंतर शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित मुख्य कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा. निखिलजी मोहोड, प्रमुख अतिथी मोर्शी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक प्रणितजी यावलीकर, तालुका संघचालक मनोहर घुलक्षे आणि नगर कार्यवाह अमोलजी लांडे यांच्या उपस्थितीत भारतमाता व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच शस्त्रपूजन करण्यात आले.यावेळी स्वयंसेवकांनी विविध शारीरिक कवायतींचे प्रात्यक्षिक सादर केले. स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध सादरीकरण आणि सामूहिक कौशल्य उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.

प्रमुख अतिथी प्रणितजी यावलीकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून संघकार्य आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व विशद केले. प्रमुख वक्ते प्रा. निखिल मोहोड यांनी आपल्या भाषणात देशभक्ती, संघटन आणि सामाजिक परिवर्तनावर विचार मांडले. पंचपरिवर्तनाची पंचसूत्रे केवळ विचारांपुरती मर्यादित न ठेवता ती प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणली पाहिजेत. त्यातून सशक्त समाज आणि समर्थ राष्ट्रनिर्मितीचा मार्ग अधिक बळकट होईल, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन व आभार नगर कार्यवाह अमोलजी लांडे यांनी केले. उत्साहपूर्ण वातावरणात विजयादशमी उत्सवाची सांगता झाली.

महाराष्ट्र होमिओ डॉ.असोसिएशन तर्फे डॉ.भुतडा यांचे व्याख्यान

अमरावती-पर्ल हॉल हॉटेल ग्रँड मैफिलीन कॅम्प अमरावती येथे महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन अमरावती तर्फे डॉ सागर भुतडा आणि डॉ राधिका भुतडा यांचे व्याख्यान झाले.कार्यक्रमात अध्यक्ष डॉ स्वाती लबडे-पडोळे, सचिव डॉ नंदकिशोर भुतडा,डॉ अशोक उमप, फोरम अध्यक्ष डॉ शशांक दुबे, लेडीविंग चेअरपर्सन डॉ शीतल आचार्य, प्रकल्प प्रमुख डॉ शीतल चौधरी, डॉ सागर भुतडा व डॉ राधिका भुतडा उपस्थित होते.कार्यक्रमाचा प्रकल्प अहवाल डॉ शीतल चौधरी यांनी सादर केला आणि सहप्रकल्प प्रमुख प्रीती उबेर यांनी



कार्यक्रमासाठी त्यांना मदत केली.डॉ सागर भुताडा यांनी आपल्या CME मध्ये when closure is not enough या विषयी महत्वपूर्ण माहिती सांगितली.तसेच डॉ राधिका भुताडा यांनी The Rheumatolgy lens वातविकार या विषयीवर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे संचालन संघटनेचे उपाध्यक्ष डॉ मनोज चौधरी आणि डॉ वैशाली टेम् केले.नव्याने जुळलेल्या डॉ अनघा देशमुख यांचे संघटनेत स्वागत करण्यात आले.डॉ सागर भुतडा आणि डॉ राधिका भुतडा यांचे संघटनेतफे पुष्पगुच्च, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाला संघटनेचे सन्मानीय पूर्वाध्यक्ष, उपाध्यक्ष तालुका प्रतिनिधी, संघटनेचे सदस्य आणि महिला डॉक्टर्स मोठया प्रमाणात उपस्थित होते. आभार प्रदर्शन सचिव डॉ नंदकिशोर भुताडा यांनी केले.या कार्यक्रमाची माहिती संघटनेच्या प्रसिद्धी प्रमुख डॉ वैशाली टेम्भे आणि सहप्रसिद्धी प्रमुख डॉ प्रज्ञा घाटोळ यांनी माध्यमाना सांगितले.

दुष्काळी तालुक्यात पशुधनाची नोंदणी

अमरावती/का.प्र.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पशुधनाची चारा व पाण्याची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी पशुसंवर्धन विभागाने नियोजन करून अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. दुष्काळ काळात आवश्यक चारा, चारा बियाणे व ठोंबे वाटप, उपचार व इतर सेवांचा पुरवठा अचूकपणे व्हावा, यासाठी सर्व पशुपालकांनी पशुधनाची 'भारत पशुधन प्रणाली' नोंदणी व नवीन पशुधनाचे टॅगिंग करून नोंदणी करावी लागणार आहे.

शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनाचा लाभ थेट गरजू पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असणे आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित पशुपालकांनी तात्काळ आपल्या परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा. आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी व नवीन पशुधनाच्या कानात १२ अंकी बिल्ला टोचून त्याबाबत नोंद भारत पशुधन प्रणालीवर करावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त वल्लभ जोशी यांनी केले आहे.

मित्र मिलन समूहाचा 'पंचरत्न सोहळा' उत्साहात

पाच मान्यवरांचा पंचरत्न पुरस्काराने गौरव, तीन ज्येष्ठांचा अमृतमहोत्सवी सत्कार

नागपूर-मित्र मिलन समूह, हिंगणघाट यांच्या वतीने बालपणीच्या मित्र-मैत्रिणींच्या स्नेहमेळाव्यासह 'हिंगणघाट पंचरत्न पुरस्कार' वितरण आणि अमृतमहोत्सवी सत्कार सोहळा सर्वोदय आश्रम, विनोबा विचार केंद्र, धरमपेठ, नागपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला.या सोहळ्यानिमित्त हिंगणघाट येथील शाळा,महाविद्यालय आणि परिसरातील बालपणीचे मित्र-मैत्रिणी तब्बल ५० वर्षांनंतर एकत्र आले. अनेक वर्षांनंतर



झालेल्या या स्नेहभेटीमुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.डॉ. शरद निंबाळकर, डॉ. सतीश वटे, नरेंद्रदादा नासिरकर, प्रभाकर पांढरे आणि अनिल बांडे यांनी हिंदी चित्रपटगीते व गझल सादर करून रसिकांची मने जिंकली. 'स्वरचैतन्य' डॉ. मिलिंद इंदूरकर (मनवा) यांनी 'दयाघना' हे भावगीत आणि 'हे सुरांनो चंद्र व्हा' हे नाट्यगीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. इंद्राणी इंदूरकर हिने 'दिल धडकने का सबब याद आया' ही गझल प्रभावीपणे सादर केली. प्रमोद भागडे यांनी स्वरचित अभंग सादर केले, तर श्री. व सौ. रपाटे यांनी युगलगीतांनी मैफलीत रंग भरला.

माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर आणि डॉ. सतीश वटे यांच्या हस्ते मान्यवरांचे औक्षण करून शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.कला, संगीत, साहित्य, वैद्यकीय सेवा आणि समाजकार्य या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल पुढील पाच मान्यवरांना 'हिंगणघाट पंचरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.अरुण देशपांडे,नरेंद्रदादा नासिरकर,दत्तात्रय सराफ,दिलीप ढोक,'स्वरचैतन्य' डॉ. मिलिंद इंदूरकर तसेच वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल विजय बाकरे, प्रमोद भागडे आणि रमेश भोयर यांचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्यात आला.माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमाची सांगता झाली.या सोहळ्याला मित्र, स्नेही, आप्तेष्ट आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पन्नास वर्षांनंतरच्या स्नेहभेटीबरोबरच कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव आणि ज्येष्ठांचा सन्मान असा त्रिवेणी संगम घडविणारा हा पंचरत्न सोहळा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

परवानगी नाही, तरी खदानांमध्ये बेभान ब्लास्टिंग!

डीजीएमएसच्या नियमांना हरताळ; महसूल आणि खनिकर्म विभागाचे संशयास्पद मौन



अॅड. समीर ठाकूर

अकोला : जिल्ह्यातील खदानींमध्ये गौण खनिज उत्खननासाठी नियमांची पायमल्ली सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. डायरेक्टरेट जनरल ऑफ माइन्स सेफ्टी (डीजीएमएस) अर्थात खाण सुरक्षा महासंचालनालयाची आवश्यक परवानगी नसतानाही अनेक खदानींमध्ये सर्रास ब्लास्टिंग केले जात असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराची माहिती संबंधित यंत्रणांना असूनही कारवाईचा बडगा उगारला जात नसल्याने महसूल आणि खनिकर्म विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परवानगीशिवाय सुरू असलेल्या या स्फोटांच्या खेळाला नेमके अभय कोणाचे, असा सवाल उपस्थित होत आहे.

जिल्ह्यात तात्पुरते परवाने आणि लीजवर चालणाऱ्या खदानींची संख्या शंभराच्या घरात आहे. या खदानींमधून कठीण खडक फोडून गौण खनिजाचे उत्खनन करण्यासाठी नियमानुसार डीजीएमएस कार्यालयाची परवानगी आवश्यक असते. नागपूर येथील संबंधित कार्यालयाकडून ही परवानगी घेतल्यानंतरच अधिकृत ब्लास्टर आणि खाण प्रबंधकाची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. त्यांच्या देखरेखीखालीच ब्लास्टिंगची प्रक्रिया पार पाडणे अपेक्षित आहे. या नियुक्त्यांची आणि परवानगीची माहिती संबंधित तहसील कार्यालयासह जिल्हा खनिकर्म विभागाला देणेही आवश्यक आहे.

मात्र, जिल्ह्यातील खाण व्यवसायाचा कारभार तपासला असता, बोटावर मोजण्याइतक्याच खाणधारकांकडे डीजीएमएसची अधिकृत परवानगी असल्याची माहिती पुढे येत आहे. उर्वरित खदानींमध्ये परवानगीच्या नियमांना बगल देऊन ब्लास्टिंग सुरू असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, एका स्थानिक मॅगझिनधारकाकडून स्फोटकांचा पुरवठा करून त्याचे देयक अदा केले जात असल्याने प्रत्यक्ष परवानगीचा प्रश्न बाजूला ठेवून उत्खननाचा गाडा सुरू असल्याचे चित्र आहे.

या प्रकाराची दखल घेत नागपूर येथील डीजीएमएसच्या अधिकाऱ्यांनी यापूर्वी अकोला जिल्ह्यातील काही खदानींची पाहणी केली होती. या तपासणीत अनेक खदानधारकांकडे आवश्यक परवानगी नसल्याची बाब निदर्शनास आल्याची माहिती आहे. त्यानंतर संबंधित खदानींमधील कामकाज बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी आणि जिल्हा खनिकर्म विभागाला वारंवार पत्रव्यवहार करण्यात आल्याचेही समजते.

मात्र, बाहेरील यंत्रणेने गंभीर त्रुटी दाखवून दिल्यानंतरही स्थानिक प्रशासनाकडून ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. डीजीएमएसच्या पत्रांवर कारवाई करण्याऐवजी ती पत्रे धूळ खात पडली असतील, तर या निष्क्रियतेला जबाबदार कोण? परवानगी नसलेल्या खदानींमध्ये ब्लास्टिंग सुरूच कसे राहते? तहसील स्तरापासून जिल्हा खनिकर्म कार्यालयापर्यंत या व्यवहाराची माहिती पोहोचत नाही की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

ब्लास्टिंग हा केवळ उत्खननाचा विषय नसून त्याचा थेट संबंध कामगारांची सुरक्षितता, परिसरातील नागरिकांचे संरक्षण आणि सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षेशी आहे. अशा परिस्थितीत आवश्यक परवानगी आणि तांत्रिक देखरेखीशिवाय स्फोट घडविले जात असल्याचे आरोप खरे असतील, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे.

महसूल आणि खनिकर्म विभागाने केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष खदानींवर जाऊन वस्तुस्थिती तपासण्याची गरज आहे. अन्यथा, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

परवानगी नसलेल्या खदानींची यादी जाहीर करून संबंधितांवर कारवाई करणार का, तसेच डीजीएमएसने पाठविलेल्या पत्रांवर आजवर काय कार्यवाही झाली, याचा खुलासा जिल्हा प्रशासनाने करणे आवश्यक आहे.

ब्लास्टर, प्रबंधक केवळ कागदावरच?

डीजीएमएसची परवानगी घेतल्यानंतर अधिकृत ब्लास्टर आणि खाण प्रबंधकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यांच्या उपस्थितीत आणि देखरेखीखालीच खदानींमध्ये ब्लास्टिंग होणे अपेक्षित आहे. मात्र, जिल्ह्यात परवानगीधारक खाण व्यावसायिकांची संख्याच मर्यादित असल्याची माहिती समोर येत असताना, नियुक्त ब्लास्टर आणि प्रबंधक प्रत्यक्षात खाणींवर उपस्थित असतात का, हा स्वतंत्र चौकशीचा विषय आहे. नियुक्त्या केवळ कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात मनमानी सुरू असेल, तर कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार? प्रशासनाने परवानग्यांसह नियुक्त्यांची आणि प्रत्यक्ष उपस्थितीचीही तपासणी करावी.

रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी अपघात

कारागृहातील कर्मचाऱ्याचा मृत्यू!





मोर्शी/प्रतिनिधीः-

मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या खेड फाटा ते रेल्वे गेट क्र.२७ दरम्यान रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या मोटर सायकलस्वाराची बॅरिगेटला जोरदार धडक बसली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना आज दि.३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६:४५ वाजताचे सुमारास उघडकीस आली.मृतकाचे नाव अमोल आनंदराव फुलाते (वय २७ वर्षे) रा.मांडवा तालुका पुसद,जिल्हा यवतमाळ असे आहे. अमोल आनंदराव ☞(पान २ वर)

पंचवटी उड्डाणपुलावरील अपघातात पत्नीचा मृत्यू; पती गंभीर

अज्ञात वाहनाची धडक, दुचाकीवरील दाम्पत्य कोसळले



अमरावती/प्रतिनिधीः- सुखी संसाराची स्वप्ने उराशी बाळगून दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या दाम्पत्यावर काळाने घाला घातला. भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पत्नीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर पती गंभीर जखमी आहे. पत्नीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ही दुर्दैवी घटना मंगळवारी ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी गाडगेनगर पोलीस ☞(पान २ वर)

या दिवाळीत खरेदीत होणार दुप्पट बचत !

पूनम इलेक्ट्रॉनिक्सची हमी, बाजारभावापेक्षा १००० स्वस्त



अमरावती/प्रतिनिधीः-

दिवाळीच्या शुभपर्वानिमित्त मोतीनगर येथील पूनम इलेक्ट्रॉनिक्स ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स घेऊन आले आहे. सन १९९४ पासून अमरावतीकरांच्या सेवेत असलेले हे प्रतिष्ठान दर्जेदार उत्पादने, उत्तम सेवा आणि विश्वासार्हतेसाठी ओळखले जाते. या दिवाळीत ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या खरेदीवर ०% व्याज, शून्य डाउन पेमेंट आणि आकर्षक कॅशबॅक यांसारख्या सुविधांचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच, तुलनात्मक उत्पादनांवर बाजारभावापेक्षा १,००० कमी किमतीत खरेदी करण्याची हमीही प्रतिष्ठानकडून देण्यात येत आहे. ही हमी निर्धारित नियम व अटींनुसार लागू राहील.

पूनम इलेक्ट्रॉनिक्समध्ये Godrej, Haier, Intex, LG, Samsung, Panasonic, IFB, Kent आणि Aquaguard यांसारख्या नामांकित ब्रँड्सची उत्पादने एकाच छताखाली उपलब्ध आहेत. ग्राहकांना आपल्या गरजेनुसार आणि बजेटनुसार विविध उत्पादने निवडण्याची सुविधा येथे मिळते. Godrej च्या विशेष ऑफर अंतर्गत पात्र ग्राहकांना १२,००० पर्यंत कॅशबॅक, ८५१ पासून सुरू होणारे मासिक हप्ते (EMI) तसेच निवडक उत्पादनांवर ५ वर्षांची कॉम्प्रिहेन्सिव्ह वॉरंटी मिळू शकते. फायनान्सच्या सुविधा संबंधित योजना, उत्पादन आणि ग्राहकाच्या पात्रतेनुसार लागू राहतील.

या निमित्ताने पूनम इलेक्ट्रॉनिक्सचे संचालक अनिलकुमार अग्रवाल यांनी सर्व अमरावती ☞(पान २ वर)

फायनान्स कंपनीच्या मनमानीवर शिवसेनेचा 'हातोडा'

दर्यापुरात सिल केलेल्या घराचे कुलूप तोडले



खल्लार/प्रतिनिधीः-

कर्जाचे हप्ते थकले म्हणून कुटुंबाला घराबाहेर काढून घराला सिल ठोकणाऱ्या फायनान्स कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात दर्यापुरात शिवसेनेने दणका दिला. शिवसेना नेते गोपाल अरबट यांच्या नेतृत्वात सिल केलेल्या घराचे कुलूप तोडून पीडीत कुटुंबाला न्याय मिळवून देण्यात आला.

दर्यापूर शहरातील अवधूत नगर भागात राहणाऱ्या एका गरीब कुटुंबाने आपल्या व्यवसायासाठी एका खाजगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. सुरुवातीला त्यांनी काही हप्ते नियमित भरले देखिल मात्र यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे व्यवसाय ठप्प झाल्याने आणि हाताला काम नसल्याने त्यांचे हप्ते थकले. याचा फायदा घेत फायनान्स कंपनीने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पाठवून त्या कुटुंबाला जबरदस्तीने घराबाहेर काढले आणि घराला कुलूप लावून सिल केले. या अमानवीय कृत्यामुळे ते संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले. विशेष म्हणजे राज्य शासनाने दुष्काळी परिस्थिती पाहता कर्ज वसुलीला स्थगिती देणारा जी.आर. काढला असतानाही कंपनीने ही मुजोरी केली.

घराला कुलूप लागल्याने हे कुटुंब गेल्या काही दिवसांपासून अक्षरशः गाईच्या गोठ्यात रात्र काढत होते. व्यवसाय नसल्याने मिळेल ते मोलमजुरीचे काम करून ते आपला उदरनिर्वाह करत होते.

या घटनेची माहिती मिळताच शिवसेना नेते गोपाल अरबट हे आपल्या सहकाऱ्यांसह तात्काळ कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेटले आणि त्यांना जाब विचारला. शासनाचा जी.आर. असताना कारवाई कशी केली, असा सवाल केला. मात्र ☞(पान २ वर)

टाकळी येथील पूर्णा नदी पात्रात आढळला अनोळखी मृतदेह



खल्लार/प्रतिनिधीः-

दर्यापूर तालुक्यातील टाकळी येथे पूर्णा नदीच्या पात्रात आज (दि.३) एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतक व्यक्तीची ओळख अद्याप (वृत्त लिहिस्तोवर)पटलेली नसून, या घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाची पाहणी करुन पंचनामा केला. मृतकाची ओळख पटविण्यासाठी दर्यापूर पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. मृत व्यक्तीच्या अंगात आकाशी रंगाचा शर्ट असून गळ्यात काळ्या-पांढऱ्या रंगाचा चौकटीदार गमछा आहे.

सदर मृतक कोणाच्या परिचयातील, नातेवाईकांपैकी किंवा परिसरातील असल्यास त्यांनी तातडीने दर्यापूर पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा. असे आवाहम दर्यापूर पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

उर्दू शाळांतील ५७२ शिक्षक पदांचा तिढा

-गुणवंत उमेदवार नोकरीपासून वंचित 'कन्व्हर्टेड रॉऊंड' घेण्याची मागणी



खल्लार/प्रतिनिधीः-

ग्रामिण व शहरी भागासहित राज्यातील उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षकांची अनेक पदे रिक्त असताना देखिल पात्र व गुणवंत भावी शिक्षक नोकरीच्या प्रतिक्षेत असल्याचे विदारक चित्र आहे. पवित्र पोर्टलमार्फत उर्दू माध्यमासाठी जाहीर करण्यात आलेल्या एकूण ९७५ शिक्षक पदांपैकी तब्बल ५७२ पदे अद्याप रिक्त आहेत.

त्यामुळे उर्दू माध्यमातील शिक्षक भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या रिक्त जागा गुणवत्तेच्या आधारावर भरण्यासाठी उर्दू ओपन कन्व्हर्ट राउंड आयोजित करण्याची मागणी भावी शिक्षकांकडून जोर धरू लागली आहे.

या मागणी संदर्भात जिल्ह्यातील भावी उर्दू शिक्षकांनी शिक्षणमंत्री यांची भेट घेत आपल्या मागणीचे निवेदन दिले. निवेदनानुसार, जून २५ मध्ये झालेल्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेत अनेक ☞(पान २ वर)

केबल काढल्याच्या संशयातून केलेल्या हत्या प्रकरणात आरोपीला जन्मठेप

११ साक्षीदारांची साक्ष ठरली महत्त्वपूर्ण, पाच हजारांचा दंडही



अमरावती/प्रतिनिधीः-

घरावरील केबल काढल्याच्या संशयातून झालेल्या वादाचे पर्यवसान हत्येत झाल्याच्या प्रकरणात चांदूर रेल्वे येथील आरोपीला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. घरासमोर झालेल्या वादानंतर लोखंडी अँगलने डोक्यावर प्रहार करून सुखदेव लुटे यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात जिल्हा न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश संजय भट्टाचार्य यांच्या न्यायालयाने मंगळवारी ३ नोव्हेंबर रोजी आरोपी राजेश गोविंदराव मोहतुरे (वय ५०, रा. खडकपुरा, चांदूर रेल्वे) याला भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तसेच पाच हजार रुपयांचा दंड आणि दंड न भरल्यास एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

लोखंडी अँगलने डोक्यावर वार करून केली होती हत्या

ही घटना १६ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास चांदूर रेल्वे येथील खडकपुरा परिसरात घडली होती. न्यायालयात दाखल दोषारोपपत्रानुसार, घटनेच्या दिवशी आरोपी राजेश मोहतुरे हा सुखदेव मारोतराव लुटे यांच्या घरासमोर ☞(पान २ वर)

गायीच्या गोठ्यात आढळला भला मोठा अजगर!

परिसरात खळबळ; सर्पमित्रांनी केले सुरक्षित रेस्क्यू



नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-

येथील संगमेश्वर रस्त्यावरील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या ऋषिकेश मुळे यांच्या गायीच्या गोठ्यात भला मोठा अजगर आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. दिनांक २ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. गोठ्यातील कुटारामध्ये अचानक एवढ्या मोठ्या आकाराचा अजगर दिसताच मुळे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रसंगावधान ☞(पान २ वर)

नांदगाव बस स्टॅन्ड ते आठवडी बाजार पर्यंत डिव्हायडर बसवा

नगरसेवक प्रकाश मारोटकर यांची पालकमंत्र्यांकडे मागणी



नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- कुऱ्हा चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर हा मार्ग सिमेंट काँक्रीट चा नवीन रस्ता प्रस्तावित आहे. नांदगाव खंडेश्वर येथे आठवडी बाजार ते बस स्टँड पर्यंत या रोडवर डिव्हायडर बसविण्यात यावे अशी मागणी नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर, यांच्यासह नगरसेवक प्रकाश मारोटकर यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली .

कुऱ्हा पासुन सिमेंट काँक्रीट रस्त्याचे कामास सुरवात झाली ☞(पान २ वर)

एफडीएचा छापा; भेसळयुक्त शेव, रसगुल्ले जप्त

मां भगवती मिठाई व फराळ कारखान्यावर कारवाई



अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळीच्या सणात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होऊ नये, यासाठी भेसळखोरांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाईचा धडाका सुरू केला आहे. दिवाळी विशेष तपासणी मोहिमेंतर्गत ३ नोव्हेंबर रोजी शहरातील 'मां भगवती मिठाई व फराळ कारखाना' येथे अचानक छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान प्रतिष्ठानात अनेक अनियमितता आढळून आल्या. विशेष म्हणजे, कोणत्याही ☞(पान २ वर)